Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ॐ

रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या उदार आश्रयाखालीं प्रसिद्ध होणारी वीरशैव-लिंगिब्राह्मणधर्मग्रंथमाला.

ग्रंथ २० वा.

भारतसारसंग्रह

हा

(महाराष्ट्र तात्पर्यासह)

वेदमूर्ति, मणूर मठाध्यक्ष मल्लिकार्जुनशास्त्री

यांनीं सोलापूर येथें

Q23w
155D6

...प्रसाद' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

आवृत्ति १ ली प्रती २०००.

शके १८२७, सन १९०६.

(हा ग्रंथ प्रसिद्धकर्त्यांनीं सर्व हक्कांसह रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांस अर्पण केला आहे)

किंमत ६ आणे.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

Q23w 3480
155DG
Mallikarjunashastri
Bhartsarasangraha

HYS
DIR
ASI.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ॐ

रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांच्या उदार
आश्रयाखालीं प्रसिद्ध होणारी वीरशैव-
लिंगिब्राह्मणधर्मग्रंथमाला.

ग्रंथ २० वा.

भारतसारसंग्रह

हा

(महाराष्ट्र तात्पर्यासह)

वेदमूर्ति, मणूर मठाध्यक्ष मल्लिकार्जुनशास्त्री

यांनीं सोलापूर येथें

'श्रीदत्तप्रसाद' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केला.

आवृत्ति १ ली प्रती २०००.

शके १८२७, सन १९०६.

(हा ग्रंथ प्रसिद्धिकर्त्यानें सर्व हक्कांसह रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद यांस अर्पण केला आहे)

किंमत ६ आणे.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

Q23
Q23w
155D6

...GURU VISHWARADHYA
...SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ......3480.........

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

प्रस्तावना.

सृष्टिनियमाला अनुसरून धर्म हा बुडत चालला आहे. त्यामुळें
कांची परिस्थिति बदलत चालली आहे. हें लक्षांत आणून प्रत्येक
र्माभिमानी मनुष्यानें स्वधर्मोद्धारासाठीं झटलें पाहिजे. तदनुसार आपल्या
तून थोडीबहुत धर्माची सेवा व्हावी या हेतूनें आम्ही “वीरशैवलिंगि-
म्हणधर्मग्रंथमाला” असें नांव देऊन शक्त्यनुसार त्या मालेंत ग्रंथपुष्पें
ीत आहोंत. त्यापैकींच हा “भारतसारसंग्रह” ग्रंथ होय. हा ग्रंथ प्र-
द्ध विद्वान् निःसीम शिवभक्त अप्पयदीक्षित यांनीं केलेला आहे. यामध्यें सर्व
रताचें सार काढून त्यापासून निष्पन्न झालेला शिवसर्वोत्कृष्टत्वसिद्धांत
ानें चांगल्या तऱ्हेनें दर्शविला आहे. उदाहरणार्थ यांतील एक कथा-
ग असा आहे कीं, एका गंधर्वाच्या निमित्तानें कृष्णार्जुनामध्यें मोठी
ाई उपस्थित होऊन त्या दोघांना लढाई करण्याचा प्रसंग आला. त्या
ाईत अर्जुनाचा पराभव करण्याकरितां श्रीकृष्णानें श्रीशिवापासून सं-
ान केलेलें सुदर्शनचक्र अर्जुनावर सोडिलें. मग तें पाहून भयभीत
ऊन अर्जुनानें देखील आपले प्राणरक्षण करण्याकरितां श्रीशिवाच्या
ग्रहानेंच मिळालेलें पाशुपतास्त्र सोडिलें. नंतर त्या दोन्ही अस्त्रांच्या
कर अवाजानें व परस्परांच्या तडाख्यानें स्वर्ग वगैरे वरच्या लोकांत
णारे सर्व देव खालीं पडूं लागले. तेव्हां नारदमहर्षींनें श्रीशंकरास
ति करून त्या समरांगणांत आणिलें. मग श्रीशंकर तेथपर्यंत येऊन
ही अस्त्रांचा उपशम करून दोघांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून
मिटवून स्वस्थळीं निघून गेले. हें पाशुपतास्त्र अर्जुनानें श्रीशंकराच्या
दानें कसें मिळविलें तें भारतांत सांगितलें आहे. असे अनेक सुरस
भाग या भारतसारसंग्रहांत आणून श्रीशिवाचे ठिकाणीं असलेली
नाची व श्रीकृष्णाची दृढभक्ति दाखविली आहे. श्रीशिवाच्या वरदा-
च श्रीकृष्णाचें सहाय्य मिळून पांडवांनीं कौरवांचा पराभव करून राज्य
विलें वगैरे कथाभाग यांत असल्यामुळें हा ग्रंथ वाचावयास योग्य,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मनाला आल्हादकारक, झालेला आहे. त्याचें भाषांतर मराठींत होईल तितक्या प्रयत्नानें सुगम केलें आहे, तथापि यांत जे गु आढळतील ते वाचकांनीं कळविले असतां पुढच्या आवृत्तीच्या सुधारणा करूं.

या ग्रंथाचें भाषांतर वे. सं. रा. रा. रंगाचार्यशास्त्री मुधोळकर कानडीलिपींत छापलेल्या संस्कृत प्रतीवरून केलें आहे.

प्रूफतपास वगैरे कामांत वे. मू. मल्लिकार्जुनशास्त्री जैनापूर व रंगाचार्यशास्त्री मुधोळकर यांनीं मदत केल्याबद्दल यांचे आह्मी ऋणी आहोंत.

प्रसिद्धिकर्ता.

विनंति.

उपयुक्त अशा वीरशैवलिंगिब्राम्हणधर्मग्रंथांपैकीं कोणत्याही पूर्ण अपूर्ण ग्रंथाच्या हस्तलिखितप्रति कोणाजवळ असल्यास त्यांनीं त्य ह्यांकडे अगर रावसाहेब मल्लप्पा बसप्पा वारद सोलापूर यांचेकडे प देण्याची मेहरबानी करावी; म्हणजे धर्मग्रंथ छापण्याचे कामीं त्यांचा गला उपयोग होईल, व पाठविणारांस धर्मोन्नतीच्या कामीं यथा हातभार लावल्याचें श्रेयही मिळेल. त्या ग्रंथाचें काम संपतांच मूळप्रत परत करूं व दोन छापील प्रतीही देऊं. आपली मूळप्रत मिळेल किंवा नाहीं याची शंका वाटल्यास, त्यांनीं आपली मूळप्रत मिळण्याविषयीं इच्छेप्रमाणें खात्री पटवून घेऊन मग आमचेकडे पाठविण्याचें करावें.

प्रसिद्धिकर्ता.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भारतसारसंग्रह यांतील विषयानुक्रमणिका.

विषय.	पान.
ग्र भारतांत शिवच सर्वोत्कृष्ट आहे; असें वर्णन श्रीव्यासानें केलें असें सांगून ग्रंथकर्त्यानें परशिवाची स्तुति करून मंगल केलें [परशिवाच्या अनुग्रहानेंच कौरवांना पांडवांनीं जिंकिलें असें पुढच्या कथाभागावरून दिसेल].	१
द्रेच्या विवाहाचे वेळीं श्रीकृष्णानें उपमन्यूच्या उपदेशाप्रमाणें पाशुपतव्रत केलें; [कृष्णाच्या इच्छेप्रमाणें सुभद्रा अर्जुनास मिळाली] अशी कथा आदिपर्वांतली सांगितली.	३
ष्णार्जुन हे नरनारायणाच्या शरीरांत असतांना [त्या अवताराचे वेळीं] साठ हजार वर्षेंपर्यंत त्यांनीं शिवाची आराधना करून अतुल सामर्थ्य व अतुल पराक्रम वगैरे अलभ्य वर मिळविले अशी द्रोणपर्वांतली कथा सांगितली ...	४
णकाच्या चरित्रावरून शिवच सर्वोत्कृष्ट आहे असें अरण्यपर्वांतल्या भागावरून सिद्ध केलें.	१२
णार्जुनांनीं तप करून पाशुपतास्त्रज्ञान मिळविलें.	१६
क्षात श्रीशिवानेंच त्रिमूर्तीची सृष्टि केली अशी अनुशासनपर्वांतली कथा सांगितली.	२१
कुळांत कृष्णाचा पाळणा उलथून पडल्या वेळेस शकटासुराच्या भीतीनें नंदगोपानें शिवपरतत्वाची स्तुति करून रक्षा केली.	३२
र्जुनाला गीतोपदेश करावयाचे वेळीं श्रीकृष्णानें शिवावर असलेली आपली एकनिष्ठ भक्ति व्यक्त केली.	३६
ह्मणदंपतीची कथा सांगून शिवच परब्रह्म आहे; असें अर्जुनास कृष्णानें सांगितलें.	४३
प्राप्तीकरितां कृष्णानें तप केल्यानंतर शिवानें संतति तुला होईल असा वर देऊन मीच परब्रह्म आहे, असें त्याला सांगितलें [पुढें त्या वरानें श्रीकृष्णास मुलगा झाला] त्या मुलाचें नांव श्रीकृष्णानें सांब असें ठेविलें.....	५३

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मराठी शुद्धिपत्रक.

ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१४	निश्वय	निश्चय
२८	तच	तूंच
२४	अस	असें
२६	अर्थाच	अर्थाचें
१५	शकरा	शंकरा,
१६	अतर्ज्ञानानें	अंतर्ज्ञानानें
१८	उपसहार	उपसंहार
२३	चाद्य	चाद्यं
२९	यांप्रमणें	याप्रमाणें
२८	सवेशीं	सेवेशीं
२१	विशेषकरून	विशेषेंकरून
१८	चद्र	चंद्र
२८	केत्यानंतर	केल्यानंतर

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

संस्कृत शुद्धिपत्रक.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्धम्.	शुद्धम्
५	१	योगा स्तयो	योगास्त
७	७	देवै र	देवैर
१३	२	द्दवो	द्देवो
१६	४	र्दिव्यै ऋषि	र्दिव्यैर्ऋ
२३	१०	स्त्रष्टृत्व	स्त्रष्टृत्व
२५	९	द्रुहण	द्रुहिण
३०	१२	श्रष्ठा	श्रेष्ठौ
३०	१३	त्यादि नार	त्यादिनार
३३	२	पक स्थाणु	पकस्थाणु
३४	४	यु त्धारंभ	युद्धारंभ
३७	५	सग्रामे	संग्रामे
३७	११	याद	यदि
४०	८	वक्तु	वक्तुं
४८	१२	शास्त्रदृष्टे	शास्त्रद
४९	२	ष्टेये त्येवं	ष्टयेत्येवं
५४	५	तयातु	तया तु
५४	४	वळ वै	वळवै
५५	९	स्वभक्त	स्वभंक्तं

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥ ॐ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ अथ भारतसारसंग्रहस्तोत्रविवरणम् ॥

थ श्रीमहाभारतस्य शिवपारम्यप्रख्यापनपरतामाविष्कर्तुं कृत-
त्रस्यायमाद्यःश्लोकः ॥ श्रीबादरायणमुनिः स्वयमेव विष्णुः
लात्तमधिकृत्य कृते प्रबंधे ॥ तस्यापि नित्यमहितं शशिभूषण
म्रेडयन् गुरुरदर्शयदादितत्वम् ॥१॥ श्रीबादरायणनामा प्रसि-
ुनिः स्वयमेव विष्णुः कृष्णद्वैपायनं व्यासं विद्धि नारायणं स्व-
॥ कोह्यन्यः पुंडरीकाक्षान्महाभारतकृद्भवेत् ॥२॥ इति वचना-
स च श्रीमहाभारताख्यं प्रबंधं पार्थचरितवर्णनात्मकं तदनुष-
कृष्णचरितांतर्गततन्माहात्म्यवर्णनात्मकं च निर्ममे वासुदेवस्य
त्म्यं पांडवानां च सत्यताम् ॥ दुष्टतां धार्तराष्ट्राणामुक्तवान्भग-

---

आतां भारतसारसंग्रहांतल्या स्तोत्राचें विवरण करतात.) नंतर महा-
ांत असलेल्या शिवसर्वोत्कृष्टत्वाची प्रसिद्धि करावयाच्या स्तोत्रभागांत-
पहिला श्लोक सांगतात. (१) हे चंद्रशेखरा, बादरायणमुनि (व्यास)
तः विष्णूच होय. यानें पार्थाचें (अर्जुनाचें) निमित्त करून जो भा-
ांवाचा प्रबंध रचिला, त्या प्रबंधांत निरंतर पूज्य अशा तुझें वर्णन वा-
करून त्या आदिगुरूनें (व्यासानें) आदितत्व (पुरातन तत्व) दा-
. (वाक्य) बादरायण नांवाचा प्रसिद्ध मुनि हा स्वतः विष्णु आहे,
वेषयीं प्रमाण दाखवितात.) (२) जो नारायण (विष्णु) आहे
कृष्णद्वैपायन व्यास आहे, असें जाण. कारण कमलाप्रमाणें डोळे अस-
त्या विष्णूवांचून महाभारत नांवाचा प्रबंध दुसरा कोण करूं शकेल ?
करणार नाहीं (हें वचन प्रमाणभूत आहे). (वाक्य) हा जो म-
रत नांवाचा प्रबंध आहे, तो केवळ पार्थाच्या चरित्राच्या वर्णनानेंच
आहे असें नाहीं; त्यांत श्रीकृष्णाचें चरित्रही वर्णिलें आहे. (३) वा-
ाचें चरित्र, पांडवांची सत्यता, दुर्योधनादिकांचा दुष्टपणा वगैरेंचें सर्व वर्णन

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

वान्तृषिः ॥३॥ इति वचनात् ॥ अत्र च प्रबंधे पार्थानां नाय
रणं व्याजमात्रं तत्संरक्षणजागरूकश्रीकृष्णमाहात्म्यवर्णनात्
तत्प्रवृत्तम् ॥ तद्बाहुल्यात्तदधीनत्वाच्च पार्थानां राज्यलाभस्यं
तस्यादौ ॥ नमो भगवते तस्मै व्यासायामिततेजसे ॥ यस्य प्र
क्ष्यामि नारायणकथामिमाम् ॥४॥ इति सूतवचने श्रीमहाभा ॥
नारायणकथेत्येव व्यवहृतत्वाच्च ॥ एवं भूतं श्रीमहाभारतं
सर्वेषां ब्रह्मविदां गुरुर्भगवान् व्यासः श्रीकृष्णमाहात्म्यव
शिव एव परं ब्रह्मेति शिष्येभ्यः परं तत्वं दर्शयामास ॥ किं
तस्यश्रीकृष्णस्यापि नित्यमहितं नित्यं पूजितं तेनापि कृष्णे
ष्णावताररूपेण प्राक्परिगृहीतैः पूर्वपूर्वरूपैः परवासुदेवात्मक

भगवान् व्यासानें केलें आहे. (वाक्य) या वचनावरून वा
चरित्र यांत सांगितलें आहें, असें सिद्ध झालें. असो. या प्रबंधांत
ला मात्र पांडवांना नायक (मुख्य पात्र) केलें आहे वास्तविक पा
त्या पांडवांचें रक्षण करण्याविषयीं नेहमीं दक्ष असणाऱ्या कृष्णाच्या
त्म्याचें वर्णनच मुख्य आहे, असें दिसून येतें. कारण कृष्णाच्या मा
चें वर्णनच जागजागीं पुष्कळ आढळतें. शिवाय पांडवांना राज्य
यास मूलकारण कृष्णच झाला; यावरून पांडवांचें राज्य पांडवांना
देण्याचें सामर्थ्य कृष्णाचें होतें असा सूक्ष्म अर्थ निघतो. ग्रंथाच्या),
सूतानें ह्मटलें आहे, कीं (४) अमित तेजस्वी पूज्य व्यासाला नमस्क
रून त्याच्या प्रसादानें ही नारायणकथा सांगतों. (वाक्य) या वचन
महाभारताला "नारायणकथा" असें नांव सूतानें दिलें, असें झालें
असो. असा भारत नांवाचा ग्रंथ करणारा, व ब्रह्मवेत्त्यांमध्यें गुरु
रा अशा व्यासानें श्रीकृष्णाच्या माहात्म्याच्या द्वारानें आपल्या सर्व
ना शिवच परब्रह्म आहे, असें सिद्ध करून दाखवून त्या शिवप
ओळख करून दिली. श्रीकृष्णाला तो शिव नित्यपूज्य झाला होता (
निरंतर शिवाची पूजा करीत होता). कृष्णावताररूपी कृष्णानें व
रण केलेल्या त्या त्या अवतार स्वरूपांनीं व वासुदेव मूलरूपानें शिव

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

सदापूज्यमानमिति यावत् एवंभूतं शिवमाम्रेडयन् पुनः पुनः
सन् प्रायः सर्वत्रापि हि महाभारते श्रीकृष्णस्य शिवपूजा-
तत्प्रसादलब्धसकलप्रभाववत्त्वं च वर्ण्यते तत्र तावत् सौप्ति-
श्वत्थामानं प्रति शिववचनं॥ सत्यशौचार्जवत्यागैस्तपसा निय-
॥ क्षांत्या भक्त्या च धृत्या च कर्मणा मनसा गिरा॥५॥ अ-
इवताराध्यः कृष्णेनाक्लिष्टकर्मणा॥ तस्मादिष्टतमः कृष्णादन्यो
विद्यते॥६॥ इति॥ आदिपर्वणि च सुभद्रापरिणयप्रस्तावे
मध्ये कचिद्वीपविशेषे कृष्णेन शिवस्य पूजार्थं प्रवर्तितो महो-
प्रपंचितः उपमन्यूपदेशेन श्रीकृष्णस्यापि द्वादशाब्दावधि पा-
व्रतानुष्ठानं कैलासयात्रायामन्यत्र च तत्र पूजास्तुतितपोभिः कृ-
शिवप्रीणनमेव कृतमिति प्रपंचेन वर्णितम्॥ द्रोणपर्वणि द्रो-

ली होती, असें यांतलें तात्पर्य आहे. असा जो शिव आहे, त्या शि-
निर्णन वारंवार करून प्रायशः सर्व ठिकाणीं महाभारतांत श्रीकृष्णाची
जेवरील निष्ठा व शिवाच्या प्रसादानें श्रीकृष्णाला प्राप्त झालेलें कृष्णा-
गावत्व (महात्म्य) यांचेंच वर्णन केलें आहे. त्यांत उदाहरणार्थ सां-
सौप्तिक पर्वांत अश्वत्थाम्याला शिवानें ह्मटलें आहे कीं, (५) सत्य,
णा), शौच (शुध्दता), आर्जव (सरळपणा), त्याग (दान),
तपश्चर्या किंवा चिंतन), नियम, क्षांति, भक्ति, धृति (धैर्य), कर्म,
), मन, वाणी, (६) यांनीं मी तुला जसा प्रसन्न झालों आहें, त्या-
पूर्वोक्त गुणांनीं मी श्रीकृष्णासही प्रसन्न झालों आहे. अर्थात् मला
क्षां अधिक प्रिय वस्तु या जगांत दुसरी कोणतीही नाहीं. याप्रमाणें
वचन आहे. शिवाय आदिपर्वांत सुभद्रेच्या विवाहाच्या वेळचे वर्ण-
समुद्रामधल्या कोणत्या एका बेटावर शिवाची पूजा करावयास श्रीकृ-
मोठा थोरला उत्सव आरंभिला होता; तेव्हां उपमन्यूच्या उपदेशानें
गानें बारा वर्षेपर्यंत पाशुपतव्रताचें अनुष्ठान केलें, असें वर्णन आहे,
सयात्रेच्या वेळीं व दुसऱ्या ठिकाणीं पूजा, स्तुति, तपश्चर्या वगैरे
शिवाच्या प्रीतीकरितां श्रीकृष्णानें केलीं, असें विस्तारानें वर्णन केलें
व द्रोणपर्वांत असें वर्णन आहे कीं, द्रोणाचार्यांच्या वधानंतर संता-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

णवधानंतरं क्रोधेन स्वप्रहितं कृष्णार्जुनयोर्वितथीभूतमाग्नेयास्त्रं
व्रीडया धिक् धिगिति शस्त्रं परित्यज्य दक्षिणां दिशं प्रस्थितमश्व-
मानं प्रति मार्गे समागतस्य श्रीवेदव्यासस्य तद्व्रीडापनयनार्थं न
नम् ॥ देवदेवस्त्वचिंत्यात्मा अजेयो विष्णुरव्ययः॥ सत्वरूपं भ
त्वा लिंगेऽर्चयति यः प्रभुम् ॥ तस्मिन्नभ्यधिकां प्रीतिं करोति
भध्वजे ॥७॥ इति ॥ तत्रैव ॥ कृष्णार्जुनौ पूर्वं नरनारायणावृ
ताभ्यां च लिंगेऽर्चनया षष्ठिवर्षसहस्राणि शिवमाराधितवद्भ्यां
वेन अतुलबलवीर्यपराक्रमादयो बहवो वरा दत्ता इति वेदव्या
कथिते अहं किं न शिवपूजक इति कृतानुयोगमश्वत्थामानं प्र

पानें अश्वत्थाम्यानें कृष्णार्जुनांवर जेव्हां आग्नेयास्त्र सोडिलें, तेव्हां तें
श्रीकृष्णानें व अर्जुनानें व्यर्थ केलें; तें पाहून मनांत लाजून अश्वत्था
ह्मटलें कीं, अशा मला धिक्कार असो, धिक्कार असो, असें मनांत ह्मणू
स्त्रास्त्रें सर्व जिकडे तिकडे फेंकून देऊन तो अश्वत्थामा दक्षिण दि
चालता झाला; तेव्हां अकस्मात् वाटेंत श्रीवेदव्यासमुनि आले, व अ
ऱ्हेच्या अश्वत्थाम्याला पाहून, त्याची लाज घालविण्याकरितां वेदव्यास
नीं अश्वत्थाम्याला ह्मटलें कीं, (७) हे द्रोणपुत्रा, देवाधिदेव विष्णु हा
(नाशरहित) असून अजिंक्य आहे; व त्या विष्णूच्या आत्म्याचें
करणें फार कठिण आहे. याला कारण असें आहे कीं, सत्त्वस्वरूपी
वाचें स्वरूप जाणून, त्या प्रभूची (शिवाची) पूजा लिंगाच्या ठिकाणी
कृष्ण करतो; व त्या वृषध्वजाच्या ठिकाणीं अतोनात प्रेम करतो. असें
सानें अश्वत्थाम्याला सांगितलें. पुनः तेथेंच (त्याच पर्वांत) अश्वत्था
कृष्णार्जुनाचें माहात्म्य सांगितलें आहे कीं, हे अश्वत्थामन्, कृष्णा
दोघे पूर्वी (पूर्व जन्मांत) नर नारायण नांवाचे ऋषि होते. त्या दोन
त्यावेळेस साठ हजार वर्षेंपर्यंत लिंगपूजा करून शिवाची आराधना
होती. ह्मणूनच अतुल वीर्य पराक्रम वगैरे पुष्कळ गुण शिवाच्या व
नें त्यांना प्राप्त झाले आहेत असें व्यासानें सांगितल्यानंतर, अश्वत्था
णाला कीं, हे मुने, तो कृष्ण एकटाच शिवपूजक आहे, मी नाहीं असें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

स्यैव वचनम् ॥ जन्मकर्मतपोयोगा स्तयोस्तव च पुष्कलाः ॥ ताभ्यां लिंगेऽर्चितो देवस्त्वयार्चायां युगे युगे ॥८॥ इति ॥ इदं च मैनाके श्रीकृष्णस्य तपश्चरणं वहुवरलाभश्चेत्युभयं पारिजातजिहीर्षया शिवं संपूज्य स्तुवन् कृष्णः शिवेनैव स्मारितः ॥ इति संस्तूयमानस्तु भगवान् गोवृषध्वजः ॥ प्रसार्य दक्षिणं बाहुं वासुदेवमथाब्रवीत् ॥९॥ मनीषितानामर्थानां प्राप्तिस्तेस्तु सुरोत्तम ॥ पारिजातं च हर्तासि माभूत्ते मनसो व्यथा ॥१०॥ पुरा मैनाकमाश्रित्य तपस्त्वकरोर्यदा ॥ तदा मम वचः कृष्ण संस्मृत्य स्थैर्यमाप्नुहि ॥११॥ अवध्यस्त्वमजेयस्त्वं मत्तः शूरतरस्तथा ॥ भवितासीत्यवोचं यत्तत्-

---

ण समजतां कीं काय ? मीही त्याच्याप्रमाणें शिवपूजक आहे, मग माझ्यापेक्षां त्याचा मोठेपणा कां जास्त आहे ? तें सांगा. असें अश्वत्थाम्याचें वाक्य ऐकून, वेदव्यासानें त्यास पुनः बोध केला कीं, हे अश्वत्थामन्, (८) कर्में, तपश्चर्या, योग वगैरे जन्मापासून तूंही पुष्कळ केलींस, व त्या दोघांनींही पुष्कळ केलीं; परंतु त्यांत अंतर एवढेंच आहे कीं, त्या दोघांनीं प्रत्येक युगांत लिंगपूजा केली आहे (लिंगामध्यें शिवपूजा केली आहे). (असें व्यासानें सांगितलें). हें तपाचरण कृष्णानें मैनाक पर्वतावर केलें. तेथें त्याला हे सर्व वर मिळाले, पारिजात हरण करावयाच्या इच्छेनें श्रीकृष्णानें शिवाची पूजा केली, व स्तुति केली. तेव्हां श्रीशिवानें प्रसन्न होऊन त्या कृष्णाचें स्मरण केलें (त्याच्या पूजेनें व स्तुतीनें प्रसन्न होऊन वर देण्याकरितां शिवानें कृष्णाची आठवण केली). (९) याप्रमाणें श्रीकृष्णानें वृषध्वज भगवान् शंकराची स्तुति करतांक्षणीं तात्काळ श्रीशिव प्रसन्न झाले. व उजवा हात पसरून श्रीशिवानें वासुदेवाला ह्मटलें. (१०) हे कृष्णा, सुरश्रेष्ठा, तुझे जे कांहीं मनोरथ असतील, ते परिपूर्ण होवोत. तूं पारिजात हरण करशील, विनाकारण मानसिकव्यथा बाळगूं नकोस; सर्व कांहीं तुझ्या मनाजोगें होईल. (११) पूर्वीं मैनाक पर्वतावर जेव्हां त्वां तपश्चर्या केली होती, त्यावेळीं जें कांहीं तुला मीं सांगितलें होतें, त्याची यावेळीं आठवण करून आपलें मन स्थिर कर. (१२) तूं माझ्या वराच्या प्रभावानें अवध्य (दुसऱ्याकडून मारावयास अशक्य), अजिंक्य, माझ्यापेक्षां शूर असा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

था न तदन्यथा ॥१२॥ इति ॥ एवं श्रीकृष्णस्य स्वरूपपूर्व
पैः कृते शिवाराधने अनेकानि वचनान्युदात्हतानि तस्य मू
कृतं शिवाराधनं ततो वरलाभश्चेत्युभयमारण्यपर्वणि तीर्थया
दर्शितम् ततो गछेत्सुपर्णाख्यं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ॥ यत्र
प्रसादार्थं शिवमाराधयन् पुरा ॥१३॥ वरांश्च सुबहूंल्लेभे दे
दुर्लभान् ॥ दत्तांश्च त्रिपुरघ्नेन परितुष्टेन भारत ॥१४॥ अ
न्यैः प्रियतमो लोके कृष्ण भविष्यसि ॥ त्वन्मुखं च जगत
विष्यति न संशयः ॥१५॥ इति ॥ अन्यैः प्राचीनत्वच्चरितेभ्
मद्वरदानलब्धसामर्थ्येन करिष्यमाणैः देवमनुष्यादिकंटकासु
सादिवधैः लोके भूम्यंतरिक्षस्वर्गादौ सर्वत्र प्रियतमो देवमनु
नां प्रीतिविषयो भविष्यसि अतएव जगत्सर्वं त्वन्मुखं त्वत्प्र

होशील; असें जें वचन मी तुला दिलें होतें, तें अगदीं बरोबर होईल
त कांहींएक खोटें व्हावयाचें नाहीं (असें वर्णन हें सांगितलें). ग
श्रीकृष्णाच्या पूर्व अवतारांमध्यें देखील त्या त्या अवताराच्या वेळी
त्या अवताररूपानें व मूलरूपानें, श्रीशिवाची आराधना विष्णूनें केल
वर्णन अरण्यपर्वांत तीर्थयात्रेच्या वेळेला केलें आहे. तें असें कीं,
पूर्वी एकदां त्रैलोक्यांत प्रख्यात अशा सुपर्ण नांवाच्या पर्वतावर श्री
ला; व त्याठिकाणीं शिवाचा प्रसाद (अनुग्रह) मिळविण्यासाठीं ल
शिवाची आराधना केली. (१४) हे भारत (जनमेजया) त्याठिका
कृष्णाच्या आराधनेनें प्रसन्न होऊन, त्रिपुरासुराला मारणाऱ्या श्री
देवांनाही दुर्लभ असे पुष्कळ वर कृष्णाला दिले. (१९) श्रीशिव
ष्णाला असें सांगितलें कीं, हे कृष्णा, याशिवाय इतर माझ्या वर
भावानें जगांत तूं सर्वांस प्रिय होशील; व सर्व जगांत तूंच प्रमुख
यांत संशय नाहीं. असें अरण्यपर्वांतलें वर्णन झालें. (वरच्या " अ
या श्लोकाचा अर्थ असाही करतात कीं,) शिव ह्मणतात कीं, हे
तुझ्या स्वतःच्या चरित्रांखेरीज माझ्या वरदानाच्या सामर्थ्यानें पुढें तु
तून घडणाऱ्या देवमानवद्वेषी असुरराक्षसांच्या वधादिकृत्यांनीं त्रै
सर्व ठिकाणीं देवांना व मानवांना तूं प्रिय होशील. अर्थात् सर्व ज

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भविष्यतीत्यर्थः एवं देवादिकंटकवधेन संभावितस्य दोषस्य प्रायश्चित्तमपि शिवाराधनरूपमेव भगवता कृतमिति तीर्थयात्राविधाने पठ्यते ॥ तीर्थं कुरुकुलश्रेष्ठ त्रिषु लोकेषु विश्रुतम् ॥ प्रमीतिनाम्ना विख्यातं सर्वपापविमोचनम् ॥१६॥ यत्र ब्रह्मादयो देवा उपासंते महेश्वरम् ॥ तत्र स्नात्वार्चयित्वा च रुद्रं देवगणेश्वरम् ॥१७॥ जन्मप्रभृति पापानि कृतानि तुदते नरः ॥ देवी यत्र नरश्रेष्ठ सर्वं देवै रभिष्टुता ॥१८॥ तत्र स्नात्वा नरव्याघ्र हयमेधमवाप्नुयात् ॥ जित्वा यत्र महाप्राज्ञ विष्णुना प्रभविष्णुना ॥ पुरा शौचं कृतं राजन् हत्वा दैवतकंटकान् ॥१९॥ इति ॥ अत्र शौचशब्देन शिवाराधनमेव प्राय-

---

ाच पुढारीपणा मिळेल. याप्रमाणें देवमानवकंटक राक्षसांच्या वधापासून उद्भवणाऱ्या दोषाला प्रायश्चित्त ह्मणून शिवाची आराधना भगवान् कृष्णानें केली; असें वर्णन तीर्थयात्रा विधानामध्यें केलें आहे. शिवाय त्याच तीर्थयात्राविधानामध्यें पुनः असें सांगितलें आहे कीं, (१६) वैशंपायन जनमेजयास ह्मणतात कीं, कुरुकुलांत श्रेष्ठ असणाऱ्या जनमेजया, त्रैलोक्यांत प्रसिद्ध असें प्रमीति नांवाचें एक तीर्थ आहे. त्या तीर्थांत स्नान केलें असतां, मनुष्य सर्व पातकांपासून मुक्त होतो. (१७) ज्या तीर्थामध्यें ब्रह्मादिदेव स्नान करून महेश्वराची (शिवाची) आराधना करितात, त्याच तीर्थामध्यें स्नान करून देवगणांमध्यें श्रेष्ठ अशा शिवाची पूजा करून पुष्कळ लोक (१८) जन्मापासून साचलेल्या आपल्या पापांचा नाश करून घेतात. ज्या तीर्थामध्यें सर्व देव देवीचें (पार्वतीचें) स्तवन करतात, (१९) त्याच ठिकाणीं हे नरश्रेष्ठा, मानवानें स्नान केलें तर त्या मनुष्याला अश्वमेध यज्ञ केल्याचें श्रेय येतें. हे बुद्धिमान् राजा, समर्थ विष्णूनें देवकंटक (देवांचे शत्रु) अशा दैत्यांना मारून जें पातक जोडिलें होतें, त्या पातकाचें क्षालन व्हावें, ह्मणून या तीर्थामध्यें स्नान करून शिवाराधनारूप प्रायश्चित्त घेतलें (पाप घालविण्याकरितां शिवाची पूजा केली). असें भारतांत सांगितलें आहे. वरच्या श्लोकांत "शौच" असा जो शब्द घातला आहे, त्याचा अर्थ "शिवाराधनारूप प्रायश्चित्त" असाच होतो. कारण ब्र-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

श्चित्तमुक्तं यत्र ब्रह्मादयो देवा उपासंते महेश्वरमिति संनि-
ठात् तीर्थयात्राविधावेव नारायणादिसहितस्य हिरण्यगर्भस्य
भक्ताराधनोक्त्या कैमुतिकन्यायेन शिवाराधकत्वमपि भगव-
रायणस्य विभावितम् ॥ ततो गच्छेत राजेंद्र तीर्थं शतसहस्र-
सहस्रकं च तत्रैव द्वे तीर्थे लोकविश्रुते ॥२०॥ उभयोर्हि नरः
गोसहस्रफलं लभेत् ॥ अत्र ब्रह्मा स्वयं नित्यं देवैः सह मही
॥२१॥ अन्वास्यते कुरुश्रेष्ठ नारायणपुरोगमैः ॥ सान्निध्यं त
जेंद्र रुद्रपत्न्याः कुरूद्वह ॥ अर्चयित्वा तु तां देवीं न दुर्गति
यात् ॥२२॥ अत्र क्षेत्रे देवीसान्निध्यस्य तदर्चनतत्फलयोश्च
संभूय स्थितैर्नारायणादिभिर्देवैरन्वास्यमानस्य ब्रह्मणोपस्था

ह्मादि देवांनीं स्नान करून शिवपूजा केली अशा अर्थाचा श्लोक
घातला आहे त्यामुळें या शब्दाचा अर्थ असाच करावा लागतो.
तीर्थयात्रा विधानामध्यें नारायण वगैरे ब्रह्मादिदेवांनीं शिवभक्तांची आ
केली असें स्पष्ट सांगितल्यामुळें कैमुतिक न्यायानें श्री भगवान नारा
शिवाची आराधना केली, असें अनुमानानें सिद्ध होतें. असो दुसरें
असें एक आहे कीं, (२०) हे राजा जनमेजया, त्याठिकाणीं शतस
नांवाचें एक तीर्थ व सहस्रक नांवाचें एक तीर्थ अशीं दोन तीर्थें
सिध्द आहेत. अशा त्या तीर्थांच्या ठिकाणीं मनुष्यानें अवश्य जावें.
व त्या दोनही तीर्थांमध्यें मनुष्यानें स्नान करावें. ह्मणजे त्याला सह
दान केल्याचें फळ मिळतें. हे राजा, त्याठिकाणीं देवांसहित स्वतः
(२२) नारायण वगैरे ऋषींसहित घर करून राहिला आहे. (नेह
राहिला आहे). हे राजश्रेष्ठा, त्याठिकाणीं सदोदित रुद्रपत्नीचें (पार्व
सांनिध्य असल्यामुळें तेथें राहून जो मनुष्य देवीची पूजा करितो, त्या
गति कधींही होत नाहीं. असें वर्णन केल्यावरून, व त्या क्षेत्रांत देवी
निध्य असून तिची सेवा केल्यानें अमुक एक फल मिळतें असें सांगि
वरून ब्रह्मा हा नारायण वगैरे ऋषींसहित देवीची आराधना करावय

१ जेथें गजाची (हत्तींची) गणना होत नाहीं तेथें चिलटांची काय कथा
कैमुतिक न्याय ह्मणतात.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

राधनार्थमित्याशया उन्नीयते आनुशासनिके च यस्य ब्रह्मा च
ष्णुश्च त्वं च शक्र सहामरैः ॥ अर्चयध्वं सदा लिंगं तस्मात्पूज्य-
तो हि कः ॥२३॥ इत्युपमन्युवचनेन ब्रह्मविष्ण्वादीनां नित्यमेव
वाराधकत्वमुक्तं एवं सौप्तिकादिष्ववताररूपस्य परवासुदेवरूपस्य
कृष्णस्य शिवपूजनेन सकलवरलाभोक्त्या भारते साक्षात्प्रतिपा-
तनिरतिशयप्रभावशालिनः साक्षात्परब्रह्मेति संभाव्यमानात्त-
ऽपि तत्पूज्यस्य शिवस्य यत्पारम्यं व्यंजनावृत्या प्रतीयते तदेव
महाभारतस्य वाच्यनारायणचरितद्वारा व्यज्यमानं श्रीमहाभा-
स्य प्रधानं प्रतिपाद्यं श्रीमहाभारतं हि महदत्युत्कृष्टं काव्यं कृतं
दं भगवन् काव्यं परममिति ब्रह्माणं प्रति व्यासवचनात् ब्रह्म-

च तेथें राहिला; असें सहजच सिद्ध होतें. शिवाय आनुशासनिकपर्वांत
सें सांगितलें आहे कीं, (२३) उपमन्यु इंद्राला ह्मणतात, बा इंद्रा, तूं,
देव, ब्रह्मदेव, विष्णु, या सर्वांनीं शिवलिंगाची पूजा सर्वदा केली आहे.
हां शिवाखेरीज अत्यंत पूज्य असा दुसरा कोणता देव आहे बरें? या
मन्यूच्या वचनावरून ब्रह्मा, विष्णु, वगैरे देव प्रतिदिवशीं शिवपूजा (इ-
लिंगपूजा) करतात, असें अर्थात् सिद्ध झालें. दुसरें असें कीं, सौप्तिक व-
पर्वांत सांगितलें आहे कीं, वासुदेव नांवाचा अवतार घेतलेल्या श्रीकृ-
ानें श्रीशिवाची पूजा केली, ह्मणूनच अनेक तऱ्हेचे वर त्याला शिवानें
ले, असें भारतांत वर्णन केल्यामुळें व भारतांत प्रत्यक्ष रीतीनें ज्या कृ-
गाचा प्रभाव अतिशयानें वर्णिला आहे. अशा कृष्णानें देखील श्रीशिवाची
राधना केली आहे, असें व्यासमहर्षीनें सांगितल्यावरून, सर्व देवांपेक्षां
शिवच श्रेष्ठ आहे, असा ध्वनि यांतून निघतो. (असा व्यंग्यार्थ यांतून
घतो.) ह्मणूनच नारायणाच्या चरित्राच्या निमित्तानें भारतांत श्रीशिवा-
या माहात्म्याचें उत्कृष्ट रीतीनें वर्णन केलें आहे, असें सिद्ध झालें. ह्मणून-
याच अर्थानें ब्रह्मदेवाला व्यास महर्षीनें ह्मटलें कीं, हे ब्रह्मदेवा, मी ना-
यणचरित्रद्वारानें शिवमाहात्म्य वर्णिलेलें हें भारत नांवाचें उत्कृष्ट काव्य
लें, यावर ब्रह्मदेवानें व्यासाला ह्मटलें कीं, हे व्यासमुने, ज्याअर्थीं भार-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

णा च त्वया च काव्यमित्युक्तं तस्मात्काव्यं भविष्यतीत्युक्त
व्यस्य सतः कीदृक्काव्यत्वमाशास्यत इत्याकांक्षायां अस्य का
कवयो न समर्था विशेषणे विशेषणे गृहस्थस्य शेषास्त्रय इ
इति ॥ तदनंतरमेतदतिशायिकाव्यं कोऽपि न करिष्यती
यत्सर्वातिशायि काव्यत्वं तदाशास्यत इति विभावनाच्च सर्व
विमुख्यानामुपजीव्यो भविष्यति ॥ पर्जन्यइव भूतानामक्षय
रतद्रुम इति तदनंतरं भारतस्य करिष्यमाणसर्वकाव्योपजी
चनाच्च अस्योत्कृष्टस्य चोत्तमकाव्यस्य वाच्यातिशायि यद्व्यं
तदेव प्रधानं नतु वाच्यम् ॥ यथाहुः॥ प्रतीयमानं वस्त्वस्ति
महाकवीनां आभाति लावण्यमिवांगनासु ॥ इति इह तु वा

ताला " काव्य " असें नांव दिलें, त्याअर्थी जगांत भारत हें काव्य
राहो, असें मी तुला सांगतों. आतां यावर कोणी असें ह्मणतील
गांत कवींचीं इतर काव्यें असतां व्यासानें इतके परिश्रम करून हें
कां केलें? या शंकेला उत्तर असें आहे कीं, व्यासानें केलेल्या का
इतर कवींनीं केलेलें काव्य श्रेष्ठ होत नाहीं, श्रेष्ठ होण्यास समर्थ हो
हीं. ज्याप्रमाणें चार आश्रमांमध्यें गृहस्थाश्रमच श्रेष्ठ असून इतर आश्र
हस्थाश्रमाची बरोबरी करूं शकत नाहींत, त्याप्रमाणें व्यासाच्या का
बरोबरी करणारीं इतर काव्यें जगांत नाहींत; व पुढेंही याच्या बरो
काव्य कोणीही करूं शकणार नाहीं. सर्वांत हेंच काव्य श्रेष्ठ होईल
ब्रह्मदेवाचें वचन असल्यामुळें, व सर्व श्रेष्ठ कवींना हेंच काव्य उपजीव
ल असेंही वचन असल्यामुळें, पर्जन्य (पाऊस) जसा सर्व लोकांना उ
क आहे, त्याप्रमाणें हा भारतवृक्ष कविलोकांना उपजीवक आहे, अ
णण्यास कांहीं हरकत नाहीं. अर्थात् पुढें होणाऱ्या सर्व काव्यांला हें
व्य उपजीवक असल्यामुळें जगांत भारत श्रेष्ठ झालें आहे. दुसरें का
सें कीं, जरी यांत प्रत्यक्ष वर्णन कृष्णाचें आहे, तरी व्यंग्यार्थानें यां
शिवाच्या माहात्म्याचें वर्णनच जास्त दिसून येतें. ह्मणून जगांत स
काव्य श्रेष्ठ झालें आहे. अर्थात् यांतल्या व्यंग्यार्थाला प्राधान्य दिलें
वाच्यार्थाला प्राधान्य देतां येत नाहीं. कारण जगांत स्त्रियांच्या लाव

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

रब्रह्मत्वसंभावनावहो नारायणस्य निरतिशयमहिमा तस्यापि पूज्यतया सर्वत्र निबद्धस्य शिवस्य महिमा तदतिशायिसगुणपरब्रह्मभावरूपो महिमा व्यज्यमानः अयमेव वस्तुध्वनिरूपः स हि तत्र व्यज्यमानैर्भावपरसालंकारध्वनिभिरुपस्कृतः प्रधानतया प्रबंधुराशयस्थित उन्नीयत इति भावः ॥ अथ विधांतरेणापि भारते शिवस्य परब्रह्मभावव्यक्तिमाविष्करोति ॥ मोहाभिभूतमखिलं जगदाविरिंचं त्वामेकमेव भगवन् रहितं च तेन ॥ विख्याप्य मंकणकदिव्य कथानुषक्त्या त्वां ब्रह्म तेन च मुनिः स्फुटयांबभूव ॥२४॥ आरण्यपर्वणि तीर्थयात्राविधौ सप्तसारस्वततीर्थप्रसंगे यत्र मंकणकसिद्ध-

---

शी किंमत आहे, तशीच कवींच्या वाणीलाही किंमत आहे. असो. एकूण या सर्व विवेचनावरून असा सिद्धांत झाला कीं, भारतांत नारायणाचें माहात्म्य वाच्यरूपानें अतिशय दिसत असल्यामुळें नारायणालाच परब्रह्म ह्मणावें अशा अनेक कल्पना जरी मनांत येतात; तरी अशा नारायणानें शिवाची आराधना केली असें वर्णन पाहिल्यानंतर शिव सर्वांत श्रेष्ठ असून शिवच परब्रह्म आहे, असा निश्चय होतो. यामध्यें अतिशय वर्णिलेला सगुण परब्रह्म स्वरूप शिवाचाच महिमा श्लेषार्थ होय. हाच श्लेषार्थ भारतांत त्या त्या ठिकाणीं अलंकारांनीं व ध्वनींनीं पुष्ट झालेला आहे. यावरून प्रबंधकर्त्या व्यासाचा भावार्थ असाच दिसून येतो कीं श्रीशिवच सर्वोत्कृष्ट आहे; ह्मणूनच श्रीशिवाचें माहात्म्य व्यासानें भारतांत जिकडे तिकडे वर्णिलें आहे. असो. भारतांत शिवालाच परब्रह्मत्व सांगितलें आहे, असें दुसऱ्या अनेक प्रकारांनीं पुनः स्पष्ट करून सांगतात. कोणी एक कवि ह्मणतो कीं, (२४) हे शंकरा, ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत हें सर्व जग, तूं आहेस ह्मणून जगलें आहे. (तूं प्रत्यक्ष असतां जग सज्ञान असतें) जेव्हां तूं डोळे मिटून निजतोस तेव्हां हें जग मोहानें आंधळें होतें. (तूं नसल्यास जग मोहांत पडतें) अशी तुझी प्रसिद्धि मंकणकाच्या उत्तम कथेच्या अनुषंगानें करून, नंतर व्यासानें तूंच परब्रह्म आहेस असें स्पष्ट सांगितलें आहे. अरण्यपर्वामध्यें तीर्थयात्राविधानाच्या वेळेला सप्तसारस्वततीर्थ प्रसंगांत “ यत्र मंकण-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

इत्युपक्रम्य दर्भक्षताच्चस्य करतः शाकरसस्रुतिमुक्त्वा पठि
सवै शाकरसं दृष्ट्वा हर्षाविष्टो महातपाः ॥ प्रनृत्तः किल विप्र
स्मयोत्फुल्ललोचनः ॥२५॥ ततस्तस्मिन् प्रनृत्ते वै स्थावरं जं
यत् ॥ प्रनृत्तमुभयं वीर तेजसा तस्य मोहितम् ॥२६॥ ब्रह्मा
सुरैराजन् ऋषिभिश्च तपोधनैः ॥ विज्ञप्तो वै महातेजा ऋषे
राधिप ॥२७॥ यथा न नृत्यते विप्रस्तथात्वं कर्तुमर्हसि ॥ त
नृत्तमासाद्य हर्षाविष्टेन चेतसा ॥२८॥ सुराणां हितकामार्थम्
वोभ्यभाषत ॥ विभो महर्षे धर्मज्ञ किमर्थं नृत्यते भवान् ॥ ह
नं किमर्थं वा तवाद्य मुनिपुंगव ॥२९॥ ऋषिः ॥ किं न प
मे देव कराच्छाकरसस्रुतिम् ॥ यां दृष्ट्वा हं प्रनृत्तो वै हर्षेण

कः सिद्धः" असा उपक्रम करून दर्भानें कापलेल्या मंकणकाच्या हा
रक्तस्राव न होतां शाकाच्या रसाचा स्राव (भाजीपाल्याच्या रसाचा
झाला असें वर्णन करून, पुढें ती कथा अशी सांगितली आहे कीं,
तो महातपस्वी मंकणक मुनि आपल्या हातापासून होत असलेल्या
रसाच्या स्रावाला पाहून अतिशय संतुष्ट झाला; व विस्मयानें त्याचे डो
फुल्लित होऊन, तो मन मानेल त्याप्रमाणें नाचूं लागला. (२६) जेव्हां
नि हर्षानें नाचूं लागला, तेव्हां सर्व स्थावर जंगम जग त्याच्या तेजा
हित होऊन नाचावयाला लागलें. (२७) नंतर हे नरश्रेष्ठा राजा,
षीकरितां ब्रह्मादि देवांनीं व तपोधन अशा मोठमोठ्या ऋषीश्वरांनीं
जस्वी श्रीशिवाची प्रार्थना केली. (२८) हे देवा, तूं हा ब्राह्मण ना
नाहीं असे कर. याप्रमाणें त्यांचें वाक्य ऐकून आनंदयुक्त मनानें नाच
त्या मंकणकाजवळ श्रीशिव आले. (२९) व एकूण एक देवांच्या हि
रितां मंकणकाला श्रीशिवानें असें ह्मटलें कीं, हे मुनिश्रेष्ठा, तूं असा
तोस कां ? आज असा मोठा आनंद तुला कोणता झाला ? सांग.
ऋषि ह्मणतो, हे देवा, या माझ्या हातांतून कशाचा स्राव होतो, हें
हत नाहींस काय ? माझा हात दर्भानें कापला पण त्यांतून रक्त न
भाजीचा रस पडावयास लागला, ह्मणून अति विस्मय व आनंद वा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

न्वितः ॥३०॥ तं प्रहस्याब्रवीद्देवो मुनिं रागेण मोहितम् ॥ अहं वै विस्मयं विप्र दर्शयाम्यत्र पश्य माम् ॥३१॥ एवमुक्त्वा नरश्रेष्ठ महादेवेन वै तदा ॥ अंगुष्ठाग्रेण राजेंद्र स्वांगुलिस्ताडिता भवत् ॥३२॥ ततो भस्मक्षताद्राजन्निर्गतं हिमसन्निभम् ॥ तत् दृष्ट्वा व्रीडितो राजन् स मुनिः पादयोर्गतः ॥३३॥ इति ॥ अत्र ब्रह्मादिस्थावरांतस्य सकलस्य जगतो मंकणकनृत्तेन मोहउक्तः मोहवन्मंकणकवदवशा न्नृत्यतां ब्रह्मादीनां प्रार्थनया शिवेन मंकणकनृत्तस्य विरामः कारित इत्युक्त्वा शिवस्य ब्रह्मादिवन्मोहो नास्तीति व्यंजितम् ॥ अन्यथा त्वयं ततो मोहवशं गतस्य तद्विरामकरणसामर्थ्यासंभवेन शिवं प्रति देवानां तद्विरामकरणप्रार्थनानुपपत्तेः ॥ देवाः सर्वे मोहवशं गताः ब्रह्मैकं मोहानभिभूतमिति सर्वं संप्रतिपन्नम् अतो मोहतदभावकृताद्विशेषादेवाः सर्वे जीवाः शिवएव परंब्रह्मेति वेद-

---

नाचतों. (३१) असें बोलणाऱ्या व लोभानें मोहित झालेल्या त्या ऋषीला पाहून हंसून शिव ह्मणाले, हे मुने, आतां मी याच्याहीपेक्षां अत्याश्चर्य येथें तुला दाखवितों, पहा. (३२) असें बोलून महादेवानें आपल्या हाताच्या अंगोठ्यानें इतर बोटांला मारलें. (३३) तेव्हां त्या हाताला भस्म लाविलें होतें, त्या भस्माच्या आघातानें अंगुलीला व्रण पडून त्या व्रणापासून सोन्यासारखें एक तेज दिसावयास लागलें. तें पाहून तो मुनि लाजून शिवाच्या पायावर पडला. अशी मंकणकाची कथा होय. या मंकणककथेंतला सारांश असा निघतो कीं, मंकणकाच्या नाचण्यानें ब्रह्मदेवापासून स्थावरापर्यंत सर्व जगाला भ्रम झाला, त्यामुळें अवश (परतंत्र) होऊन ब्रह्मादिदेव नाचावयास लागले, असा आपल्याला झालेला भ्रम पाहून ब्रह्मादि देवांनीं शिवाची प्रार्थना केली मग शिवानें त्या मंकणकास प्रसन्न होऊन त्याचें नाचणें थांबविलें. अशा प्रकारच्या या कथेवरून ब्रह्मादि देवांप्रमाणें शिवास कांहीं मोह झाला नाहीं, असें अर्थात् सिद्ध झालें. नाहींतर इतरांप्रमाणें शिवालाही मोह झाला असता, तर शिवाकडून मंकणकाचें नाचणें थांबविणें झालेंच नसतें. अर्थात्, सर्व देव मोहित झाले, शिवपरब्रह्म एकच मोहरहित राहिलें. असेंच ह्मणणें सयुक्तिक दिसतें. ह्मणूनच व्यासानें असा सिद्धांत केला कीं, सर्व देव

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

व्यासो विभावयामासेत्यर्थः अत्रस्वदृढगमकत्वेन तद्वाक्यशेष मर्थं गृण्हाति ॥ तस्माच्च मोहतदभावकृताद्विशेषाज्जन्मस्थिति यभागखिलं त्वदन्यत् ॥ तत्कर्तृवस्तुपरमं त्वमिति प्रबोधं जा भावयति तस्य तदीयवाचा॥३४॥शिवस्य पादयोः प्रणिपातान दं मंकणकवचनं पठितम् ॥ नान्यं देवमहं मन्ये रुद्रात्परतरं सुरासुरस्य जगतो गतिस्त्वमसि शूलभृत् ॥३५॥ त्वया सृष्टि वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ त्वामेव भगवन् सर्वे प्रविशंति ॥३६॥ देवैरपि न शक्यं ते परं ज्ञातुं कुतो मया ॥ त्वयि सं श्यंते सुरा ब्रह्मादयोऽनघ॥३७॥सर्वस्त्वमसि लोकानां कर्ता यिता च ह ॥ त्वत्प्रसादात्सुराः सर्वे निवसंत्यकुतोभयाः इति॥ अत्रशिवस्य सकलजगत्सर्गप्रळयावधि सार्वात्म्याद्युक्त

मोहित झाल्यामुळें ते सर्व जीव असें ह्मणवून घेत असून मोहरहित हाच परब्रह्म होय. या तऱ्हेचा व्यासाचा जो निश्चय झाला, तो प्रमाण ठेवून, कवि पुढील वाक्याचा शेष पुरा करतो (३४) ज्या काणीं मोह नाहीं, अशा शिवपरब्रह्माकडूनच सृष्टि, पालन, संहार व में होतात, हे शिवा, तुझ्याशिवाय कर्तृवस्तु जगांत कोणतीही नाहीं. कटाच आनंदस्वरूप आहेस, असें व्यासाच्या वाणीनें स्पष्ट ह्मटलें असो, मंकणकानें शिवास नमस्कार केल्यानें तर पुढें काय गोष्ट घ ली तिकडे आतां पाहूं. (३५) मंकणक ह्मणतो. श्रीरुद्रापेक्षां मोठा सरा कोणी नाहीं. हातांत शूल धरलेल्या हे शिवा, देवदैत्यादि सर्व गति देणारा तूं एकटाच आहेस. (३६) हे देवा, जें हे चराचर उत्पन्न केलेंस, तें सर्व त्रैलोक्य प्रलयकालाच्या वेळीं तुझ्या पोटांतच (३७) तुझें (परतत्वाचें) ज्ञान करून ध्यावयास देव देखील सम नाहींत, मग माझी त्यांच्यापुढें काय कथा आहे ? हे निर्दोषा शिवा, दि सर्व देव तुझ्या पोटांत राहतात. (३८) सर्व लोकांचा कर्ता तूं लोकांकडून कर्म करविणारा तूंच आहेस. तुझ्या अनुग्रहामुळें सर्व दे रहित होऊन जगांत खुशाल राहतात. अशी ही गोष्ट होय. यावरू स्थिति लय वगैरे कर्मांचा अधिकार शिवाकडेच आहे, व शिवच

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

एव परंब्रह्मेति निश्चिकाय मंकणक इत्युन्नीयते तन्निश्चयश्च न भस्मनिर्गमनकृतः ॥ शाकरसनिर्गमनवद्विस्मयहेत्वाकर्षवृत्तत्वेनान्यथासिद्धेः ॥ किंतु ममनृत्तं दृष्ट्वा सर्वस्मिन्नपि जगत्याहिरण्यगर्भं मोहिते त्यत्यपि शिवो मोहराहित्यान्नृत्यरहित एव स्वयं मत्समीपमागत्य न्नृत्योपरतिमचीकरदित्येवं शिवस्य मोहाभावनिश्चयः कृतः अतो कणकवचनमुखेनापि शिवएव परंब्रह्मेति विभावयामासेत्यर्थः अत्र र्वश्लोकप्रकृतो मुनिः कर्त्ता ॥ एवं मंकणककथोदाहरणेन शिवस्य रब्रह्मभावाभिव्यक्तिराविष्कृता ॥ क्वचित्कृष्णवृत्तांतोदाहरणेनापि ामाविष्करोति कैलासशैलशिखरे हरिपार्थदृष्टं त्वां ब्रह्मनाथपरमं मुदीर्य साक्षात् ॥ तल्लक्षणं त्वयमनन्यतदीयधर्मक्रांते कियच्च भ-

---

आहे, असें सिद्ध झालें. असें मंकणकानें ह्मटल्यावरून अर्थात् शिवच परब्रह्मवस्तु आहे, असाच निश्चितार्थ मंकणकाचा असला पाहिजे असा यांतून अन्यर्थ निघतो. मंकणकाचा जो निश्चय झाला, तो शिवाच्या हातांतल्या भस्मनिर्गमनानें मुळींच झाला नाहीं. जेव्हां आपल्या (मंकणकाच्या) हातांतून शाकरस निघाला, तेव्हां तें पाहून ब्रह्मादिदेव ज्याप्रमाणें मोहित झाले त्याप्रमाणें शिव कांहीं मोहित झाले नाहींत, व शाकरसाचा विस्मयही शिवाला वाटला नाहीं. व माझें (मंकणकाचें) नर्तन पाहून ब्रह्मादि देवापासून स्थावरापर्यंत जसें सर्व जग मोहित झालें, तसा शिव मोहित झाला नाहीं; ह्मणूनच शिवाच्या ठिकाणीं मोहाच्या अभावाचा निश्चय मंकणकानें केला. अशा प्रकारच्या मंकणक वचनावरून शिवच परब्रह्मवस्तु आहे, असें व्यास मुनींनें ठरविलें. या मंकणक कथेच्या उदाहरणानें शिवाच्या ठिकाणीं परब्रह्मत्व प्रकट केल्याप्रमाणें झालें. याखेरीज कांहीं कांहीं कृष्णाच्या चरित्राच्या उदाहरणांवरून देखील शिवच परब्रह्म आहे, असें स्पष्ट करून दाखवितात. (३९) कवि ह्मणतो कीं, हे शिवा, कैलास पर्वताच्या शिखरावर कृष्णार्जुनांनीं जेव्हां तुला पाहिलें, तेव्हां तुला त्यांनीं हे नाथा, हे ब्रह्मस्वरूपा, हे श्रेष्ठा, असें ह्मणून, त्यांनीं अशीं अनेक विशेषणें तुला दिलीं. परब्रह्माचे जे गुण आहेत, ते तुझ्याशिवाय दुसऱ्या देवांच्या ठिकाणीं नसल्यामुळें, व परब्रह्म वस्तूचीं लक्षणें जीं असावींत, तीं तुझ्याच ठिकाणीं कृष्णार्जुनांनीं पाहिल्यामुळें त्यांनीं तुला हे “परब्रह्म”

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

व्रति स्फुटमाचचक्षे ॥३९॥ कृष्णार्जुनौ पाशुपतास्त्रसंधानप्र
शेषाभिज्ञानाय यदा कैलासं गतौ तदा तन्महिमावर्णनमेवं
कृतं ॥ स्तूयमानं स्तवैर्दिव्यै ऋषिभिर्ब्रह्मवादिभिः ॥ गोप्तारं
कानामिष्ट्वा सवरमच्युत्तम् ॥४०॥ वासुदेवस्तु तं दृष्ट्वा जगाम
सा क्षितिम् ॥ पार्थेन सह धर्मात्मा गृणन् ब्रह्म सनातनम् ।
लोकादि विश्वकर्माणमृषिमीशानमव्ययम् ॥ तमसः परमं
खवायुज्योतिषां गतिम् ॥४२॥ स्रष्टारं वारिधाराणां भुवश्च
पराम् ॥ देवदानवयक्षाणां मनुष्याणां च शासकम् ॥४३॥
परमं ब्रह्म व्यक्तं वेदविदां निधिम् ॥ परापरस्य स्रष्टारं प्रतिह
च ॥४४॥ कालकेयं महात्मानं शक्रसूर्यगुणोदयम् ॥ ववंदतुस्त

असें स्पष्ट ह्मटलें. अर्थात् कवीनेंही या वचनावर विश्वास ठेवून शिव
परब्रह्मा" असें विशेषण दिलें. जेव्हां कृष्ण आणि अर्जुन हे दोघे
अस्त्राच्या संधानाचें ज्ञान करून घ्यावयास कैलासावर गेले, तेव्हां
वाच्या माहात्म्याचें कवीनें असें वर्णन केलें आहे. (४०) सर्व लोकां
ण करणारा, च्युति नसलेला, व उमेसहित अशा शिवाला उद्देशून
रून ब्रह्मवादी अशा ऋषींनीं शिवाचें उत्तम स्तोत्र केलें. (४१) ते
पाहून वासुदेवानें पार्थासहित, शिवाला साष्टांग नमस्कार केला. आ
सनातन परब्रह्माची स्तुति केली. (४२) चौदा लोकांसह जगाची सृ
रणाऱ्या हे शिवा, तूं ऋषि असून ईश आहेस, व नाशरहित आहेस.
गाढ अंधकाराच्या पलीकडे असून उत्तम प्रकाशस्वरूप आहेस. आ
काश, वायु, नक्षत्रगण यांना गति देणारा आहेस. (४३) पर्जन्य
तूंच असून भूमीची सृष्टि करणारा तूंच आहेस; व श्रेष्ठ प्रकृति तूंच
न देव, दानव, यक्ष, मानव यांना शासन करणारा तूंच आहेस. (४
गी लोकांना परब्रह्मस्वरूप दिसणारा तूंच असून व्यक्ततत्व तूंच
व वेदवेत्ते लोकांचा विधि तूंच असून परापर जगाची सृष्टि करणारा
आहेस. व या जगताचा संहार करणाराही तूंच आहेस. (४९) का
नांवाचा महात्मा तंच असून इंद्राच्या व सूर्याच्या ठिकाणीं असलेल्या

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ष्णौ वाङ्मनोबुद्धिकर्मभिः ॥४५॥ यं प्रविश्यंति विद्वांसः सूक्ष्मा-ध्यात्मनिदर्शनात् ॥ तमजं कारणात्मानं जग्मतुः शरणं भवम् ॥४६॥ इति ॥ अत्रयोगिनां परमं ब्रह्मेति कंठतः शिवस्य परब्रह्मभाव उक्तः तदुपासनार्थं परमानंदरूपत्वं ब्रह्मणः स्वरूपलक्षणं तत्र व्यक्तम् वेद-विदां निधिमित्यनेन दर्शितम्॥अतिदरिद्रस्य पुरस्तादकस्मादाविर्भू-तो हि महान्निधिः साक्षात्कृतस्य निरतिशयब्रह्मानंदस्य उपमानतया वक्तुमुचितः॥वस्तुतस्तस्य निधेरुपमेयापेक्षया हीनत्वेपि लोकदृष्ट्या त-दपेक्षया अधिकाभावात् आकाशवत्सर्वगतश्च नित्य इतिवदुपमानतया निवेशनं युक्तमिति तदात्मतया ब्रह्मानंदस्य निरूपणं तमसः परमं-

---

चा उदय करणारा तूंच आहेस. अशी त्या शिवाची स्तुति करून कृष्णा-र्जुनांनीं वाणीनें, मनानें, बुद्धीनें, कर्मानें शिवाला नमस्कार केला. (४६) वि-द्वान् लोक जी सूक्ष्म अध्यात्मवस्तु (परब्रह्मवस्तु) निदर्शनाला आणून घे-ऊन ज्या शिवपरब्रह्माच्या शरीरांत शिरतात, त्या कारणात्म्या शिवाला हे दोघे (कृष्ण आणि अर्जुन) शरण गेले. (असें हें वर्णन त्यावेळचें होय) या वर्णनामध्यें योगी लोकांनीं शिवाला "परब्रह्म" असें स्पष्ट आपल्या कं-ठरवानें ह्मटलें आहे. त्या परब्रम्ह्याची उपासना करण्याकरितां आनंदरूपत्व नांवाचें ब्रम्ह्याचें लक्षण त्याच्या ठिकाणीं स्पष्ट दाखवून दिलें. हें "वेदवि-दांविधि" या वाक्यावरून सिद्ध झालें. जगामध्यें एखाद्या दारिद्र्याला सहज द्रव्याचा एक मोठा निधि सांपडला तर त्या दारिद्र्याला प्रत्यक्ष ब्रह्मानंद झा-ल्याप्रमाणें वाटतें. अर्थात् या उपमेयावरून ब्रह्मानंदामध्यें इतर आनंदांपेक्षां कांहीं अतिशय गुण आहे, असें सिद्ध होतें. असो. यांत खरा विचार केला असतां ब्रह्मानंदरूप उपमानाला कोणत्याही उपमेयाची अपेक्षा नाहीं, तथा-पि लोकदृष्टीनें पाहिलें असतां यांत कांहीं विशेष आहे, असें कांहीं वाटत नाहीं. ज्याप्रमाणें " आकाशवत्सर्वगतश्च नित्यः " यांतल्या उपमानावरून परब्रम्ह्याच्या ठिकाणीं नित्यत्वाचें प्रतिपादन करतात, त्याप्रमाणें ब्रह्मानंदरूप उपमानाला विधिरूप उपमेयाची अपेक्षा आहे, असें ह्मटलें असतां कांहीं बाध येत नाहीं. कारण लोकदृष्टीनें वस्तुतः या उपमानाला (जरी उपमेयाच्या अपेक्षेनें रहित आहे तरी) त्या उपमेयानें बाध येत नाहीं, ह्मणून मागें सां-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ज्योतिरिति श्लोकेन नित्यमुक्तत्वरूपब्रह्मधर्मप्रदर्शनपूर्वकम् आ
आकाशइत्यादिश्रुतिसिद्धं वियदादिकारणत्वरूपं तटस्थलक्षणं द
र्शितम् ॥ अन्ये चाध्यात्मवित्दृश्यमानत्वगोप्तृत्वशासकत्वादयः
ब्रह्मधर्मा वर्णिताः ब्रह्मसनातनमिति शिव एवोक्तः यदि वा
उभयथापि परब्रह्मरूपत्वं तद्धर्मः प्रणवार्थत्वं वा तेन दर्शितम्॥
प्रदेशांतरेऽपि कृष्णवृत्तांतेन तदभिव्यक्तिमाविष्करोति नाराय
सुचिरं त्वदुपासकस्य यद्ब्रह्मभावमवदत्तत्र भावनाप्तम् ॥ यच्चे
तदुदितां परभावगर्भां त्वां ब्रह्म तेन च मुनिः स्फुटयांचकार ॥

गितलेंच आहे. त्याला " आकाशवत्सर्वगतश्च नित्यः " असें दुसरें
रण दिलेंच आहे. त्या अर्थानें या ब्रह्मानंदाचें निरूपण केलें आहे.
त्याप्रमाणेंच " तमसः परमं ज्योतिः " या श्लोकानें ब्रह्मवस्तूमध्यें असण
" नित्यमुक्तत्वरूप " धर्माचें निदर्शन केल्याप्रमाणें झालें. तसेंच " अ
आकाशः " या श्रुतीनें सांगितल्याप्रमाणें आकाशादि पदार्थाला कारण
ब्रह्म आहे अशा अर्थाचें दुसरें ब्रम्ह्याचें लक्षणही त्यांत दाखविलें आहेच.
सरे कांहीं लोक परब्रम्ह्याचे धर्म सांगतात कीं, ब्रह्मवस्तु ही जगाचें
करणारी असून दुष्टांना शासन करिते, असें अध्यात्म जाणणारे सांग
असें ज्या ब्रम्ह्याच्या धर्माचें वर्णन केलें आहे, ते धर्मही " ब्रह्मसनातन
या वाक्यानें शिवाच्या ठिकाणीं आहेत असें सिद्ध झालें. किंवा शिव ह
णवरूप आहे असें जें दुसरें वर्णन केलें आहे, त्यावरूनही शिवाच्या ठि
णीं सर्व परब्रम्ह्याचे धर्म आहेत, असें सिद्ध झालें असो. आतां दुसऱ्या
काणीं असलेल्या कृष्णचरित्रांवरून शिवाच्या ठिकाणीं परब्रह्मत्व येतें
स्पष्ट करून दाखवितात. कवि ह्मणतो कीं, (४७) हे शिवा, पुष्कळ का
पर्यंत तुझी सेवा करणाऱ्या नारायणाला कांहीं लोक परब्रह्म ह्मणतात,
थापि त्या नारायणानें परब्रह्म गुणगर्भित स्तुति तुला उद्देशून केली, य
ळें त्या व्यास महामुनीनें भारत ग्रंथांत तुझ्याच ठिकाणीं परब्रह्मत्व स्पष्ट
रून दाखविलें. तें असें; द्रोणपर्वांत मैनाक पर्वतावर नारायणानें तप
केल्याचें जें वर्णन आहे, तेंच आतां दाखवितों, असें कवि ह्मणतो. तें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

द्रोणपर्वणि नारायणस्य मैनाके तपश्चर्योक्ता ॥ ऊर्ध्ववाहुर्महातेजा ज्वलनादित्यसंनिभः॥ षष्टिवर्षसहस्राणि तावंत्येव शतानि च॥४८॥ व्यशोषयत्तदात्मानं वायुभक्षोंबुजेक्षणः ॥ अथापरं तपस्तप्त्वा द्विस्ततोन्यत्पुनर्महत् ॥४९॥ द्यावापृथिव्योर्विवरं तेजसासमपूरयत् ॥ स तेन तपसा तत्र ब्रह्मभूतो यथा भवेत् ॥५०॥ इति ॥ अत्रतपश्चर्याकाले शिवं ध्यायतो नारायणस्य शिवोहंभावभावनाभावितः शिवभावएव ब्रह्मभूत इत्यनेनोक्तः ततोन्यस्य तेन प्राप्यस्य ब्रह्मभावस्याभावात् अतएव तपसा प्रसन्ने शिवे प्रत्यक्षे सति नारायणेन वहुधा परब्रह्मधर्मैस्तवः कृतः॥स जानुभ्यां महीं गत्वा कृत्वा शिरसि चांजलिम् ॥ पद्माक्षस्तं विरूपाक्षमभितुष्टाव भक्तिमान् ॥५१॥ त्वद्भूता वै भूतकृतो वरेण्यगोप्तारो ये भुवनस्यास्य गोपाः ॥ प्रविश्येमां

न असें. (४८) बाहू ऊर्ध्वभागीं करणारा, मोठा तेजस्वी दिसणारा अग्नि किंवा सूर्य याप्रमाणें दिसणारा, अशा कृष्णानें साठ हजार वर्षेंपर्यंत व तितकींच शतकें वर्षेंपर्यंत तपश्चर्या केली. त्या कमलनेत्रानें (४९) वायुभक्षण करून शरीर कृश केलें. नंतर पुनः त्याच मासल्याचें दुसरें मोठें तप केलें. (५०) आपल्या तेजानें पृथ्वी व आकाश यांतलें छिद्र व्यापून टाकिलें. त्या तपानें हें एक दुसरें ब्रह्मच आहे कीं काय, असा तो कृष्ण त्यावेळेस दिसावयास लागला. (असें हें तपश्चर्येचें वर्णन होय.) या वर्णनामध्यें तपश्चर्येच्या वेळेस मीच शिव आहें अशी भावना ठेवून शिवाचें ध्यान करणारा तो कृष्ण शिवपरब्रह्मस्वरूप झाला, असें सांगितल्याप्रमाणें झालें. कारण त्या शिवावांचून इतराच्या ठिकाणीं ब्रह्मत्वाचा अभावच सांगितला. (शिवाची प्राप्ति कृष्णाला करून घ्यावयाची होती) ह्मणूनच शिव जेव्हां प्रसन्न झाले, तेव्हां नारायणानें प्रायशः परब्रह्मधर्मांनींच शिवाची स्तुति केली. ती स्तुति अशी. (५१) जमिनीवर गुडघे टेंकून दोनी हात जोडून भक्तिमान् कमलाक्षानें भक्तीनें विरूपाक्षाची स्तुति केली. (५२) हे शिवा, तुझ्यापासून उत्पन्न झालेले हे ब्रह्मादि देव तुझ्या अनुग्रहानें जगाला उत्पन्न करतात, व तुझ्यापासून उत्पन्न झालेले माझ्यासारखे लोक जगाचें पालन करतात, व या पृथ्वीवर येऊन जे पृथ्वीचें पालन करतात, व अनेक नगरांचें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

धरणीं येष्वरक्षन् पुरा पुराणी तव देवसृष्टिः॥५२॥शक्त्या लोका
ति यथा पृथक्त्वं ताभिश्चैक्यं संक्षये यांति भूयः ॥ एवं विद्वा
भवं चाप्ययं च त्वसंभूतं तव सायुज्यमेति ॥५३॥ भूतं भव्यं
वि यच्चाप्यदृष्टं त्वत्संभूताः सप्त इमे हि लोकाः॥भक्तं च मां भ
भजस्व प्रीत्या मां वै लोकपितर्महेश ॥५४॥ इति ॥ एवं ना
शिवाहंभावभावनाभावितशिवभावं व्यंजितवानित्यर्थः॥ अथ
निरुपपदब्रह्मपदप्रयोगकृतांतस्य परब्रह्मभावाभिव्यक्तिमाविष्का
मूलं कृष्णो ब्रह्म च ब्राह्मणाश्चेत्यादावेवं ब्रह्मभावं महेश ॥
र्थानां ते नित्यसंरक्षकस्य व्यासस्तत्रोद्धाटयामास शंभो ॥ भा

रक्षण करतात, त्या सर्व लोकांना तूं उत्पन्न केलेंस; ह्मणजे ही तुझी
ष्टि आहे. (९३) तुझ्या शक्तीमुळें लोक ज्याप्रमाणें निरनिराळे होतात,
चप्रमाणें तुझ्या शक्तीमुळें प्रलयकालीं ते सर्व पुनः ऐक्याला पावतात
प्रमाणें उत्पत्ति नाशाला कारणीभूत असणाऱ्या अशा तुझें, तुझ्या स
व तूं करीत असलेल्या लयाचें ज्ञान जे करून घेतात, त्यांना तुझें सा
मिळतें. (९४) भूत, भव्य, व अदृष्ट असें भावि (मागें झालेलें, आतां
णारें, व न पाहिलेलें असें पुढें होणारें) हें सर्व तुझ्यापासूनच होतें;
हे सात लोकही तुझ्यापासूनच झालेले आहेत; अशा हे ईशा, लोक
शिवा, तूं तुझी सेवा करणाऱ्या भक्ताचा ह्मणजे माझा प्रीतीनें
कार कर. अशी शिवाची स्तुति नारायणानें केली. याप्रमाणें शिवाहं
भावनेनें (मीच शिव आहे, अशा भावानें) कृष्णानें स्तुति केल्यामुळें
ष्णाच्या ठिकाणीं शिवत्व प्राप्त झालें, असें श्लेषार्थानें सिद्ध झालें. आ
पपदरहित ब्रह्मपदाचा प्रयोग करून कवि शिवाच्या ठिकाणीं परब्रह्म
आविष्करण करतो. कवि ह्मणतो! हे शंभो, हे महेशा, परब्रह्मस्वरूपी
तो कृष्ण आहेस, व ब्राह्मणांमध्यें ब्रह्मत्व जें आहे, तें तुझ्या ठिकाणीं
लेलेंच आहे. असें व्यासानें ब्रह्मत्वप्रतिपादन करून त्या भावानें पां
निरंतर संरक्षण करणाऱ्या कृष्णस्वरूपी तुझ्याठिकाणीं ब्रह्मत्व प्रकट
आहे. हेंच भारताच्या आरंभीं व्यासानें सांगितलें आहे. तें असें. (९५)

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

क्रमे॥युधिष्ठिरो धर्ममयो महाद्रुमः स्कंधोऽर्जुनो भीमसेनोऽस्य शाखा॥माद्रीसुतौ पुष्पफले समृद्धे मूलं कृष्णो ब्रह्म च ब्राह्मणाश्च ॥५५॥ ति ॥ युधिष्ठिरस्य द्रुमत्वरूपणे कृष्णवद्ब्राह्मणवच्च ब्रह्मपदेनोक्तः ॥ कश्चिन्मूलत्वेन निरूपितः ॥ कृष्णस्य ब्राह्मणानां च मूलत्वनिरूपणे युधिष्ठिरराजभावहेतुत्वं निमित्तं तच्च सर्वविधसाहाय्यकादिना तदीराज्यप्राप्तिहेतोः श्रीकृष्णस्य सुप्रसिद्धमेव ॥ ब्राह्मणानां तु जयाशेषा तत्प्रसिद्धम् ॥ आरण्यपर्वण्यरण्यं प्रस्थिते युधिष्ठिरे तमनुव्रजः अग्निहोत्रादिसहितान् भोजयितुमशक्त्या निवर्तध्वमिति तेन प्रार्थितानां ब्राह्मणानां॥ स्वयमाहृत्य वन्यानि अनुयास्यामहे वयम् ॥ नुध्यानेन जप्येन विधास्यामः शिवं तव ॥५६॥ इति वचनेन त-

---

राज हा धर्मरूपी वृक्ष असून अर्जुन हा त्या झाडाचा स्कंध आहे. भीम त्या झाडाची शाखा असून नकुल सहदेव हे त्या झाडाचीं भरपूर फळें लें आहेत. अशा त्या धर्मरूपी झाडाला कृष्ण, ब्रह्म व ब्राह्मण (किंवा ब्रह्मस्वरूपी कृष्ण व ब्राह्मण) मुळाच्या जागीं आहेत. हाच आरंभाचा श्लोक य. यामध्यें धर्मराजाला वृक्षाच्या जागीं कल्पून ब्रह्मस्वरूप कृष्ण व ब्राह्मण ना मुळाच्या जागीं कल्पिलें आहे! धर्मराजाला राज्य मिळावयास मूलकारण कृष्ण व ब्राह्मण आहेत, असें यावरून सिद्ध झालें. कारण सर्व प्रकारें सहाय देऊन श्रीकृष्णानेंच राजाला राज्य मिळवून दिलें असें प्रसिद्धच आहे. व ब्राह्मणांनीं धर्माला राज्य मिळण्याविषयीं अनेक जयदायक आशीर्वाद दिले असेंही प्रसिद्ध आहे. अरण्यपर्वामध्यें धर्म हा अरण्यांत गेल्याचें वर्णन जेव्हां केलें आहे, तेव्हां असें वर्णन केलें आहे कीं, अरण्यांत जाणाऱ्या धर्माबरोबर ब्राह्मणही आपल्या अग्निहोत्रासह निघाले; तेव्हां धर्मानें त्या ब्राह्मणांना ह्मटलें कीं, ब्राह्मणहो, यावेळेस तुह्मांला भोजन घालावयास मी अशक्त आहें, याकरितां तुह्मी परत जा. असें धर्माचें भाषण ऐकून ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, (५६) हे राजा, आह्मी स्वतः वनांतलीं कंद, मुळें, फळें आणून उदरनिर्वाह करून तुझ्याबरोबर वनांत राहूं. व तेथें परमेश्वराचें ध्यान व जप करून तुझें कल्याण चिंतन करूं. असें बोलून ब्राह्मण त्या

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

थैवानुव्रजनेन पश्चादादित्यात्ताम्रपात्रं लब्ध्वा तत्रापाकतः सप्
प्रतिलभ्य तेषां सर्वेषां भरणवचनेन प्रीयमाणानां तज्जयमाशा
नां तेषां ॥ ब्राह्मणानां सहस्राणि स्नातकानां महात्मनाम् ॥
मोक्षविदां तद्दृशान् बिभर्ति युधिष्ठिरः ॥५७॥ इति तदुपरितन
यांतरगतसंख्यावचनेन व्यक्तीकृतमेतत् एवमेव ब्रह्मपदोक्तेनां
ह्मपदार्हेण तद्राज्यप्राप्तिकारिणा भवितव्यम् वेदतपसी यद्यां
ज्यप्राप्तिहेतुधर्मानुष्ठानप्रमितिद्वारेण अपूर्वद्वारेण च तद्राज्य
कारिणी तथापि चेतनमध्यपाठो नाचेतनयोर्युक्तः प्रायः पाठवि
त् ॥ अतः शिवएव तत्र ब्रह्मपदेनोक्तो ज्ञायते तस्य हीतरापेक्ष
धिकं सकलशत्रुवधद्वारा तदीयराज्यप्राप्तिहेतुत्वं भारतएवारण

राजाच्या मागोमाग गेले. नंतर धर्मानें सूर्यापासून तांब्याचें पात्र
त्या पात्रांत स्वयंपाकाप्रमाणें तयार असलेलें समृद्ध (यथेच्छ) अन्न
तो धर्म त्या ब्राह्मणांना भोजन घालीत असे. त्या योगानें ते संतुष्ट
धर्माला जयाशीर्वाद देऊं लागले. भारतांतील पुढील अध्यायांत हा
श्लोक आहे. (५७) व्रत करणारे, महात्मे, मोक्ष जाणणारे दहा हजार
धर्माजवळ होते; अर्थात् त्या सर्वांचें पालनपोषण धर्म करीत असे
श्लोक होय. यावरून व याच्यापुढें जे अध्याय असतील, त्या अध्या
ब्राह्मणांची संख्या सांगितली आहे, त्या संख्येवरून आह्मी मागें केले
द्धांत स्पष्ट केल्याप्रमाणें झालें. याप्रमाणें ब्रह्मपद सांगितल्यामुळें त्या
राज्य मिळावयास ब्रह्मच कारण झालें, असें ह्मटलें पाहिजे. ब्राह्मणां
श्चर्या व वेदपठन हीं धर्माचें राज्य मिळावयास कारण झालीं असें
णतां येईल, तरी जें काम चेतना असणाऱ्या प्राण्यांकडून व्हावयाचें
चेतनाकडून कसें होईल ? अशी शंका येत असल्यामुळें अचेतन वेद
कारणत्व दिलें नाहीं. व कदाचित् असें ह्मटलें तर प्रायशः पाठवि
ण्याचा संभव आहे. याकरितां " ब्रह्म " या पदानें " शिव " असा
घ्यावा, असें सयुक्तिक दिसतें. ह्मणून इतरांपेक्षां शिवालाच राज्यप्राप्ति
रणत्व देणें अधिक श्रेयस्कर दिसतें. कारण शिवानेंच सर्व शत्रूंच्या
कारणीभूत अशीं शस्त्रास्त्रें दिलीं आहेत असें वर्णन आहे. त्याप्रमाणें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

किरातार्जुनीये द्रोणपर्वणि कैलासगमने तत्रैव शतरुद्रीये सौप्तिके पर्वणि शांतिपर्वणि आश्वमेधिकपर्वणि अन्यत्रापि तत्र तत्र च सुप्रसिद्धम् तानि वचनानि ब्रह्मतर्कस्तवविवरणे समुदाहृतानि दृष्टव्यानि तेन ब्रह्मचेति कृष्णस्यैव विशेषणमस्त्वित्यपि शंका निरस्ता॥ कृष्णादप्यधिकतरं पांडवसंरक्षकस्य शिवस्य मूलत्वनिरूपणे ग्रहणावश्यंभावात् ॥ अथ शिवस्य ब्रह्मविष्ण्वादिसृष्टिप्रलयकर्तृत्ववचनैरपि तस्य परब्रम्हभावाभिव्यक्तिमाविष्करोति ब्रम्हा विष्णुः शंकरश्चेति शिवाः कर्तारो ये सर्गरक्षालयानाम् ॥ तेषां सृष्टिं संहृतिं च त्वदिच्छाधीनामूचे द्योतयन् ब्रम्हतत्त्वम् ॥५८॥ शिवस्य त्रिमूर्तिस्रष्टृत्व आनुशासनिके प्रतिपादितम् ॥ स एष भगवानीशः सर्वतत्वादिरव्ययः ॥ सर्वतत्वविधानज्ञः प्रधानपुरुषेश्वरः ॥५९॥ सोऽसृजद्दक्षिणादंगाद्ब्रम्हाणं लोकसंभवम् ॥ वामपार्श्वात्तथा विष्णुं लोकरक्षार्थ

तांतलें अरण्यपर्व, किरातार्जुनीय, द्रोणपर्वांतलें कैलासगमन, तेथलेंच शतरुद्रीय, सौप्तिकपर्व, शांतिपर्व, आश्वमेधिकपर्व, वगैरे ठिकाणीं व इतर पुष्कळ ठिकाणीं असेंच प्रसिद्ध झालें आहे. तीं तीं वचनें ब्रह्मतर्कस्तवविवरणांत सांगितलीं आहेत, तेथें पहावींत. यावरून ब्रह्मपद कृष्णाचें विशेषण कां होऊं नये ? ही शंकाही दूर झाली. कृष्णापेक्षां पांडवांचें रक्षण करणाऱ्या शिवालाच राज्यप्राप्तीचें कारणत्व देणें अधिक श्रेयस्कर आहे. आतां ब्रह्मविष्ण्वादिकांच्या सृष्टिप्रलयांचा कर्ता शिवच आहे, अशा वचनांनीं शिवाच्या ठिकाणीं असलेलें परब्रम्हत्व स्पष्ट करून दाखवितात. कवि म्हणतो. (५८) हे शिवा, सृष्टि, स्थिति, लय करणारे ब्रम्हा, विष्णु, शंकर हे जे देव जगांत आहेत, त्यांची सृष्टि, त्यांचा संहार वगैरे कर्म तुझ्या ताब्यांत आहे. असें सांगतात. असा तूंच प्रकाशणारें ब्रम्हतत्व आहेस. शिव हा त्रिमूर्तीला उत्पन्न करतो, अशी कथा आनुशासनिक पर्वांत सांगितली आहे. ती अशी (५९) सर्व तत्वांमध्यें आदि (पहिला) असून नाशरहित आहे, सर्व तत्वांच्या विधानाला जाणणारा असून प्रधान पुरुषांचा प्रभु आहे. असा भगवान ईश तोच (शिव) आहे. (६०) त्या शिवानें आपल्या उजव्या अंगापासून लोकांची सृष्टि करणाऱ्या ब्रम्हदेवाची सृष्टि केली; व लोकांचें रक्षण

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मीश्वरः ॥६०॥ युगांते चैव संप्राप्ते रुद्रं प्रभुरथासृजत् ॥६१
किंच तेषामापन्निवारणादिना शिवस्य तत्संरक्षकत्वं शां
प्रतिपादितम् ॥ यं विष्णुरिंद्रः शंभुश्च ब्रम्हा लोकपितामहः
वंति विविधैस्तोत्रैर्देवदेवं महेश्वरम् ॥६२॥ तमर्चयंति ये श
ण्यतितरंति ते ॥६३॥ इति ॥ अत्र शिवाराधनस्य दुर्गाति
पायत्वोक्त्या विष्ण्वादीनां स्तोत्रमपि तदर्थमित्यवसायात् ॥
भिः प्रीतस्य तस्य शिवस्य तत्संरक्षकत्वं विवक्षितमित्यवसी
वस्य तत्संहर्तृत्वमपि शांतिपर्वण्युक्तम् ॥ ईश्वरश्चेतनः कर्ता
कारणं शिवः ॥ विष्णुर्ब्रम्हा शशी सूर्यः शक्रो देवाश्च सान्
॥६४॥ सृज्यते ग्रस्यते चैव तमोभूतमिदं यदा ॥ अप्रज्ञातं
वै तदा ह्येको महेश्वरः ॥६५॥ इति ॥ अत्र संहाररुद्रस्यापि ग्रा

करावयाच्या कामीं असलेल्या विष्णूला आपल्या डाव्या अंगापासून
केलें (६१) प्रलयकालीं संहार करण्याच्या कामीं असलेल्या रुद्रालाहि
शिवानें उत्पन्न केलें हे श्लोक त्रिमूर्तिसृष्टिकर्तृत्व शिवाकडे असल्याचें
पादन करणारे होत. आतां आणखी त्यांच्या संकटांचें निवारण करून
रक्षण शिवानेंच केलें, असें शांतिपर्वांत सांगितलें आहे. तें असें
विष्णु, इंद्र, शंभु, लोकपितामह ब्रह्मदेव वगैरे देव नानाप्रकारच्या स्त
देवाधिदेव शिवाची स्तुति करतात. (६२) व त्या शिवाची निरंतर पू
रून मोठमोठ्या संकटांतून तरून जातात. असे हे श्लोक होत. यांमध्ये
वाची आराधना केली असतां आपदा दूर होतात, असें सांगितल्या
विष्णु वगैरे देवांनीं शिवाची आराधना केली, असा मनाचा निश्चय
शिवाय त्या स्तुतीनें संतुष्ट झालेला शिव त्यांचें रक्षण करतो, असाहि
श्चय यांतून निघतो. असो. शिवाला त्यांचा संहार करण्याचा अधिकार
असें शांतिपर्वांत सांगितलें आहे. (६४) ईश्वर हा चेतन असून कर्ता
व पुरुष असून सर्वाला कारण आहे. असा तो ईश्वर शिवच होय.
ब्रम्हा, चंद्र, सूर्य, इंद्र, देव, (६५) यांची सृष्टि, संहार शिवच करतो.
जगामध्यें जिकडे तिकडे अंधःकार माजतो, व जगाचा लय होतो
शिव एकटाच राहतो. असे हे शांतिपर्वांतले श्लोक होत. यांमध्यें "तदा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

क्षितः ॥ तदा ह्येको महेश्वर इति वाक्यशेषात् मूलश्लोके सृष्टिं संहर्तिं चेति चकारेण रक्षा सूचिता ॥ एवं ब्रम्हविष्णुरुद्राणामपि सृष्टिस्थितिप्रलयकर्ता कैमुतिकन्यायेन सर्वस्य जगतस्तत्कर्तेति सिद्धः तत् यतो वा इमानि भूतानि इत्यादिलक्षणलक्षितं ब्रम्ह शिवएवेत्यर्थात्सिध्यतीति तद्द्योतनार्थं तदुक्तवानित्यर्थः ॥ द्योतयन्निति हेतौ शतृप्रत्ययः ॥ ननु भारते क्वचित् क्वचित् शिवस्य विरिंचान्नारायणाच्चापकर्षोऽपि प्रतिपादितो दृश्यते॥कथं तदुपपत्तिरित्याशंक्याह॥ विशालाक्षः स्थाणुर्द्रुहिणतनयः संहरणकृत्सरोजाक्षक्रोधप्रभवइति वैशेषिकपदम् ॥ विभूतित्वज्ञप्त्यै किमपि निहितन्नाथनियतं निकर्षोक्तिस्ताभ्यां भवत इति बुद्धिं निरसितुम् ॥६६॥ संति त्रिमूर्तिकार-

---

महेश्वरः" या वाक्यानें संहार करणाऱ्या रुद्राचा देखील ग्रास (संहार) शिव करतो, असें सांगितल्याप्रमाणें झालें. "सृष्टिं संव्हर्तिं च" या मूळ श्लोकांत चकार असल्यानें त्या चकाराचा अर्थ " पालन " असा करावा. असो. यावरून व ब्रह्मविष्णुरुद्रांची सृष्टि, स्थिति, लय देखील शिव करतो, असें सांगितल्यावरून, सर्व जगाचा कर्ता शिवच आहे, असें कैमुतिक न्यायानें सिद्ध झालें. ह्मणूनच " यतो वा इमानि भूतानि " वगैरे श्रुतींमध्यें सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त अशी परब्रह्मवस्तु शिवच आहे, असें अर्थात् सिध्द झालें, असें दाखविण्याकरतां हें व्यासानें सांगितलें. " द्योतयन् " यांतला " शतृप्रत्यय " हेत्वर्थी आहे, असें समजावें. असो. भारतामध्यें कांहीं कांहीं ठिकाणीं ब्रह्मदेवापासून व नारायणापासून शिवाचा अपकर्ष (पराभव) सांगितला आहे, तें कसें जुळतें? अशी शंका घेऊन कवि ह्मणतो. (६६)विशाल नेत्राचा (मोठ्या डोळ्याचा), स्थाणु नांवाचा, द्रुहिणाचा मुलगा, व संहार करणारा असा रुद्र कमलाक्षाच्या (कृष्णाच्या) क्रोधापासून उत्पन्न झाला अशा अर्थाचें जें पद आहे, तें पद हे शंभो, तुझ्या विभूतीचें दर्शक आहे. असें दाखविण्याकरितांच हें पद ठेविलें आहे. दुसरें कारण असें कीं, त्या ब्रह्मविष्णूंकडून तुझा अपकर्ष झाला, अशी बुध्दि घालविण्याकरितां तुझ्या विभूतीचें दर्शक पद व्यासानें भारतांत ठेविलें आहे. त्रिमूर्तीला कारणीभूत,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

णस्य मायाधिष्ठातृसगुणब्रह्मरूपस्य श्रीसांबशिवस्य विभूतिविशेष-रूपा रुद्राः यथा संहाररुद्रो लोकसृष्ट्यर्थं लोकरक्षार्थं च विरिं-चात् स्वेछया प्रादुर्भूतः तदवताररूपः अवांतरकल्पेषु संहारार्थं हरि-क्रोधात् स्वेच्छया प्रादुर्भूतश्च तदवताररूपो रुद्रः अन्ये च नीललो-हितो लोकपाल इत्यादयो रुद्राः अत्र ब्रह्मांगसंभूतो रुद्रो महाभारते दर्शितः ॥ अनादिनिधनो देवश्चैतन्यादिसमन्वितः ॥ ज्ञानानि च वशे यस्य तारकादीन्यशेषतः ॥६७॥ अणिमादिगुणोपेतमैश्वर्यं न च कृत्रिमम् ॥ सृष्ट्यर्थं ब्रह्मणः पुत्रो ललाटादुत्थितः प्रभुः॥६८॥इति हरिक्रोधप्रभवः कौर्मे शिववचनेन दर्शितः ॥ अहं च भवतो वक्त्रा-त्कल्पांते घोररूपधृत् ॥ शूलपाणिर्भविष्यामि क्रोधजस्तव पुत्रकः ॥ ॥६९॥ इति ॥ नीललोहितनामा कश्चिद्रुद्रो महाभारते कृष्णार्जुन-

---

मायेनें अधिष्ठित, सर्वगुणब्रह्मस्वरूप अशा श्रीसांबशिवाच्या विभूति (रुद्ररूप) पुष्कळ आहेत. संहाररुद्र हा लोकसृष्टीकरितां लोकरक्षणाकरितां ब्रह्मदेवा-पासून स्वेच्छेनें प्रकट झाला. त्या संहाररुद्राचा अवताररूप असा दुसरा संहाररुद्र हा अवांतरकल्पांमध्यें संहार कर्म करण्याकरितां कृष्णाच्या क्रोधा-पासून स्वेच्छेनें प्रादुर्भूत झाला. अवताररूपी रुद्र आणि इतर नीललोहित लोकपाल वगैरे रुद्र हे अवताररूप आहेत. त्याप्रमाणेंच महाभारतांत ब्रम्हदे-वाच्या अंगापासून रुद्र उत्पन्न झाला असें सांगितलें आहे. तें असें. (६७) उत्पत्ति, व मरण ज्याला नाहीं, चैतन्य वगैरे पदार्थांनीं जो युक्त आहे अशा श्रीशिवाच्या ताब्यांत सर्व ज्ञान असून तारकादि वगैरे त्याच्या ताब्यांत आहेत. (६८) ज्याच्याजवळ अणिमादि गुणांनीं युक्त व अकृत्रिम असें ऐश्वर्य आहे; असा तो देव सृष्टीच्या कार्याकरितां ब्रम्हदेवाच्या कपाळा-पासून त्याचा मुलगा होऊन बाहेर निघाला. (६९) (ते हे श्लोक होत.) तो ह-रीच्या क्रोधापासून उत्पन्न झाला अशी कथा कौर्मपुराणांत शिवाच्या वचनानें दाखविलेली आहे ती अशी. शिव म्हणतात हे हरे, कल्पांताच्या वेळेस घोरस्व-रूप घेणारा असा मी तुझ्या मुखापासून संतापाच्या योगानें तुझा मुलगा शूलपाणी असा होतो. असा हा श्लोक होय. नीललोहित नांवाचा कोणीएक रुद्र महाभारतांत कृष्णार्जुनांच्या कैलास गमनाच्या वेळेस शिवाच्या बाजूस

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

यो: कैलासगमनप्रस्तावे कैलासे शिवपार्श्वस्थितो वर्णितः ततः पार्श्वे वृषांकस्य ब्रह्मचारी व्यवर्धत ॥ पिंगाक्षस्तपसा श्रेष्ठो बलवान्नील लोहितः ॥७०॥ इति ॥ लोकपालरुद्रः प्रागुदीच्यां दिशि वसन् कूर्मपुराणे दर्शितः ॥ तत्रेशानस्य भवनं रुद्राद्यष्टतनोः शुभम् ॥ गणेश्वरस्य विपुलं तत्रास्ते सगणैर्वृतः ॥७१॥ इति ॥ एतेषु ब्रह्मांगभवस्य रुद्रस्य स्थाणुर्विशालाक्ष इति वैशेषिकनामानि ॥ तत्र ब्रह्मणा सृष्ट्यर्थं नियुक्तस्य जरामरणरहितान् स्वात्मतुल्यान् असंख्यातान् रुद्रान् सृष्टवतो जरामरणयुक्तान् सृजेति ब्रह्मणो वचनं श्रुत्वा नैवंविधविशेषसृष्टिर्मया क्रियत इत्युक्तवतः तदनंतरं ब्रह्मणा सृष्टिव्यापाराद्व्यावर्तितस्य निर्व्यापारतयावस्थानं स्थाणुशब्दप्रवृत्तौ निमित्तं पुराणेषु दर्शितम् ॥ स्वात्मजैरेव तैरुद्रैर्निवृत्तात्मा व्यतिष्ठत ॥ स्थाणुत्वं

राहिला होता, असें वर्णन केलें आहे. तें असें. (७०) श्रीशिवाच्या बाजूला ब्रह्मचारी असा एक रुद्र होता तो लाल डोळ्याचा असून तपश्चर्येनें श्रेष्ठ आहे. व तो बलिष्ठ असून त्याचें नांव नीललोहित असें आहे. तें हेंच वर्णन होय. लोकपालरुद्र हा उत्तर दिशेला राहतो, असें कूर्मपुराणांत सांगितलें आहे. (७१) रुद्रादि आठ शरीरें ज्याला आहेत, अशा गणेश्वर ईशानाचें मंदिर तेथें (उत्तरेला) विस्तृत आहे. त्यांत (मंदिरांत) गणसहित रुद्र राहतो. (हा कूर्मपुराणांतला श्लोक होय). मागें सांगितलेल्या श्लोकांमध्यें ब्रह्मदेवाच्या अंगापासून उत्पन्न झालेल्या रुद्राचीं स्थाणु, विशालाक्ष वगैरे विशेष नांवें सांगितलीं आहेत. त्यांत वर्णन असें आहे कीं, ब्रह्मदेवानें रुद्रास सृष्टि करावयास जेव्हां सांगितलें. तेव्हां रुद्रानें जरामरणरहित (म्हातारपण व मरण नसलेले) व आपल्या बरोबरीचे अशा असंख्यात रुद्रांची सृष्टि केली. नंतर त्याला असें सांगितलें कीं, हे रुद्रा, जरामरणयुक्त अशा प्रजेची सृष्टि कर. असें त्याचें (ब्रह्मदेवाचें) वाक्य ऐकून रुद्रानें म्हटलें कीं, असली विशेष तऱ्हेची सृष्टि मी करीत नाहीं. असें त्या रुद्राचें वाक्य ऐकून ब्रह्मदेवानें त्याला सृष्टि करावयाच्या अधिकारावरून काढून टाकिलें. मग तो रुद्र व्यापाररहित होऊन स्वस्थ बसला म्हणून त्याला " स्थाणु " असें नांव ठेविलें. ही कथा पुराणामध्यें दर्शविली आहे ती अशी. (७२) रुद्र नांवाच्या आ-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तेन तस्यासीद्देवदेवस्य शूलिनः॥७२॥ततःप्रभृति विश्वात्मा न प्रसृ-
शुभाः प्रजाः ॥ स्थाणुवन्निश्चलो यस्मात्स्थितःस्थाणुरतः स्मृतः ॥
॥७३॥ इति ॥ एतस्य विशालाक्ष इति नाम तु महाभारत एव राज-
धर्मे ब्रह्मप्रणीतं नीतिशास्त्रं प्रस्तुत्य ततस्तां भगवान्नीतिं पूर्वं जग्राह
शंकरः ॥ बहुरूपो विशालाक्षः शिवः स्थाणुरुमापतिः ॥७४॥ स ए-
सर्वभूतात्मा महादेवः सनातनः॥ असंख्यातसहस्राणां रुद्राणां स्था-
नमव्ययम् ॥७५॥ युगानामायुषो ऱ्हासं विज्ञाय भगवांच्छिवः ॥ सं-
चिक्षेप ततः शास्त्रं महार्थं ब्रह्मणा कृतम् ॥७६॥ वैशालाक्षमितिप्रोक्तं
तदिंद्रः प्रत्यपद्यत॥इतिस्थाणुशब्दिते तस्मिन् विशालाक्षपदप्रयोगेण
तत्कृते नीतिशास्त्रे वैशालाक्षनामकीर्तनेन च महाभारत एव तस्य शि-
वोपासकेषु शिवनियम्येषु च परिगणनेन व्यावर्तिता तत्र सभापर्वणि

पल्या मुलांकडून सृष्टीच्या कार्यापासून परावृत्त होऊन रुद्र हा स्वस्थ बसला
म्हणून देवाधिदेव शूलधारी शिवाला स्थाणुत्व प्राप्त झालें. (७२) त्या दि-
वसापासून विश्वात्म्या रुद्रानें शुभ प्रजेची सृष्टि करावयाची सोडून दिली
स्थाणूप्रमाणें तो रुद्र स्वस्थ बसूं लागला; म्हणून त्याला स्थाणु असें नांव
पडलें. (असा हा पुराणांतला श्लोक सांगितला) महाभारतांत राजधर्म सांग-
वयाच्या वेळेस ब्रह्मदेवानें केलेल्या नीतिशास्त्राचा उपक्रम करून प्रसंगानु-
सार रुद्राला विशालाक्ष असें नांव दिलें आहे. तें असें (७४) नंतर भगवान्
शंकरानें पूर्वींच नीतीचें ग्रहण केलें. अशा शंकराला बहुरूप, विशालाक्ष,
शिव, स्थाणु, उमापति वगैरे नांवें आहेत. (७५) जो सर्व प्राणिमात्रांच्या
अंतर्यामांत राहतो, असा सनातन महादेवच असंख्यात सहस्र अशा रुद्रांचें
अव्यय स्थान झाला आहे. (७६) भगवान् शिवानें युगांच्या आयुष्याचा
ऱ्हास जाणून ब्रह्मदेवानें केलेल्या नीतिशास्त्राचा संकोच केला. त्या नीति-
शास्त्रांत विशालाक्ष पदाचा प्रयोग केल्यामुळें व विशालाक्ष नांवाचें कीर्तन
केल्यामुळें त्या विशालाक्षाची गणना शिवोपासकांमध्यें (शिवाची सेवा कर-
णाऱ्यांमध्यें) व शिवनियम्यांमध्यें (शिव ज्यांना शासन करतो अशा लोकां-
मध्यें) केली आहे. असें महाभारतांत वर्णन आहे. त्यांत सभापर्वामध्यें,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भीष्मपर्वणि च ॥ यत्रभूतानि संसृष्ट्वा सर्वलोकान्महेश्वरः ॥ उपास्यते तिग्मतेजा वृतोभूतैः सहस्रशः ॥७७॥ इत्युपास्यस्य शिवस्य मैनाके सन्निधानमुक्त्वा नरनारायणौ ब्रह्मा यमः स्थाणुश्च पंचमः ॥ उपासते यत्र परं सहस्रयुगपर्यये ॥७८॥ इति ॥ तदुपासकेषु परिगणनं कृतम् ॥ राजधर्मे ॥ भूयः स भगवान् ध्यात्वा चिरं शूलवरायुधः ॥ तस्य तस्य निकायस्य चकारैकैकमीश्वरम् ॥७९॥ देवानामधिकं चक्रे देवं दशशतेक्षणम् ॥८०॥ इत्युपक्रम्य ॥ रुद्राणामपि चेशानं गोप्तारं विदधे प्रभुः ॥ महादेवं महात्मानं विशालाक्षं सनातनम् ॥८१॥ इति शिवनियम्येषु परिगणनं कृतम् ॥ एवं च सृष्ट्यर्थं ब्रह्मललाटादुत्थितं तमभिप्रेत्य ब्रह्मा सुरगुरुस्स्थाणुर्मनुश्च परमेष्ठिज इत्यारभ्य एक-

---

भीष्मपर्वामध्यें असें आहे, तें येणेंप्रमाणें (७७) महेश्वर हा सर्व लोकांची व प्राण्यांची सृष्टि करून सेवा करून घेतो. तो महेश्वर प्रखर तेजस्वी असून हजारों भूतगणांमध्यें बसलेला आहे. याप्रमाणें उपास्य अशा शिवाचें सन्निधान मैनाकांत सांगून पुढें असें वर्णन केलेंआहे. (७८) नारायण, नर, ब्रह्मा, यम व पांचवा स्थाणु असे हे लोक हजारों युगें लोटलीं, तरी परशिवाची उपासना करीत स्वस्थ बसले आहेत. याप्रमाणें शिवोपासकांमध्यें स्थाणूची गणना केली आहे. राजधर्मांत असें आहे कीं, (७९) श्रेष्ठ शूलायुध धरणाऱ्या भगवान् शिवानें पुष्कळ विचार करून त्या त्या स्थानांत एक एक ईश्वराची स्थापना केली. (८०) त्यांत हजार डोळ्यांचा देव सर्वांत श्रेष्ठ आहे, असें सांगितलें. असा उपक्रम करून पुढें असें सांगितलें कीं, (८१) हा सर्व रुद्रांचा स्वामी आहे, व सर्वांचें पालन करतो, व अशा त्या पुरुषाचें नांव विशालाक्ष असें असून तो मोठा देव आहे व तो महात्मा आहे असें प्रभु शिवानें सांगितलें. याप्रमाणें शिवनियम्यांमध्यें त्याची गणना केली. याप्रमाणेंच सृष्टि करावयास ब्रह्मदेवाच्या कपाळापासून उत्पन्न झालेल्या रुद्राला पाहून "ब्रह्मा" असा उपक्रम करून "प्रजापतयः स्मृताः" असें संपविलें. त्याचा अर्थ असा कीं, (८२) ब्रह्मा, बृहस्पति, स्थाणु, परमेष्ठीपासून उत्पन्न झालेला मनु, वगैरे हे एकवीस प्रजापति होत. यावरून स्थाणूची गणना प्रजापतींमध्यें केल्याप्रमाणें झालें. त्याच स्थाणूची स्थिती ब्रह्मसभेम-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

विंशतिरुत्पन्नास्ते प्रजापतयः स्मृताः ॥८२॥ इति प्रजापतिषु परिगणनं कृतम् ॥ तस्यैव च ब्रह्मसभायां तदुपसर्जनतयावस्थानमादिपर्वण्युक्तं तत्र हि ॥ तत्र विष्णुर्महादेवस्तत्राग्निर्वायुना सह ॥ ऋषयः सर्व एवैते पितामहमुपासते ॥८३॥ इत्युक्तं ॥ तदपि स्थाणुविषयमिति तत्रैव॥ ब्रह्मसदसि देवान् प्रदक्षिणीकुर्वाणां तिलोत्तमां परितो द्रष्टुं तेन परितो मुखचतुष्टयं सृष्टमित्यग्रिमवचने स्थाणुशब्देनैव स्पष्टीकृतम् ॥ एवं चतुर्मुखः स्थाणुर्महादेवोऽभवत्पुरा ॥८४॥ इति ॥ यत्तु द्रोणपर्वणि ब्रह्माणं प्रति शिववचनम् ॥ भवता हि नियुक्तोऽहं प्रजानां परिपालने ॥८५॥ इत्यादि ॥ तदपि स्थाणुविषयमित्येतत् ॥ ततो हरो जटी स्थाणुरित्युपक्रमेण प्रकाशितम् ॥ मोक्षधर्मेषु ॥ एतौ द्वौ विबुधश्रेष्ठा प्रसादक्रोधजौ मम ॥ मयादर्शितपंथानौ सृष्टिसंहारकारकौ ॥८६॥ इत्यादि नारायणवचने शिवस्य तन्नियम्यत्ववचनमपि वि-

---

ध्यें कशी होती, ती कथा आदिपर्वांत सांगितली आहे. ती अशी (८३) त्या ब्रह्मसभेंत विष्णु, महादेव, अग्नि, वायु, सर्व ऋषि हे ब्रह्मदेवाची उपासना करतात. असें सांगितलें. तें देखील स्थाणुविषयकच आहे, असें तेथेंच सांगितलें आहे, तें असें. ब्रह्मसभेमध्यें देवांना प्रदक्षिणा घालणाऱ्या तिलोत्तमेला पाहण्याकरितां त्यानें सभोंवतीं चार तोंडें केलीं, अशा तऱ्हेच्या वरच्या वचनांत जो स्थाणुशब्द घातला आहे, त्या शब्दानें उघड केल्याप्रमाणें झालें तें असें. (८४) याप्रमाणें पूर्वी तो महादेव स्थाणु चार तोंडांचा झाला होता. असें वर्णन पुढचें आहे. जें द्रोणपर्वांत ब्रह्मदेवाला शिवानें सांगितलें, तें असें कीं, (८५) हे ब्रह्मन् लोकांचें रक्षण करावयास मला तूं सांगितलें आहेस. असें जें वचन आहे तें देखील स्थाणु विषयकच जाणावें. कारण मोक्षधर्मामध्यें "ततो हरो जटी स्थाणु" असा उपक्रम करून स्थाणुलाच प्रकाश केला आहे. मोक्षधर्मामध्यें असें सांगितलें आहे कीं, (८६) नारायणानें शिवास ह्मटलें कीं, हे शिवा, माझ्या संतोषापासून व संतापापासून दोन श्रेष्ठ देव झाले. नंतर मीं त्यांना मार्ग दाखविल्यामुळें ते दोघेही अनुक्रमानें सृष्टि व संहार हीं दोन कामें करण्यामध्यें रत झाले. हें जें नारायणानें शिवास सांगितलें, तें वचन देखील विभूतिविषयकच आहे. तें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भूतिविषयमेतत् ॥ क्रोधजत्वविशेषणेन दर्शितम् ॥ एवमन्यत्रापि तत्र तत्र निकर्षवचने विभूतिविषयत्वज्ञापकब्रह्मपुत्रत्वादिविशेषणं प्रयुक्तं द्रष्टव्यम् एवं भारते क्वचित्क्वचित् शिवनिकर्षवचनानां तद्विभूतिविषयत्वस्य तत्र तत्र प्रयुक्तैर्वैशेषिकपदैः सूचितत्वान्न कश्चिद्विरोध इति ॥ यत्र तु क्वचित्क्वचिदेतादृशं वैशेषिकपदं नास्ति यथा पंचेंद्रोपाख्याने पंचेंद्रान् असुरावताररूपकर्णदुर्योधनादिवधार्थं मनुष्यलोके जायध्वमिति नियुक्तवतः शिवस्य नारायणोऽप्यंशेनावतीर्य तेषां साहाय्यकं करोत्वित्यभिप्रायेण नारायणोपसर्पणमुक्तं एवमादिषु गतिमाह ॥ यत्रेदृशं नास्ति विभूतिरुद्रता विज्ञापकं नाथ वि-

---

"क्रोधज" या विशेषणानें व्यक्त झालें आहे. याप्रमाणें दुसरीकडे जेथें जेथें निकर्ष (कमीपणा) दाखविणारीं वचनें असतील, तेथें तेथें विभूतिविषयकच आहे असें जाणावें. हें स्पष्ट समजण्याकरितां त्या त्या ठिकाणीं "ब्रह्मपुत्रः" असें विशेषण दिलें आहे, त्यावरून समजून घ्यावें. याप्रमाणें भारतांत जेथें जेथें शिवनिकर्ष (शिवाचा कमीपणा) दाखविणारीं वचनें असतील; तेथें तेथें तीं वचनें शिवविभूतीच्या संबंधाचीं आहेत, असें जाणावें. हें स्पष्ट समजण्याकरितां भारतांत त्या त्या ठिकाणीं विशेषणपदें घातलीं आहेत, त्यावरून समजावें. अर्थात्, कोठेंही विरोध येत नाहीं. आतां कांहीं कांहीं ठिकाणीं अशीं विशेषणपदें नाहींत; या प्रकारचें एक उदाहरण असें आहे कीं, पंचेंद्रोपाख्यानांत शिवानें पांच इंद्रांना सांगितलें कीं, हे इंद्रहो, दैत्यावताररूपी कर्ण, दुर्योधन वगैरे लोकांचा संहार करावयास तुह्मी भूलोकांत अवतार घ्या; व नारायण हा माझ्या अंशानें तुमच्या पांचांच्या संरक्षणाकरतां अवतार घेवो. अशा अभिप्रायानें नारायणाचा अवतार जगांत झाला. वगैरे गोष्टींत विशेषणपदें नसल्यामुळें शिवाला निकृष्टत्व येतें, अशी शंका मनांत धरून शंका निवारणाकरितां कवि ह्मणतो. (८७) हे शंभो, ज्या ठिकाणीं तुला निकर्ष (कमीपणा) दाखविणारीं पदें असतील त्या ठिकाणीं विशेषणपदांवरून तीं वचनें विभूतिविषयक आहेत असें जाणावें; हें बरोबर झालें. ज्या ठिकाणीं विभूतिविषयक विशेषणपदें नसतील,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

शेषकं पदम् ॥ सापि स्वधर्मग्रहमानवैशसा सर्वेश्वरं त्वां न निकर्षगीः स्पृशेत् ॥८७॥ श्रीमहाभारते खलु श्रीसांबशिवस्त्रिमूर्त्युत्तीर्णस्त्रिमूर्त्यादेः कृत्स्नस्यापि चराचरस्य प्रपंचस्य स्रष्टा पाता नियंता संहर्ता समाराधनीयश्च प्रतिपन्नः ॥ भारतशेषे हरिवंशे च शकटपरिवृत्त्या भीतेन नंदगोपेन कृष्णरक्षायै प्रयुक्ते कवचे ॥ विष्णुस्ते पूर्वतः पातु रुद्रो रक्षतु दक्षिणम् ॥ ब्रह्मा च पश्चिमं पायात् स्कंदो रक्षत्वथोत्तरम् ॥८८॥ उपरिष्टात्ततः सूर्यः पात्वधश्चापि वासुकिः ॥ पायाच्च त्वामथो वत्स शिष्टाः काष्ठाः समीरणः ॥८९॥ स्वस्ति करोतु भगवान् पिनाकी वृषभध्वजः ॥ गावो रक्षं तु सर्वत्र भूमिं पातु सदाशिवः ॥९०॥ इति ब्रह्मविष्णुरुद्रेभ्यः शिवःपर इति प्रतिपादितः ॥ तथाभूतं निकर्षगीः क्वापि न स्पृशेत् ॥ किंतु ॥ बहुषु निकर्षवच-

---

त्याठिकाणीं देखील स्वधर्मनिष्ठेच्या योगानें सर्वेश्वर अशा तुला ती निकर्षाची वाणी शिवत नाहीं. श्रीमहाभारतांत असें सांगितलें आहे कीं, त्रिमूर्तींची सृष्टि करणारा श्रीसांब शिव हा त्रिमूर्ति, सर्व चराचरजग यांची सृष्टि, यांचें पालन व यांचा संहार करतो; अर्थात्, या श्रीसांबशिवाची आराधना करावी असें समजून सर्वेही शिवाची आराधना करतात. याप्रमाणेंच भारतशेष हरिवंशांत जेव्हां शकटासुराची कथा सांगितली आहे, तेव्हां असें वर्णन आहे कीं, जेव्हां कृष्णाचा पाळणा बांधलेली गाडी उलटून पडली, तेव्हां नंदगोप फार भ्याला व त्यानें कृष्णाच्या रक्षणाकरितां नंदगोपानें रक्षाश्लोक म्हटले. ते असे. (८८) विष्णु हा पूर्वेकडे रक्षण करो. रुद्र हा दक्षिणेकडे रक्षण करो. ब्रह्मा हा पश्चिमेकडे रक्षण करो. स्कंद हा उत्तरेकडे रक्षण करो. (८९) वर सूर्य रक्षण करो. खालीं वासुकि रक्षण करो. हे वत्सा, बाकी सर्व दिशांला वायु हा तुझें रक्षण करो. (९०) पिनाकधारी वृषभध्वज शिव हा तुझें कल्याण करो. सर्व ठिकाणीं गायीचें रक्षण शिव करो. सदाशिव हा भूमीचें रक्षण करो. वगैरे या वरच्या उदाहरणावरून ब्रह्मविष्णुरुद्रांच्या योग्यतेपेक्षां श्रीपरशिवाची योग्यता श्रेष्ठ आहे; असें सिद्ध झालें. यावरून कमीपणा दाखविणारी वाणी अशा प्रकारच्या श्रेष्ठ शिवाला शिवत नाहीं. आणखी पुष्कळ निकर्ष (कमीपणा) दाखविणारीं जीं वचनें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नेषु विभूतिविषयत्वज्ञापक स्थाणुविशालाक्षादिशब्दसत्वादौचित्याच्च तत्तद्विभूतिविशेषानेवावलंवतइत्यर्थः ॥ ननु गीतासु श्रीकृष्णेन स्वस्यैव परब्रह्मभावचिन्हमधिकं माहात्म्यं वहुधा प्रपंचितम्॥ तद्विरोधपरिहारः कथमित्याकांक्षायामाह ॥ गीतासु गूढमुदितं भवतः परत्वं नैव स्फुटं तदत एव हि सव्यसाची ॥ गीतार्थमेव सहसा पुनरप्यपृछत्तद्बोधनार्थमुदिता हरिणाऽनुगीता ॥९१॥ आश्वमेधिके पर्वणि अनुगीतोपक्रमे ॥ विदितं ते महाबाहो संग्रामे समुपस्थिते ॥ माहात्म्यं देवकीपुत्र तच्च ते रूपमैश्वरम् ॥९२॥ यत्तु तद्भवता प्रोक्तं तदा केशव सौहृदात् ॥ तत्सर्वं पुरुषव्याघ्र नष्टं मे व्यग्रचेतसः ॥९३॥ मम कौतूहलं त्वस्ति तेष्वर्थेषु पुनः पुनः ॥ भवांश्च द्वारकां गंता न चिरादेव केशव ॥९४॥ इत्यर्जुनस्य प्रश्ने भगवता अनुगीतोपदेशः कृतः ॥ तस्यायमनुवादः ॥ ननु गीतासु श्री

असतील, तेथें विभूतिवाचक स्थाणु, विशालाक्ष वगैरे विशेषणें आहेत. अर्थात् त्या त्या विभूति धरूनच शिवाच्या निकर्षपणाचें निवारण करावें, हेंच उचित आहे. गीतेमध्यें कृष्णानें आपल्या ठिकाणीं परब्रह्मत्व प्रतिपादिलें आहे, व परब्रह्ममाहात्म्यही आपल्याच ठिकाणीं पुष्कळ प्रकारानें विस्तृत केलें आहे. या विरोधाचा परिहार कसा करावा? अशी शंका घेऊन कवि ह्मणतो. (९१) हे शंकरा, भगवद्गीतेमध्यें तुझेंच माहात्म्य श्रीकृष्णानें गुप्तपणानें स्पष्ट केलें आहे. ह्मणूनच अर्जुनानें पुनः पुनः गीतार्थाचा प्रश्न केला. अर्थात् त्या अर्जुनास कळण्याकरितां श्रीहरीनें ती उत्तम गीता सांगितली. असो. अश्वमेधपर्वांत अनुगीतेच्या उपक्रमाच्या वेळेस असें सांगितलें आहे. (९२) अर्जुन ह्मणतो—हे महाबाहो कृष्णा, जेव्हां संग्राम सुरू झाला, तेव्हां तुझें तें ईश्वरसंबंधीं रूप मला समजलें. (९३) परंतु हे केशवा, त्यावेळेस तूं जें मला मोठ्या प्रेमानें सांगितलेंस, तें सर्व, हे पुरुषश्रेष्ठा, माझ्या भटकलेल्या मनांतून नाहींसें झालें. (९४) ह्मणून पुनः पुनः मला तोच विषय समजून घेण्याची उत्कंठा उत्पन्न होते. परंतु हे केशवा, तूं तर लवकरच द्वारकेला जाणार आहेस. याप्रमाणें अर्जुनानें प्रश्न केल्याबरोबर त्याला कृष्णानें अनुगीतेचा उपदेश केला. त्याचाच हा अनुवाद पुढें दिला आहे.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कृष्णेन शिवस्य पारम्यं प्रतिपादितं तदनंतरं सम्यगर्जुनेन गृहीतमिति पुनस्तद्विषयः प्रश्नोयमित्युदाहृतप्रश्नाभिप्रायकथनं पूर्वश्लोककृतं न युज्यते अर्जुनेन हि युध्दारंभसमये त्वयोपादिष्टं तव माहात्म्यं तदा विदितमिति खलु प्रश्नोपक्रमे पार्थेनोक्त्वा तद्विस्मृतमिति श्रीकृष्णं प्रति पुनः पृष्टमित्याशंक्य पार्थस्य गीताश्रवणसमये संशयहेतुमुद्घाट्य स्वाभिमतं प्रश्नाभिप्रायमाविष्करोति ॥ तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्य इत्युदीरितं यन्मधुकैटभद्विषा ॥ तमेव सर्वान् भ्रमयंतमीश्वरं महाफलाप्त्यै शरणं व्रजेति यत् ॥९५॥ एतेन कृष्णस्य समं मुमुक्षुणा स्वाराधनीयः प्रतिभासते परः ॥ सर्वस्य चाहं हृदि संनिविष्ट इत्याद्यैस्तु विष्णुस्तदुदेति संशयः ॥ गीतासु ॥ ततः पदं तत्परिमार्गि-

---

वरें? गीतेमध्यें श्रीकृष्णानें शिवाचें श्रेष्ठ माहात्म्य अर्जुनाला सांगितलें, व अर्जुनानें तें लक्षपूर्वक ऐकून घेतलें असें सांगितलें. नंतर पुनः त्याचविषयीं अर्जुनानें प्रश्न केला, अशा अर्थाचे श्लोक पुनः सांगणें हें बरोबर दिसत नाहीं. अशी शंका कवि आपल्या मनांत आणून त्या शंकेचा परिहार करतो. युद्धाचा आरंभ जेव्हां झाला, तेव्हां अर्जुनानें कृष्णास ह्मटलें कीं, कृष्णा, तुझें माहात्म्य तेव्हां (युद्धाच्या आरंभीं) तूं सांगितलें होतेंस, तें मला समजलें होतें. परंतु आतां मी तें सर्व विसरलों. याकरितां पुनः सांग. अशा अर्थाची शंका घेऊन पार्थानें जेव्हां गीता ऐकिली तेव्हां संशयाचीं सर्व कारणें बाहेर काढून आपल्याला अभिमत (संमत) अशा प्रश्नाचा अभिप्राय कवि प्रकट करतो. (९५) हे शंभो, मधुकैटभांचा शत्रु अशा श्रीकृष्णानें ह्मटलें कीं, हे अर्जुना, आद्य (पुरातन) अशा पुरुषाला मी शरण जातों; आणि सर्वांना संसारामध्यें फिरविणाऱ्या अशा त्या ईश्वराला मोक्षफलाच्या प्राप्तीकरितां तूंही शरण जा. अशा तऱ्हेच्या कृष्णाच्या वचनांवरून असा अर्थ निघतो कीं, त्याचा (कृष्णाचा) आराधनीय देव दुसरा कोणी तरी असलाच पाहिजे. ह्मणूनच मुमुक्षु अशा अर्जुनाला देखील तूंही त्याला शरण जा, असें कृष्णानें सांगितलें. परंतु " सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टः" वगैरे वचनांवरून विष्णु हाच परब्रह्म असावा असा संशय येतो. परंतु गीतेंत सांगितलें आहे कीं, (९६) ज्या पदाला गमन केलें असतां प्राणी

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

तव्यं यस्मिन् गता न निवर्तंति भूयः॥ तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥९६॥ इति श्रीकृष्णवचनं दृश्यते ॥ अत्र॥ उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥ यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्ययईश्वरः ॥९७॥ इति प्राज्ञ ईश्वरः पुरुष इत्युक्तः सर्वस्य प्रपदनीय इत्युक्तमिति प्रतीयते तमेव मया शरणीकृतमीश्वरं त्वमपि शरणं भजेत्येवमर्जुनं प्रति ॥ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेर्जुन तिष्टति ॥ भ्रामयन् सर्वभूताानि यंत्रारूढानि मायया ॥९८॥ तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥ तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥९९॥ इत्यनेनोपदिष्टमिति प्रतीयते ॥ यस्मिन् गता न निवर्तंति भूयः ॥ स्थानं प्राप्स्यसि शाश्वतमिति फलोपदेशात् ॥ उत्तमः पुरुषस्त्वन्य इति श्लोके समानाधिकरणयोः शब्दयोः एकत्रपुरुषशब्दः

पुनः जन्माला येत नाहीं, अशा पदाचा बुद्धिमानानें शोध करावा. ह्मणूनच त्याच्यापासून ही पुरातन अशी श्रुति निघाली, त्याच आद्य पुरुषाला मी शरण जातों. असें हें श्रीकृष्णाचें वचन गीतेंमध्यें दिसतें. आणखी पुनः ह्मटलें आहे कीं, (९७) जो अव्यय ईश्वर तीनही लोकांत शिरून लोकांचें पोषण करतो, तोच उत्तम पुरुष होय, व तोच श्रेष्ठ परमात्मा होय असें विद्वान् लोक सांगतात. याप्रमाणें " प्राज्ञः. ईश्वरः, पुरुषः " अशीं विशेषणें कृष्णानें दिलीं असून पुनः कृष्ण ह्मणतो कीं, अशा ईश्वराला मी शरण जातों, तूंही त्यालाच शरण जा. असें कृष्णानें अर्जुनास सांगितलें. पुनः कृष्ण सांगतो कीं, (९८) हे अर्जुना, मायेच्या योगानें शरीररूपी यंत्रावर चढलेल्या प्राण्यांना खालीं वर फिरवीत सर्व प्राण्यांच्या हृदयांत तो ईश्वर राहतो. (९९) तर हे अर्जुना, सर्व भावानें त्यालाच तूं शरण जा. त्याच्या प्रसादानें (अनुग्रहानें) शाश्वत श्रेष्ठ सुखाला पावशील. याप्रमाणें अर्जुनाला कृष्णानें उपदेश केला. यावरून, व त्या त्या श्लोकांतल्या "यस्मिन् गता न निवर्तंति भूयः" " स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् " वाक्यांनीं फलोपदेश सांगितल्यावरून, " उत्तमः पुरुषस्त्वन्यः " या श्लोकांत पुरुष शब्द असून जरी दुसऱ्या श्लोकांत ईश्वर शब्द आहे, तरी दोन्ही शब्द सारख्याच

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

अन्यत्र ईश्वरशब्द इति अनयोरैक्यार्थप्रतीतेश्च ॥ एवं तावत्कृष्णेन गीतासु निरतिशयमहिमाशालितयोक्तस्य स्वस्यापि प्रपदनीयत्वेन वर्णितः शिष्यस्तेहं शाधिमामित्युक्तवंतमर्जुनं प्रत्यपि मोक्षार्थं प्रपदनीयत्वेनोपदिष्टः ईश्वरनाम्ना पुरुषांतरस्पर्शरहितेन धियाभानितशिव एव परं ब्रह्मेति विवक्षितः प्रतीयते गीतासु कृष्णेन सर्वकारणत्व सर्वांतर्यामित्वादीनि बहूनि ब्रह्मलिंगानि स्वास्मिन्वर्णितानीति स्वयमेव परं ब्रह्मेत्युपदिष्टः एवं कोटिद्वयोत्थानात्संशय एवात्रोचितः॥ नच कृत्स्नगीताश्रवणानंतरम् ॥ स्थितोस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तवेत्युक्तवतोर्जुनस्य कथं संशय उच्यत इति शंकनीयम् ॥ तस्य स्वकीयैर्युद्धं कर्तुं उचितमनुचितं वेति संदेहानिवृत्त्या युद्धंकरिष्य इ-

---

योग्यतेचे असल्यामुळें दोन्ही शब्दांचा अर्थ एकच (शिवच) होतो. असो. याप्रमाणें गीतेमध्यें मीच निरतिशय महिमाशाली आहें. असें आपल्या माहात्म्याचें वर्णन करणाऱ्या कृष्णानें देखील शिवाचा आश्रय केल्याचें वर्णन आहे. असो. कांहीं ठिकाणीं अर्जुनानें ह्मटलें कीं, कृष्णा, मी तुझा शिष्य आहें, तूं मला सांग. याप्रमाणें प्रश्न करणाऱ्या अर्जुनाला मोक्षप्राप्ति होण्याकरितां कृष्णानें जो परब्रह्मस्वरूपाचा उपदेश केला, त्यांत दुसऱ्या देवाचा गंध देखील नसून ईश्वर शब्दाचा अर्थ शिवच आहे, असें बुद्धीनें निश्चित करून कृष्णानें सांगितलें आहे. अर्थात् तेथें शिवच परब्रह्म आहे, असें दाखविल्याप्रमाणें झालें. गीतेमध्यें कृष्णानें “ सर्वकारणत्व, ” “ सर्वांतर्यामित्व, ” वगैरे परब्रह्माचीं चिन्हें आपल्यामध्यें आहेत, असें सांगितलें आहे. अर्थात् आपणच (कृष्णच) परब्रह्म झाला. अशा दोन कोटि यांत उद्भवत असल्यामुळें कांहीं अंशीं संशय येतो खरा. परंतु सर्व गीता ऐकिल्यानंतर हा संशय आपोआप दूर होतो. असो. कवि पुनः संशय घेऊन त्याचें निरसन करतो तें असें. बरें. “ स्थितोस्मि० ” असें अर्जुनानें ह्मटलें असून पुनः अर्जुनाला संशय आला कोठून ? अशी शंका येते खरी, तथापि पुढच्या त्याच्या (अर्जुनाच्या) चरित्रावरून पाहिलें असतां ही शंका राहत नाहीं तें असें कीं, समोरच्या आप्तांना पाहून अर्जुनाला, यांच्याबरोबर युद्ध करावें, किंवा करूं नये असा संशय आला. असा संशय मनांत येऊन त्या

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

त्तेतदर्थकत्वात् ॥ अन्यथा सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्र-
जेति कृष्णवाक्यसमनन्तरमेव स्थितोस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं
तवेत्युक्त्यनन्तरमप्यर्जुनस्य यावज्जीवं शिवपूजानिष्ठत्वात् एवं च
अनुगीतारंभगतार्जुनप्रश्नोपक्रमे ॥ विदितं ते महाबाहो संग्रामे स-
मुपस्थिते ॥ माहात्म्यं देवकीपुत्र तच्च ते रूपमैश्वरम् ॥१००॥ इति
गीतोपदेशेन कृष्णस्य परभावरूपं माहात्म्यं विदितमिति यदुक्तम् ॥
तद्दानगृहीतामिति गुरुं प्रत्यभियोक्तुं पुनः प्रश्नावतरणार्थमगृही-
तत्वेन विस्मृतमिति नष्टशब्देनोक्तमिति योजनीयमिति भावः ॥ गी-
तोपदिष्टार्थनिश्चयः प्रागर्जुनस्य नासीदित्येतत् उदाहृतप्रश्नोत्तरेण
श्रीकृष्णवाक्येनाप्यवसीयत इत्याह ॥ इत्थमस्य यदि संशयो भवे-

ण्याचें निरसन झाल्यानंतर अर्जुनानें ह्मटलें कीं, माझा संशय दूर झाला,
तां मी युद्ध करतों. अशा अर्थाचा तो श्लोक आहे असें जाणावें. नाहीं
र "सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज" (सर्व धर्म सोडून मला एक-
ट्याच शरण ये) अशा कृष्णाच्या वाक्यानंतरच "स्थितोस्मि गतसंदेहः
रिष्ये वचनं तव " (माझा संशय दूर झाला तुझें ह्मणणें मी कबूल क-
रीं) असें अर्जुनानें कसें ह्मटलें असतें? यावरून वर वर्णन केल्याप्रमाणें
मी युद्ध करितों" अशा अर्थाचाच हा श्लोक आहे असें समजावें. अर्थात्
र्जुन हा आमरण शिवपूजानिष्ठ होता असें इतर प्रमाणांवरून सिद्ध
तें. असेंच अनुगीतेच्या आरंभीं सांगितलें आहे कीं, (१००) महाबाहो
वकी पुत्रा, युद्धाच्या आरंभीं हें तुझें तें ईश्वरसंबंधीं रूप मला समजलें, व
तें माहात्म्यही समजलें. याप्रमाणें गीतेच्या उपदेशानें कृष्णाचें परभाव-
प व माहात्म्य समजलें असें जें अर्जुनानें सांगितलें, तें त्यावेळेस समजलें
हीं, अशा अभिप्रायानें अर्जुनानें पुनः प्रश्न केला, असें "नष्ट" या श-
ब्दानें सांगितल्याप्रमाणें झालें; अशी योजना करावी, हा यांतला भावार्थ
आहे. गीतेच्या उपदेशानें त्यांतल्या अर्थाचा निश्चय पूर्वी अर्जुनाला झाला
नव्हता वगैरे ह्मणणें त्यांच्या परस्पर प्रश्नोत्तरावरूनच व श्रीकृष्णाच्या वा-
क्यावरूनही सिद्ध होतें. असें कवि सांगतो. (१०१) कवि ह्मणतो हे शंभो,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

दन्यथाग्रहणमेव वा पुनः ॥ नाग्रहीन्मदुपदिष्टमेष इत्यग्रहं हरिरवोचदुत्तरे ॥१०१॥ इत्थं हि तत्रोत्तरारंभः ॥ श्रावितस्त्वं मया गुह्यं ज्ञापितश्च सनातनम् ॥ धर्मस्वरूपिणं पार्थ सर्वांल्लोकांश्च शाश्वतान् ॥१०२॥ अबुद्ध्या यन्न गृण्हीथास्तन्मे सुमहदप्रियम् ॥नूनमश्रद्दधानोसि दुर्मेधश्चासि पांडव ॥१०३॥ स हि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः पदवेदने ॥१०४॥ इति ॥ अत्र गृहीतं नष्टमित्यर्जुनस्य वाचा गृहीतत्वविस्मृतत्वोक्तिं श्रुत्वापि यत् ॥ अबुध्या यन्नगृण्हीथा इति कृष्णेन तस्याग्रहणमेवोक्तं तस्यायमभिप्रायः ॥ गीतोपादिष्टमर्थरहस्यं तदा गृहीतुमशक्त एव स्वस्मिन्नुपदेशायोग्यत्वप्रतीतिर्भवेदिति भीत्या

कृष्ण ह्मणतो कीं, जर या अर्जुनाला मी सांगितलेल्या अर्थाविषयीं संशय आला असेल तर पुनः हा अर्जुन आपल्या मनांत विपरीत अर्थाचा भास करून घेईल. अर्थात् मी उपदेश केलेला अर्थ या अर्जुनाला समजला नाहीं, असेंच सिद्ध झालें. याकरितां पुनः याला उपदेश करावा. असें कृष्णानें आपल्या उत्तरांत ह्मटलें आहे. याप्रमाणें मनांत समजून उत्तर देण्यास कृष्णानें येथून आरंभ केला. (१०२) कृष्ण अर्जुनास ह्मणतो, हे अर्जुना, तुला मोठा गुह्यार्थ सांगितला, व सनातनतत्व चांगल्या तऱ्हेनें समजावून दिलें. धर्मस्वरूपी परमेश्वराचें रूप सांगितलें, व शाश्वत अशा सर्व लोकांचें ज्ञान करून दिलें. (१०३) तथापि अज्ञानामुळें तूं या सर्वांचा स्वीकार केला नाहींस (ज्ञान करून घेतलें नाहींस), हें मोठेंच वाईट झालें. हे पांडवा, यावरून तुझी बुद्धि फार वाईट आहे, व तुझ्याजवळ श्रद्धा नाहीं, असें स्पष्ट झालें. (१०४) परमेश्वराचें तत्वस्थान समजण्यास तोच धर्म पुरे आहे. हें कृष्णाचें उत्तर होय. यामध्यें "स्वीकृत झालेलें नष्ट झालें." अशा या अर्जुनाच्या वाणीनें "गृहीतत्वविस्मृतत्वरूप" सांगितलेली उक्ति ऐकिली तरी "अबुद्ध्या यन्न गृण्हीथा" असें कृष्णानें जें ह्मटलें, त्यांतला भावार्थ असा आहे. गीतेंत सांगितलेल्या अर्थाचें रहस्य ग्रहण करावयास तेव्हां अर्जुनाची शक्तीच नव्हती, परंतु असें ह्मटल्यानें आपण या गीतेचा उपदेश घ्यावयास नालायक आहों, असें मला (कृष्णाला) वाटेल या भीतीनें "मला सम-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

विदितमित्युक्त्वा पुनः प्रश्नावसरार्थं नष्टमित्याह तस्य यदि संशयः यदि वा मामेवाहं परंब्रह्मोपदिशामीति तस्य मतिः उभयथापि मदुपदिष्टार्थ तत्वग्रहणं नास्तीति तत्र च युध्दारंभवैयग्र्य कृतो बुध्यैकाग्र्याभावो मूलं तदभावे च सर्वधूर्वहे श्रीकृष्णे स्थिते मम किमर्थं वैयग्र्यमिति तद्वैयग्र्यविरोधिश्रीकृष्णविषयविश्वासरूपश्रध्दाभावः स्वयमेव सर्वधूर्वह इति दुरहंकारकृता दुर्बुध्दिश्च मूलम् ॥ एवमितः परं पुनरुपदेक्ष्यमाणार्थेऽपि तस्याग्रहणं माभूदिति कोपमभिनीय तस्य सुखबोधनार्थं चातुर्यशालिन्यैवोक्तिभंग्या गीतोपादिष्टः सर्वोऽपि परब्रह्मभावावेदको महिमा न मदीय उक्तः किंतु मया यः शरणी कृतो मदुपास्यश्च तदीय इति कृष्णेन व्यंजितमित्याह ॥

लें" असें अर्जुनानें ह्मणून पुनः "विसरलों तें मला सांग" असा प्रश्न केला. खरोखर त्याला (पार्थाला) संशय आला असेल, किंवा "मीच (कृष्णच) परब्रह्म आहे असा उपदेश हा कृष्ण मला करतो, हें कसें?" अशी जरी अर्जुनाची बुद्धि झाली असली, तरी मीं (कृष्णानें) उपदेश केलेल्या तत्वाचें ज्ञान याला (अर्जुनाला) झालें नाहीं, असेंच ह्मटलें पाहिजे. याला कारण असें आहे कीं, त्यावेळीं युद्धाचा आरंभ झाला असल्यामुळें अर्जुनाची बुध्दि स्थिर न राहतां व्यग्र झाली होती; शिवाय दुसरें कारण असें कीं, अर्जुनाची बुध्दि व्यग्र होण्यास कारणच नसून ज्या अर्थी मी झाली होती, त्या अर्थी एकूणएक युध्दाचा भार शिरावर घेतलेल्या माझ्या ठिकाणीं याची श्रध्दा नसून "सर्व समरभार माझ्या शिरावर आहे" असा दुरहंकार याला (अर्जुनाला) झाल्यामुळें ही अशी याची (अर्जुनाची) बुद्धि व्यग्र झाली होती. असा हा कृष्णाच्या मनांतला भावार्थ होय. याप्रमाणें यापुढें पुनः उपदेश केला असतां मागच्याप्रमाणें होऊं नये, ह्मणून वरकरण्यावर रागावून त्याला (अर्जुनाला) चतुरउक्तीनें सुलभ रीतीनें कळण्यासारखा उपदेश केला कीं, गीतेंत परब्रम्ह्याचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं माझीं नाहींत. ज्याला मी शरण गेलों आहे, व मी ज्याची उपासना करतों त्याचीं तीं लक्षणें आहेत. असें कृष्णानें अर्जुनास सांगितलें;

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

उक्त्वा च संशयविपर्ययोर्निरासं चक्रे हरिश्चतुरया द्रुतमुक्तिभंग्या ॥ शक्यं तदद्य न मया भणितुं यथोक्तं योगाधिरूढमनसा न बहिर्दृशेति ॥१०५॥ स हि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः पदवेदन इत्येतत्पर्यंतोक्त्यनंतरं कृष्णस्येदं वचनम् ॥ न शक्यं तन्मया भूयस्तथा वक्तुमशेषतः ॥ परं हि धर्मं कथितं योगयुक्तेन तन्मया॥१०६॥ इति ॥ अत्र योगारूढेन अबहिर्मनसा मया तदा तदुक्तं इदानीं बहिर्मनसा मया वक्तुं न शक्यमित्युक्तिभंग्या गीतोपदिष्टः सकलोपि महिमा न स्वकीयः किं त्वन्यदीय इति स्पष्टीकृतम् स्वयमेव नित्यसर्वज्ञं परं ब्रह्मेति कथने योगयत्नानपेक्षणात् ॥ योगयुक्तत्वोक्त्यैव योगमार्गेण शिवाहंभावमास्थाय तदीयः सर्वोपि महिमा मदीयत्वेनोक्त इत्यपि व्यंजितम् ॥ न बहिर्दृशेति न समासः ॥ एवं योगं

ह्मणून कवि ह्मणतो. (१०५) हे शंभो, कृष्णानें पार्थास असें (मागें सांगितल्याप्रमाणें) ह्मणून आपल्या चतुरउक्तीनें अर्जुनाच्या संशयाचें व विपरीत भासाचें लवकर निरसन केलें. हे शंकरा, कृष्णानें असें ह्मटलें कीं, अर्जुना, योगाभ्यासाच्या साधनानें मिळविलेल्या अंतर्ज्ञानानें पूर्वी जसा तुला मी बोध केला, तसा आतां त्याच अर्थाचा बोध या बाह्यदृष्टीनें करावयास मी असमर्थ आहें. " सहि धर्मः सुपर्याप्तो " हें वाक्य संपल्यानंतर कृष्णानें ह्मटलेलें वाक्य असें. (१०६) अर्जुना, मी योगयुक्त मनानें जो श्रेष्ठ धर्म सविस्तर रीतीनें सांगितला, तोच धर्म आतां पुनः सविस्तर रीतीनें सांगावयास मी समर्थ नाहीं. हें कृष्णाचें पुढील वाक्य होय. योगारूढ अंतर्मनानें जें सांगितलें तेंच योगरहित बहिर्मनानें सांगावयास मी समर्थ नाहीं, असें जें या वाक्यांत ह्मटलें आहे, त्यावरून गीतेंत सांगितलेला सर्व प्रभाव माझा नव्हे, दुसऱ्याचा आहे, असें स्पष्ट केल्याप्रमाणें झालें. नित्यत्व, सर्वज्ञत्व, परब्रह्मत्व त्याच्याच ठिकाणीं (कृष्णाच्या ठिकाणीं) असतें, तर कृष्णानें योगाच्या प्रयत्नाची अपेक्षा कां केली असती? योगयुक्त मनानें जेव्हां कृष्णानें अर्जुनास बोध केला, तेव्हां त्यानें योगमार्गानें शिवाहंभावना धरून शिवाच्या ठिकाणीं असलेलें माहात्म्य सर्व आपल्याच ठिकाणीं प्रतिपादिलें, असें श्रीकृष्णाच्या उक्तीवरून व्यक्त झालें. बाह्यदृष्टीनें सांगावयास मी स-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

...ना वक्तुं न शक्यमित्युक्त्यनंतरमपि सौहृदस्मरणात्पुनरप्युपदेशे-
...स्य संशयादिकं सम्यङ्निरसनीयमित्यालोच्य केनाचित् सिध्दपु-
...षेण काश्यपाय प्राक्कुभ्यं मदुक्तार्थ एवोपदिष्टः स मया श्रुतः त-
...हं वक्ष्यामीति प्रतिज्ञाय काश्यपसिध्दपुरुषसंवादरूपेतिहासेन
...राग्यार्थं पूर्वदेहपरित्यागदेहांतरपरिग्रहप्रकारं इह परत्र च सं-
...ारिणो दुःखबाहुल्यं वैराग्यदृढीकरणार्थं भावनाविशेषान् विरक्त-
...य संसारान्मोक्षोपाययोगं चोपदिश्य ॥ कच्चिदेतत्त्वया पार्थ श्रुत-
...काग्रचेतसा ॥ न तथापि रथस्थः किं श्रुतवानेतदेव हि ॥१०७॥
...ति भगवानुपसंजहार तदर्थं संगृण्हाति ॥ अधुना तदुपास्यसंश-
...यपगछत्विति सौहृदं स्मरन् ॥ इति होक्तमिह श्रुतं मयेत्युपदेश्ये

...ं नाहीं असें ह्मटल्यानंतरही अर्जुनावर कृष्णाचें अतिशय प्रेम असल्या-
...ें, पुनः कृष्णाला असें वाटलें कीं, बाह्यदृष्टीनें याला पुनः बोध केला
...तां याचा संशय जशाचा तसाच राहील कीं काय? असा मनांत विचार
...न त्याच्या संशयाचें निरसन चांगल्या तऱ्हेनें करावें, ह्मणून कृष्णानें
...ास असें ह्मटलें कीं, अर्जुना, पूर्वी एका सिध्दपुरुषानें काश्यपाला हाच
...थ (मी तुला पूर्वी सांगितला होता तोच अर्थ) सांगितला होता, तो
... ऐकिला. आतां तोच अर्थ तुला सांगतों. अशी कृष्णानें प्रतिज्ञा केली.
...ें काश्यपसिद्धपुरुषांचा संवादरूप इतिहास सांगून, संसारी प्राण्याला या
...कीं व परलोकीं वारंवार दुःख भोगावें लागतें, याकरितां मनुष्यानें वैराग्य
...ावें, असें सांगून वैराग्य दृढ होण्याचे सर्व उपाय सांगितले. नंतर विरक्त
...संसारांत राहून संसार तुच्छ मानणारा) मनुष्यानें संसारापासून कसें
...त व्हावें? याचे उपाय सांगितले. नंतर पुनः कृष्ण ह्मणतो. (१०७)
...अर्जुना, मीं जें कांहीं तुला सांगितलें तें तूं एकाग्रमनानें ऐकिलेंस काय?
...थवा रथांत (माझ्याजवळ) बसूनही ऐकिलें नाहींस? असें ह्मणून कृष्णानें
...पलें वाक्य संपाविलें. त्याच अर्थाचा संग्रह कवि आपल्या श्लोकांत करतो.
(१०८) हे शंभो, पार्थावरच्या स्नेहभावानें कृष्णानें असें मनांत ह्मटलें कीं,
...र्जुनाला माझ्या उपास्यदेवतेविषयीं संशय आला आहे, तो संशय दूर
...ो. अशा अभिप्रायानें, मीं ऐकिलेली गोष्ट तुला सांगतों असें अर्जुनाला

LIBRARY. VARANASI.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कियदाह तत्र सः ॥१०८॥ एवमेकदेशद्वारा कृष्णेन स्वस्य श्रवणकर्तृत्वोक्त्या तत्प्रतिपाद्य वहिर्भावो दर्शितः ॥ अथ तत्र मननकर्तृत्वोक्त्यापि तद्दर्शयति ॥ तस्य स्थिरीकरणमात्मनि सर्ववृत्तं स्वस्यैव बुध्दिमनसी द्विजदंपती च ॥ कृत्वानुयोजनतदुत्तरयोरनुक्त्या विख्याप्य तद्विवरणं च चकार शौरिः ॥१०९॥ पूर्वेतिहासकल्पनया परिनिष्पन्नमर्थजातं मनसा सर्वमालोच्य इदमित्थमेवेति तस्य स्वबुद्धौ स्थिरीकरणं पूर्वं स्वेन कृतं कयाचित्कल्पनाभंग्या दर्शितवान् ॥ सा चेयं कल्पनाभंगी यत्स्वकीये बुद्धिमनसी द्विजदंपती कल्पयित्वा ब्राह्मणी ब्राह्मणं कंचित् ज्ञानविज्ञानपारगम् ॥ दृष्ट्वा विविक्त आसीनं भार्या भर्त्तारमब्रवीत् ॥११०॥ इत्यादिना ब्राह्मण्याः प्रश्नमवतार्य तदुक्तिब्राह्मणोक्त्योः प्राचीनेतिहासार्थं सर्वं निवेश्य तदव-

---

कृष्णानें ह्मटलें. "दुसऱ्यापासून ऐकलेली कथा तुला सांगतों" अशा तऱ्हेच्या वाक्यानें कृष्णानें आपलें बहिर्दृष्टित्व व्यक्त केलें. आतां कृष्ण परमेश्वरस्वरूपाचें मनन करीत होता, त्यामुळें त्यानें परब्रह्मतत्व पार्थाला सांगितलें; असें कवि सिद्ध करून दाखवितो. (१०९) हे शंभो, कृष्णानें पूर्वीच्या सर्व वृत्तांताचा विचार मनांत आणून, मनाचा निश्चय प्रथम करून मागून आपल्या बुद्धीला आणि मनाला ब्राह्मण व त्याची पत्नी अशी कल्पना करून, व त्यांच्यामध्यें प्रश्नोत्तरस्वरूपाची कल्पना करून त्या परब्रह्मस्वरूपाचें विवरण पार्थापुढें केलें. पूर्वी अमुक एक इतिहास झाला आहे, अशी कल्पना करून त्या कल्पनेनें निष्पन्न झालेल्या अर्थाचा विचार मनानें करून, हें असेंच आहे असा मनाचा निश्चय करून, बुद्धि दृढ करून, कोण्या एक्या कल्पनोक्तीनें कृष्णानें आपण केलेलें सर्व पार्थाला दाखविलें तें असें. कृष्णानें आपलें मन हें एक ब्राह्मण आहे, व बुद्धि ही त्याची बायको आहे, अशी कल्पना केली. अशी कल्पना करून पुढें जे प्रश्न वगैरे केले आहेत ते असे. (११०) ज्ञानविज्ञानामध्यें पारंगत झालेल्या कोणा एका ब्राह्मणाला ब्राह्मण स्त्रीनें पाहून एकांतांत बसलेल्या आपल्या नवऱ्याला ती बायको बोलली. वगैरे श्लोकांनीं ब्राह्मणस्त्रीचें प्रश्नावतरण करून, त्या स्त्रीच्या व ब्राह्मणाच्या उक्तींला प्राचीन इतिहासार्थाचें स्वरूप देऊन, त्या

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

धारणानंतरम् यदिदं ब्रह्मणो लिंगं क्षेत्रज्ञ इति कीर्तितम् ॥ गृहीतुं येन तच्छक्यं लक्षणं तस्य तद्वद ॥१११॥ इति श्लोकेन बंधमुक्तिफलभाजः शरीरातिरिक्तस्य क्षेत्रज्ञस्य ग्रहणोपायं वदेति ब्राह्मण्याः पुनः प्रश्नांतरमवतार्य ब्राह्मणेनोक्तस्तदुपायोऽपि दर्शितः तदनंतरम् ॥ क्वनु सा ब्राह्मणी कृष्ण कचासौ ब्राह्मणर्षभः ॥ याभ्यां सिद्धिरियं प्राप्ता तावुभौ वदमेच्युत ॥११२॥ इत्यर्जुनेन पृष्टस्य कृष्णस्योत्तरमुपवर्णितम् ॥ मनो मे ब्राह्मणं विध्दि बुध्दिं मे विध्दि ब्राह्मणीम् ॥ क्षेत्रज्ञ इति यश्चोक्तः सोहमेव धनंजय इति ॥११३॥ एवं भगवता कृष्णेन स्वस्य गीतोपदिष्टपरब्रह्मविषयश्रवणमननवत्वमुपाख्यानद्वयकल्पनेन प्रपंचितम् ॥ अथ तेन स्वस्य श्रुते मते च परब्रह्मणि मनोनि-

---

इतिहासार्थाचा निश्चय प्रतिपादिल्यानंतर (१११) " यदिदं ब्रह्मणो लिंगं क्षेत्रज्ञ इति कीर्तितम् ॥ गृहीतुं येन तच्छक्यं लक्षणं तस्य तद्वद " या श्लोकानें बंधमुक्तिरूप फलाचा उपभोग घेणाऱ्या शरीरापासून निराळा असणाऱ्या क्षेत्रज्ञाच्या स्वीकाराचा उपाय कोणता आहे ? हें सांग. असा प्रश्न करणाऱ्या ब्राह्मणस्त्रीचा दुसरा प्रश्न पुनः सांगून, नंतर ब्राह्मणानें सांगितलेला तो उपायही दाखविला. नंतर (११२) क्वनु सा ब्राह्मणी कृष्ण क्वासौ ब्राह्मणर्षभः ॥ याभ्यां सिद्धिरियं प्राप्ता तावुभौ वदमेऽच्युत ॥ " याप्रमाणें प्रश्न करणाऱ्या अर्जुनाला कृष्णाकडून जें उत्तर मिळालें त्याचेंही वर्णन केलें आहे तें असें. (११३) हे अर्जुना, माझें मनच ब्राह्मण आहे, असें मान, आणि माझी बुद्धि हीच त्याची बायको आहे, असें समज. क्षेत्रज्ञ ज्याला ह्मणतात, तो मीच आहें, असें समज. याप्रमाणें गीतेंत सांगितलेल्या परब्रह्मस्वरूपाचें ध्यान, मनन हें दोन उपाख्यानाच्या कल्पनेनें विस्तृत केलें आहे. नंतर आपण (कृष्णानें) श्रवण केलेल्या व आपल्यास संमत झालेल्या परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं मनोनियमन (म-

---

१ अर्थः—जें हें ब्रम्हरूपी लिंग (इष्टलिंग) आहे, त्याला क्षेत्रज्ञ असें ह्मणतात. असा त्या क्षेत्रज्ञाचा स्वीकार करावयास कोण समर्थ होईल? व त्याचें लक्षण काय हें मला सांग.

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

यमनं तदुपयुक्तभक्तिस्थैर्यार्थं मनसा परब्रह्मभावलिंगभूतनिखिल-तन्महिमावधारणं तस्य श्रुतिसिद्धब्रह्मलक्षणभूतजगत्कारणताशालित्वं स्वस्यापि तत्संसृष्टत्वं कर्मानुष्ठानसहितया तदुपासनया स्वस्य हृदयग्रंथिविप्रमोक्ष इत्येतत्सर्वमर्जुनमवगमयितुं यत् गुरुशिष्यसंवादरूपमुपाख्यानांतरं कल्पितम् ॥ यच्च तौ गुरुशिष्यौ अहं मम मनश्चेति पश्चाद्विवरणं कृतम् ॥ तदर्थं संगृण्हाति ॥ अग्रे तत्वं परं किं त्वमहमपि कुतः सर्वं भूतानि चेति प्रश्ने शिष्यस्य तस्मै गुरुकृतमखिलं ब्रह्मतत्वोपदेशम् मोक्षं शिष्यस्य चोक्त्वा पुनरपिविजयेनानुयुक्तो गुरुः कः शिष्यो वेति स्वमेवेश्वरगुरुमवदत्स्वस्य चित्तं स्वशिष्यम्

नाचा निग्रह) करणें, व या मनोनिग्रहाला उपयोगी अशी भक्ति दृढ करण्याकरितां परब्रह्मत्व दाखविणाऱ्या परब्रह्मस्वरूपाच्या माहात्म्याचें मनानें चिंतन (धारण) करणें, श्रुतींत प्रतिपादिलेलें ब्रह्माचें जगत्कर्तृत्वरूपलक्षण याच्या ठिकाणीं (आपण जें ऐकिलें होतें, त्या ब्रम्ह्याच्या ठिकाणीं) प्रतिपादन करणें, आपली सृष्टि त्याच्यापासूनच झाली आहे, असें सांगणें, कर्मानुष्ठानसहित ब्रह्माच्या उपासनेनें आपल्या (कृष्णाच्या) हृदयांतली अज्ञानरूपी गांठ सुटून मोक्षप्राप्ति झाली असें सांगणें, वगैरे हकीकत अर्जुनाला नीट समजून देण्याकरितां गुरुशिष्यसंवादरूप कथानकाची दुसरी कल्पना कृष्णानें केली. (दुसऱ्या कथेची कल्पना करून अर्जुनाला कृष्णानें सर्व नीट समजावून दिलें). ते गुरुशिष्य मी व माझें मन हेंच होत असें कृष्णानें जें मागाहून स्पष्टीकरण केलें, त्याच अर्थाचा संग्रह कवि करतो. (११४) शिष्य प्रश्न करितो. हे गुरो, श्रेष्ठ परब्रह्मतत्व कोणतें? व तूं, मी, व हे सर्व प्राणी कोणापासून झाले? असा शिष्याचा प्रश्न झाल्यावर गुरूनें शिष्याला सर्व ब्रह्मतत्वाचा बोध केला, व मोक्षाचा उपदेशही केला. याप्रमाणें गुरुशिष्यसंवादरूप इतिहास ऐकून अर्जुनानें कृष्णास प्रश्न केला कीं, हे कृष्णा, तो गुरु कोण, व तो शिष्य कोण? हें सांग. असा प्रश्न ऐकून कृष्णानें सांगितलें कीं, अर्जुना, मी गुरु व माझें मनच शिष्य आहे असें समज. याप्रमाणें कृष्णानें कल्पिलेल्या दोन इतिहासांचा अभिप्राय मनांत

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥११४॥ एवं कृष्णकल्पितोपाख्यानद्वयाभिप्रायं सर्वमवधारितवतो-र्जुनस्य ॥ ब्रह्म यत्परमं वेद्यं तन्मे व्याख्यातुमर्हसि ॥ भवतो हि प्रसादेन सुसूक्ष्मे रमते मतिः ॥११५॥ इति प्रश्नानंतरं परब्रह्मस्वरूपमुपदेष्टुकामेन कृष्णेन शिष्याचार्यसंवादरूपः कश्चन कल्पितेतिहासः प्रवर्तितः ॥ कंचिद्ब्राह्मणमासीनमाचार्यं संशितव्रतम् ॥ शिष्यः पप्रछ मेधावी किंस्वित्परतरं तव ॥११६॥ इत्युपक्रम्य ॥ कुतश्चाहं कुतश्च त्वं तत्सर्वं ब्रूहि यत्परम् ॥ कुतो जातानि भूतानि स्थावराणि चराणि च ॥११७॥ केन जीवंति भूतानि तेषां स्यात्कुत्र वा लयः ॥११८॥ इत्यादिना शिष्यकृताः केचन प्रश्ना उपन्यस्ताः तदुत्तरं वक्तुकामस्याचार्यस्य ब्रह्मप्रोक्तमिदं धर्ममृषिप्रवरसेवितम् ॥ वेदविद्यासमावाप्तं तत्वभूतार्थभावनम् ॥११९॥ भूतभव्यभविष्यादिधर्मकामार्थनिश्चयम् ॥ सिद्धसंघपरिज्ञातं पुराकल्पं सनात-

---

[...] अर्जुनानें ह्मटलें कीं, (११९) जाणावयास योग्य असें ब्रह्म कोणतें? [...] सांग. तुझ्या प्रसादानें माझी बुद्धि सूक्ष्मपदार्थांत (ब्रह्मवस्तूंत) रम[...] होते. अशा दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देण्याकरितां परब्रह्मस्वरूपाचा अ[...] बोध करावा ह्मणून शिष्यगुरुसंवादरूप इतिहासाची कल्पना कृष्णानें [...] ती कल्पना अशी. (११६) नियमितव्रत बसलेल्या अशा कोणा [...] ब्राह्मणाला पाहून बुद्धिमान् शिष्यानें प्रश्न केला कीं, गुरो तुझें परतत्व [...] आहे सांग. असा उपक्रम करून पुढें प्रश्न केले कीं, (११७) हे [...] तूं कोठून आलास? व मी कोठून आलों? व हे सर्व प्राणी कोठून [...]? व (११८) या सर्व जीवांची उपजीविका कोणापासून होते? यांचा [...] कोठें होतो? वगैरे प्रश्न शिष्यानें केल्याबरोबर या प्रश्नांस उत्तर दे[...]करितां आचार्यानें असें ह्मटलें कीं, (११९) शिवाच्या मुखांतून निघा[...], श्रेष्ठ श्रेष्ठ ऋषींनीं सेवन केलेला, वेदविद्येपासून उत्पन्न झालेला, पर[...]तत्वाचें प्रतिपादन करणारा, (१२०) भूत, वर्तमान, भविष्यकालां[...] धर्म, अर्थ, काम यांचा निश्चय करणारा, सिद्धसंघांनीं ज्याचें ज्ञान [...] घेतलें असून पूर्वकल्पापासून चालत आल्यामुळें पुरातन ह्मणवि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

नम् ॥१२०॥ प्रवक्ष्यामि महाप्राज्ञ पदमुत्तममद्य ते ॥ बुध्वा यदिह संदिग्धा भविष्यंति मनीषिणः ॥१२१॥ इति तदुत्तरोक्तिप्रतिज्ञामुपन्यस्य तत्र श्रोतुरत्यादरसिद्धये महर्षीणां चतुर्मुखस्य संवादरूपमत्र विषये महदुपाख्यानमाचार्येणोपदिष्टमिति तदुपाख्यानमुखेन शिष्यप्रश्नविषयसकलार्थोपदेशः तन्मध्ये यत्स्वस्य विष्णोश्च महिमावर्णनपरं देवर्षीन् प्रति ब्रह्मवचनम् ॥ सर्वेषामपि भूतानामहं ब्रह्ममयो महान् ॥ भूतं परतरं मत्तो विष्णोरपि न विद्यते ॥१२२॥ राजाधिराजः सर्वेषां विष्णुर्ब्रह्ममयो महान् ॥ ईश्वरं तं विजानीमः सविभुः स प्रजापतिः ॥१२३॥ देवदानवभूतानां पिशाचोरगरक्षसाम् ॥ नरकिन्नरयक्षाणां सर्वेषामीश्वरः प्रभुः ॥१२४॥ आदिर्विश्वस्य जगतो विष्णुर्ब्रह्ममयो महान् ॥१२५॥ इति ॥ तेन कुतश्चाहं कुतश्च त्वं इति प्रश्नस्योत्तरं निर्गतम् ॥ ब्रह्ममय इति मयटा अभ्यस्तेन ब्रह्मकार्यत्वं

णारा, (१२१) असा जो अत्युत्तम धर्म आहे, तो धर्म, हे महाप्राज्ञा, मी तुला सांगतों. ज्या धर्माचें ज्ञान करून घेतलें असतां पंडित लोकांना या अशाश्वत जगाविषयीं संशय उत्पन्न होतो, तो धर्म मी सांगतों. याप्रमाणें शिष्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याकरितां पूर्वोक्त वाक्याचा उपक्रम करून त्यांत श्रोत्याला अतिशय आदर उत्पन्न होण्याकरितां महर्षि ब्रह्मसंवादरूप जें मोठें आख्यान आचार्यानें शिष्यास सांगितलें, त्या आख्यानाच्या उपाख्यानांतीलच शिष्यानें केलेले वर दिलेले प्रश्न होत. त्यामध्यें ब्रह्मदेवानें विष्णूचें व आपलें माहात्म्य दाखविणारें वाक्य ऋषींना सांगितलें आहे. तें असें. (१२२) हे मुनिवर्यहो, सर्व प्राण्यांमध्यें मी मोठा ब्रह्ममय आहें माझ्यापेक्षां व विष्णूपेक्षां श्रेष्ठ कोणी नाहीं. (१२३) ब्रह्ममय असा महाविष्णु सर्वांचा राजा आहे. त्या महाविष्णूला प्रभु असें आह्मी समजतों. तोच विभु, तोच प्रजापति होय. (१२४) देव, दानव, भूत, पिशाच, सर्प, राक्षस, मनुष्य, किन्नर, यक्ष इत्यादि सर्व प्राण्यांचा स्वामी तो आहे. (१२५) तो ब्रह्ममय विष्णु सर्व जगाच्या आधींचा आहे. याप्रमाणें आपलें व विष्णूचें महत्व ब्रह्मदेवानें सांगितलें. यावरून "कुतश्चाहं कुतश्चत्वं" या प्रश्नाचें उत्तर निघाल्यासारखें झालें. "ब्रह्ममय" या शब्दांतील मयट्प्रत्ययानें विष्णु

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

ष्णोरुक्तम् ॥ स एव च भगवान् कृष्णः न च तत्र मयटः स्वरू-
र्थकत्वं युक्तम् ॥ अधिकार्थाभावे वैयर्थ्यप्रसंगात् ॥ चतुर्मुखे प्र-
क्तस्य ब्रह्ममयशब्दस्य ब्रह्मकार्यार्थतया तत्प्रायपाठविरोधापत्तेश्च
तं ब्रह्मदेवर्षिसंवादरूपोपाख्यानोपन्यासानंतरं गुरोः शिष्यं प्रति-
नम् ॥ त्वमप्येवं महाभाग यथोक्तं ब्रह्मणो वचः ॥ सम्यगाचर-
द्धात्मन् ततः सिद्धिमवाप्नुहि ॥१२६॥ इत्युक्तस्स तदा शिष्यो
णा धर्ममुत्तमम् ॥ चकार सर्वं कौंतेय ततो मोक्षमवाप्तवान् ॥१२७॥
कृत्यश्च स तदा शिष्यः कुरुकुलोद्वह ॥ तत्पदं समनुप्राप्तो यत्र
ला न शोचति ॥१२८॥ इति ॥ तदनंतरम् ॥ कोन्वसौ ब्राह्मणः
ष्ण कः स्विच्छिष्यो जनार्दन ॥ श्रोतव्यं यन्मयैतद्वै तन्ममाचक्ष्व

परब्रह्मतत्वापासून उत्पन्न झाला, असें सिद्ध झालें. कारण पुनः पुनः
ट्प्रत्ययाचा उच्चार केला आहे. तोच विष्णु हा कृष्ण आहे. तो मयट्प्र-
य तादात्म्यार्थी झाला आहे, असें मात्र समजूं नये. कारण त्यापासून अ-
क अर्थ निघत नसल्यामुळें शब्दापुढें विनाकारण प्रत्यय लाविला आहे,
सें होणार. शिवाय ब्रह्मदेवाला देखील ब्रह्ममय असें विशेषण दिलें आहे;
हां तेथें विकारार्थी मयट् केला आहे असें समजून ब्रह्मदेव हा परतत्वा-
सून झाला असेंच सांगितलें आहे. तर या पाठाला विरोध न येण्यासारखा
थें करणें ह्मणजे मयट् विकारार्थीच केला आहे, असें समजलें पाहिजे.
गो. याप्रमाणें ब्रह्मदेवर्षिरूप उपाख्यान सांगितल्यानंतर गुरूनें शिष्यास
गितलें कीं, (१२६) हे भाग्यशाली शिष्या, जसें ब्रह्मदेवाचें वाक्य सां-
गलें आहे, तसें हे शुद्धात्म्या, तूं आचरण कर; ह्मणजे त्यापासून लवकर
द्धि पावशील. (१२७) कृष्ण अर्जुनाला ह्मणतो, हे कुंतीपुत्रा अर्जुना,
प्रमाणें गुरूचें वचन ऐकून शिष्यानें त्याप्रमाणें आचरण करून मोक्ष
मिळविला. (१२८) हे कुरुकुलोद्भवा, अर्जुना, याप्रमाणें तो शिष्य कृतार्थ
ऊन ज्या ठिकाणीं दुःखाचा लेशही नाहीं, अशा त्या उत्तम पदाला गेला.
प्रमाणें कृष्णानें सांगितल्यानंतर अर्जुनानें प्रश्न केला, तो असा. (१२९)
जनार्दना, तो ब्राह्मण कोण? व त्याचा शिष्य कोण? हें मला समजून
घ्यायाचें आहे, तर तें मला सांग. याप्रमाणें अर्जुनानें प्रश्न केल्याबरोबर

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

हे विभो ॥१२९॥ इत्यर्जुनप्रश्ने श्रीकृष्णवचनम् ॥ अहं गुरुर्महाबाहो मनः शिष्यं हि विद्धि मे ॥ त्वत्प्रीत्या गुह्यमेतच्च कथितं ते धनंजय ॥१३०॥ मयि चेदस्ति ते प्रीतिर्नित्यं कुरुकुलोद्वह ॥ अध्यात्ममेतच्छ्रुत्वा त्वं सम्यगाचर सुव्रत ॥१३१॥ ततस्त्वं सम्यगाचीर्णे धर्मेऽस्मिन् कुरुनंदन ॥ सर्वकामविशुद्धात्मा मोक्षं प्राप्स्यसि केवलम् ॥१३२॥ इति ॥ एतदर्थः सर्वोऽप्यत्र संगृहीतः ॥ एवं पार्थप्रागगृहीतं गीतार्थमिदानींतनविवरणानुसारेण गृण्हात्वित्याभिप्रेत्य कृष्णेनानुगीतासु गीताशयविवरणं कृतमित्येतत् तत्कृतविवरणानुसारेण परिनिष्पन्नं गीतार्थं प्रदर्शयन्नाह ॥ ब्रह्मण्येवं स्वचेतो नियमनसमुपस्थायि तद्ग्रंथि मोक्षं स्वेनैवोक्तं विमृश्य प्रपदनवचनं तत्प्रतीतार्थनिष्ठम् ॥ यत्तत्सर्वस्य चाहं हृदिमुखवचनं तत्पुनः शास्त्रदृष्टे

कृष्णानें सांगितलें कीं, (१३०) हे अर्जुना, तो गुरु मी असून माझें मन त्या गुरूचा शिष्य आहे, असें जाण. तुझ्यावर माझें अतोनात प्रेम असल्यामुळें हें गुह्य मीं तुला सांगितलें. (१३१) हे कुरुकुलोद्भवा, सुव्रता अर्जुना माझ्यावर जर तुझें प्रेम असेल तर, हें अध्यात्म श्रवण करून त्याप्रमाणे आचरण कर. (१३२) हे कुरुनंदना, या धर्माचें आचरण चांगल्या प्रकारें केलेंस तर, पुनीत देह होऊन केवळ मोक्षाला जाशील. याप्रमाणें कृष्णार्जुन संवाद झाला. हाच सर्व अर्थ कवीनें आपल्या कवितेंत दिला आहे. असो. पूर्वी गीतेचा उपदेश झाला त्यावेळीं अर्जुनाला समजलें नाहीं, ह्मणून प्रस्तुतकालीं जें विवरण करणार, त्या विवरणानें अर्जुनाची समजूत होवो अशा अभिप्रायानें अनुगीतेमध्यें गीताशयाचें विवरण कृष्णानें केलें आहे त्या विवरणाला अनुसरून जो अर्थ निष्पन्न झाला, तो अर्थ दाखविण्या करितां कवि ह्मणतो. (१३३) परब्रह्माच्या ठिकाणीं आपलें मन नियमानें जो ठेवतो, त्या प्राण्याच्या मनांतील अज्ञानग्रंथि आपोआप सुटते, अशा अर्थाचें वाक्य कृष्णानें अर्जुनास सांगितलें. नंतर परब्रह्माची प्रतीति दाखविणारें प्रपदनवाक्य (शरणगति दर्शकवाक्य) विचार करून स्वतः कृष्णानें सांगितलें. परंतु त्यांत "सर्वस्य चाहं हृदि" वगैरे जीं वचनें सांगितलीं आहेत, तीं शास्त्रदृष्टीनें सांगितलीं आहेत, असें समजावें. याप्रमाणें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

त्येवं पार्थोऽवगच्छेदिति विवृतिरकार्यत्र गीताशयस्य ॥१३३॥ गीतातावद्गीताशयविवरणार्थेऽतिस्पष्टम् ॥ तथैव तदुपक्रमात् ॥ प्येतदेवोक्तं युद्धकाल उपस्थिते ॥ मया तव महाबाहो तस्मादत्र : कुरु ॥१३४॥ इति तदुपसंहाराच्च तत्र च गुरुशिष्योपाख्यान जेन स्वस्य परब्रह्मप्रपदनादेव हृदयग्रंथिविप्रमोक्षपूर्विका सिद्धि- ति स्पष्टमेवोक्तं अतस्तदनुसारेण तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्य इत्ये- स्वार्थनिष्ठं कृष्णेन अहंभावेन ब्रह्मोपदेशो यः कृतः स सर्वोपि दृष्ट्या "प्राणोऽस्मि प्रज्ञात्मा तम्मामायुरमृतमुपास्व" इति प्रत- र्दनकृतस्वात्मब्रह्मभावोपदेशवद्ब्रह्माहंभावभावनाप्रयुक्तः न स्वा- त्मभावाशयप्रयुक्त इति यद्यपि तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्य इ- वचनमनुरुध्य श्रीकृष्णस्य ब्रह्माहंभाववचनानामन्यथानयन- क्रमिव तथापि श्रीकृष्णेनैवानुगीतासु प्रपंचेन कृतम् गीताशय-

---

ची समजूत होण्याकरितां गीताशयाचें विवरण कृष्णानें केलें आहे. न गीताशयाचें विवरणच अनुगीता आहे, असें झालें. कारण त्याचा मही तसाच केला आहे. (१३४) हे बाहुशाली अर्जुना, लढाईच्या आरंभीं तुला हेंच सांगितलें होतें. याकरितां तूं यावर चांगल्या प्रकारानें निष्ठा ठेव. उपसंहार केला आहे. त्यांत गुरुशिष्यसंवादरूप उपाख्यानाच्या निमि- जी कथा सांगितली आहे, त्या कथेवरून असें दिसून येतें कीं, पर- ला शरण गेलों, ह्मणूनच हृदयांतील अज्ञानरूपी गांठ सुटून मोक्षरूप आपल्यास (कृष्णास) मिळाली. असाच कृष्णाचा अभिप्राय आहे, यावरून स्पष्ट दिसतें. ह्मणूनच वरील वाक्याला अनुसरून " तमेव पुरुषं प्रपद्ये " हें वाक्य कृष्णानें स्वार्थपर प्रतिपादिलें आहे. कृष्णानें वपूर्वक जो उपदेश केला आहे, तो सर्व उपदेश शास्त्रदृष्टीनें केला असें समजावें. " प्राणोऽस्मि प्रज्ञात्मा तम्मामायुरमृतमुपास्व " असा प्रतर्दनाला जो उपदेश केला आहे, तो देखील ब्रह्माहंभावनेनें (सोहं भावानें) केला आहे. ब्रह्मतादात्म्यभावानें कांहीं केला नाहीं. जरी 'तमेव पुरुषं प्रपद्ये ' हें कृष्णाचें वाक्य ब्रह्माहंभाववचनांच्या विरुद्ध दिसतें, श्रीकृष्णानें अनुगीतेमध्यें त्याचें विवरण चांगलें केलें आहे; व गीतें-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

विवरणमनुरुध्य युक्तमेवेति भावः ॥ एवं गीताप्रपंचितबहुमहिमशालिनः कृष्णस्यापि समाश्रयणीयत्वेन तस्यां प्रतिपादितं यद्ब्रह्म तत्परमशिव एवेत्युपसंहरन् तत्र शंकास्पदं विरोधं परिहरति ॥ तच्च ब्रह्मप्रपत्त्यास्पदमसुररिपोरीश्वरत्वं न चान्यो नाहं कंचित्प्रपद्ये विबुधमिति वचः श्रोतुरुत्कृष्टबुध्यै ॥ सेवंते नीलकंठं परिमितफलदं न प्रबुद्धा इतीदं ब्रह्मैक्यध्यातृविद्वद्विषयमितरथा नास्ति भूयोऽनुरोधः ॥१३५॥ तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये इत्यत्र प्रपदनीयपरब्रह्मपरस्य पुरुषशब्दस्य विभर्त्यव्यय ईश्वरः ईश्वरः सर्वभूतानामिति ईश्वरनाम्नोपस्थिते शिव एव प्रत्येतव्ये तु रुद्रं समाश्रिता देवा रुद्रो ब्रह्माणमाश्रितः ॥ ब्रह्मामामाश्रितो राजन् नाहं कंचिदुपाश्रये ॥१३६॥ इति युधिष्ठिरं प्रति कृष्णवचनेन तस्य समाश्रयणीयएव नास्तीति प्रति-

---

तल्या अभिप्रायाला अनुसरूनच बरोबर सांगितलें आहे. याप्रमाणें गीतेंत ज्या कृष्णाचें महत्व पुष्कळ सांगितलें आहे, त्या प्रभावशाली कृष्णानें ज्या परब्रह्माचा आश्रय करून शरण जावयाचें मनांत योजिलें, तें परतत्व शिवच आहे, अशा अर्थाचा उपसंहार करून त्यांत कवि शंकास्पद (शंकेचें स्थान) विरोधाचा परिहार करतो. (१३५) ईश्वरत्व प्रतिपादन करणारें जें ब्रह्मप्रपदनवाक्य तें शिवपरच आहे. कारण श्रोत्यांची बुद्धि निर्मळ करावयास कृष्णानें असें ह्मटलें आहे कीं, मी कोणत्याही इतर देवांस शरण जात नाहीं, केवळ शिवालाच शरण जातों (हेंच ब्रह्मप्रपदनवाक्य होय.) " अज्ञानी लोक परिमित फल देणाऱ्या नीलकंठाची सेवा करतात. " अशा अर्थाचें हें वचन ब्रह्मैक्यध्यानकर्त्याचें आहे. असें ह्मटल्यामुळें यांत फारसा विरोध येत नाहीं. " तमेव चाद्य पुरुषं प्रपद्ये " या वाक्यांतल्या प्रपदनीय परब्रह्मरूप अर्थ दाखविणाऱ्या पुरुष शब्दाचा अर्थ व " विभर्त्यव्यय ईश्वरः " " ईश्वरः सर्वभूतानां " या वाक्यांतल्या ईश्वरशब्दाचा अर्थ शिवच आहे, दुसरा नाहीं. याविषयीं कवि प्रमाण दाखवितो. (१३६) सर्व देवांनीं रुद्राचा आश्रय केला आहे, रुद्रानें ब्रह्मदेवाचा आश्रय केला आहे, हे राजा, ब्रह्मदेवानें माझा आश्रय केला आहे मी मात्र कोणाचा आश्रय करीत नाहीं. याप्रमाणें धर्मराजाला कृष्णानें जें सांगितलें, त्यांत कृष्णाचा आश्रय असा

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मोक्षधर्मे ॥ ब्रह्माणं नीलकंठं च याश्चान्या देवताः स्मृताः॥ प्रति-
न सेवंते यस्मात्परिमितं फलम् ॥१३७॥ इति फलसामान्यत-
स्य प्रतिबुद्धसेव्यत्वं निवारितम् ॥ कथं कृष्णेन शिवस्य स-
यणीयत्वमुच्यते इत्यत्रेदमुत्तरम् ॥ नाहं कंचिदुपाश्रय इति कृ-
वनं प्रागेव स्वभक्तं वैष्णवैरनुष्ठेयान् वैष्णवधर्मान् पृष्टवंतं युधि-
प्रति तद्धर्मनिरूपणार्थमेव प्रवर्तितस्य वैष्णवधर्मशास्त्रस्यावसाने
दं श्रूयते अतो न बुद्धिभेदं जनयेदिति न्यायेन स्वस्मिन् यु-
रस्य प्राक्सिद्धभक्तेरभिवृद्धये तत्परोचनार्थं नाहं कंचिदुपाश्र-
ति वचनं ब्रह्माणं नीलकंठं चेत्यादि वचनं तु अहं ब्रह्मोपासना-
विद्वद्विषयं प्रतिमा स्वल्पबुद्धीनामित्यादिवचनैकार्थ्यात् ॥ शेष-
नुसंधानगर्भायाः सेवायाः ऐक्यानुसंधानविरोधित्वाच्च एवमर्थ-

नाहीं असें सिद्ध होतें. मोक्षधर्मांत सांगितलें कीं, (१३७) ब्रह्मा,
ठ, व इतर देवता यांचा आश्रय बुद्धिमान् करीत नाहीं. कारण यां-
मून परिमित फल मिळतें. याप्रमाणें ज्ञानी लोकांनीं शिवाचा आश्रय
केला? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. तर याला उत्तर " नाहं कं-
ाश्रये " हेंच होय. परंतु " नाहं कंचिदुपाश्रये " हें वाक्य कृष्णानें
जें सांगितलें, त्यांतला भावार्थ असा आहे कीं, वैष्णवांनीं करावयास
अशा वैष्णवधर्माविषयीं प्रश्न करणाऱ्या भक्त धर्मराजाला वैष्णवधर्म-
ण करावयाकरितां धर्मशास्त्र सांगावयास श्रीकृष्ण प्रवृत्त झाला. अशा
ष्णवधर्मशास्त्राच्या शेवटीं कृष्णानें " नाहं कंचिदुपाश्रये " हें वाक्य
आहे. तें अशाकरितां घातलें आहे कीं, " न बुद्धिभेदं जनयेत् "
ी बुद्धि फितवूं नये या न्यायानें पूर्वीपासून अभिवृद्ध झालेल्या भ-
वाढीकरितां, व धर्मराजाला आवडण्याकरितां "नाहं कंचिदुपाश्रये"
ृष्णानें ह्मटलें आहे. आतां " ब्रह्माणं नीलकंठम् " वगैरे जीं वचनें
ीं आहेत, तीं ' सोहं ब्रह्म ' याप्रमाणें उपासना करणाऱ्या विद्वान्
ा अभिप्रायाचीं आहेत. कारण " प्रतिमास्वल्पबुद्धीनां " वगैरे वच-
बरोबरीचीं तीं मागचीं वचनें आहेत. शेषत्वानुसंधान गर्भित संवेशीं
संधानसेवा जुळत नाहीं. कारण दोन्ही परस्पर विरोधी आहेत. अशा

...ADHYA ...MANDIR JNANA SIMHASAN LIBRARY. Jangamwadi Math, VARANASI Acc. No. 3481

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

कत्व एव अनयोर्वचनयोर्भूयो वचनानुरोधो भवति भूयोऽनुग्रह एव च न्याय्यः भूयांसि खल्वनुगीतावचनानि तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्य इत्यस्य प्रतीतार्थपरत्वव्यवस्थापकानि भूयांसि च भारतपर्वसु हरिवंशे च विष्णोः शिवाराधकत्वप्रतिपादकानि ननु कर्णपर्वणि विष्णुरात्मा भगवतो भवस्यामिततेजसः ॥ तस्माद्धनुर्ज्यासंस्पर्शं सविषेहे महेशितुः ॥१३८॥ इति त्रिपुरविजयोपाख्यानगतवचनेन यस्त्वां द्वेष्टि स मां द्वेष्टि यस्त्वामनुसमामनु ॥ आवयोरंतरं नास्ति शब्दैरर्थैर्जगत्पते ॥१३९॥ नामानि तव गोविंद यानि लोके महांति च ॥ तान्येव मम नामानि नात्र कार्या विचारणा ॥१४०॥ इति हरिवंशे कृष्णं प्रति शिववचनेन अन्यैश्चैवं भूतवचनैः परब्रह्मभूतशिवाभिन्नतया नित्यावाप्तसमस्तकाम इति त्वयाप्येष्टव्यं तथा च

अर्थाच्या ठिकाणींच या दोन्ही वचनांमध्यें विरोध दिसतो. याकरितां यांमध्यें अनुग्रहच बरोबर दिसतो. अनुगीतेमध्यें पुष्कळ वचनें “ तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये ” या वाक्यांतला प्रतीतार्थ दाखविणारीं असून, तत्परच पुष्कळ वचनें आहेत. तसेंच भारताचा शेष अशा हरिवंशामध्यें कृष्णानें शिवाराधना केली, असा अर्थ दाखविणारीं वचनें पुष्कळ आहेत. पुढें आणखी कांहीं वचनें देऊन त्यांमध्यें शंका घेऊन कवि समाधानपर उत्तर देतो. कर्णपर्वांत असें ह्मटलें आहे कीं, (१३८) अपरिमित तेजस्वी भगवान् शिवाचा आत्मा विष्णु हा आहे, ह्मणूनच महेशाच्या धनुष्याच्या दोरीचा स्पर्श विष्णूनें सहन केला नाहीं. याप्रमाणें या त्रिपुरविजयोपाख्यानांतल्या वचनानें व (१३९) जो तुझ्याशीं द्वेष करतो, तो माझ्याशीं द्वेष करतो, असें मी समजतों. जो तुला अनुसरून राहतो, तो मला अनुसरून राहतो, असें समजतों. हे जगत्पते शब्दांनीं अथवा अर्थांनीं आह्मां दोघांमध्यें मुळींच भेद नाहीं. (१४०) हे गोविंदा, जीं तुझीं मोठमोठीं नांवें जगांत आहेत, तींच माझीं नांवें आहेत. यांत विचार करावयास नको आहे. याप्रमाणें हरिवंशांत कृष्णाला शिवानें ह्मटलें आहे. या वचनानें व इतर अशाच तऱ्हेच्या वचनांनीं परब्रह्मस्वरूपी शिवाशीं ऐक्यता सांगितल्यामुळें कृष्ण हा निरंतर पूर्ण मनोरथ पावलेला आहे असें सिद्ध झालें. मग “ भक्तं

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

भक्तं हि मां भजमानं भजस्व तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्य इ-
वनमनुसृत्याभ्युदयनिश्रेयसार्थं शिवप्रपदनमुच्यत इति चेत्
थापि अन्येषामभ्युदयनिश्रेयसार्थं प्रपदनं स्वस्यापि मूलमूर्तिः
ति तन्महिमातिशयप्रख्यापनार्थं च लोकानुजिघृक्षोस्सकल-
र्तकस्य विष्णोः शिवप्रपदनमेष्टव्यमेव तथैव हि मोक्षधर्मे
श्रीकृष्णवचनम् ॥ मया प्रमाणं हि कृतं लोकस्तदनुवर्तते ॥
देवोऽस्ति कश्चिन्मे वरः पांडवनंदन ॥१४१॥ इति संचिन्त्य म-
राहं विश्वमीश्वरम् ॥ पुत्रार्थमाराधितवानहमात्मनमात्मना
॥ इति ॥ नैव पश्यंति तं देवं मोहिता मम मायया॥ ततोऽहं
शो मूलं ज्ञापयन्पूजयामि तम् ॥१४३॥ इति च ॥ तस्मात्
चिदुपाश्रय इत्यस्य उक्ताभिप्राय एवान्वेष्टव्यः तथा आश्व-

भजमानं भजस्व" "तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये" वगैरे वचनांला अ-
अभ्युदय व कल्याण यांच्या प्राप्तीकरितां शिवप्रपदन सांगितलें आहे,
? तर याला कवि उत्तर देतो. अशीं जरी मागचीं वचनें आहेत
स्याच्या अभ्युदयाकरितां, कल्याणाकरितां शिवप्रपदन (शिवाला
जाणें) सांगितलें, त्यांबरोबर आपल्यालाही (कृष्णालाही) शिवच
ण आहे, असें सांगण्याचा हेतु एवढाच आहे कीं, शिवाचें माहात्म्य
करून लोकांवर अनुग्रह करावा, ह्मणून सर्व धर्मप्रवर्तक विष्णूनें
शिवाला शरण जातों" असें सांगितलें. तसेंच मोक्षधर्मांत व कृ-
त श्रीकृष्णानें सांगितलें आहे कीं, (१४१) हे पांडुनंदना, मी जें
तें प्रमाण धरून त्याप्रमाणें सर्व लोक चालतात. याशिवाय मला
कोणताही वर द्यावयाचा नसतो. (१४२) असा मनानें विचार
र्वीं मीं श्रीशिवाची आराधना पुत्रप्राप्तीकरितां ह्मणून केली. यांत
आत्म्याची आराधना केल्याप्रमाणेंच आहे. असें हें वाक्य होय.
सें कीं, (१४३) माझ्या मायेनें सर्व लोक मोहित होऊन त्या शि-
हत नाहींत. याकरितां मी माझ्या आत्म्याचें मूलतत्व शिवच आहे,
जून शिवाची पूजा करतों. इत्यादि वचनांवरून "नाहं कंचिदु-
या वाक्याचा अभिप्राय जो मागें सांगितला आहे, तोच अभि-

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

मेधिकेपर्वणि वैष्णवधर्मानेव पृष्टवंतं युधिष्ठिरं प्रति तानेवोपदेष्टुं प्रवृ
त्तिते वैष्णवधर्मशास्त्रे कथं वैखानसाः ब्रूयुः कथं वै पांचरात्रका इत्या
दिना केवल वैष्णवधर्मानेव पुनः पुनः पृच्छ्यमानेनापि तस्य शिवस्य
चाराधनं तुल्यविकल्पतयातुल्यफलतयैव च दर्शितम् ॥ यथा
निवेशयति मन्मूर्त्या आत्मानं मां नरः शुचिः ॥ रुद्रं दक्षिणमूर्त्या
वा चतुर्दश्यां विशेषतः ॥१४४॥ सिद्धैर्ब्रह्मर्षिभिश्चैव देवलोकैश्च
जितः ॥ गंधर्वैर्भूतसंघैश्च गीयमानो महातपाः ॥१४५॥ प्रविशेत्स
महातेजा मां वा शंकरमेव वा ॥ न स्यात्पुनर्भवो राजन् नात्र का
र्या विचारणा ॥१४६॥ विषुवे स्नपनं यस्तु मम कुर्याद्धरस्य वा
अर्चनं च यथान्यायं तस्य पुण्यफलं शृणु ॥१४७॥ दशजन्मकृ
पापं तस्य सद्यो विनश्यति ॥ दशानामश्वमेधानामिष्टानां लभते फ

प्राय मनांत धरून सर्व वचनांची व्यवस्था केली पाहिजे, असें सिद्ध झा
तसेंच अश्वमेधपर्वांत वैष्णवधर्मासंबंधीं प्रश्न करणाऱ्या धर्मराजाला तो ध
सांगावयास वैष्णवधर्मशास्त्राचा आरंभ केला आहे, त्यामध्यें धर्मानें प्र
केला आहे कीं, कृष्णा, यांत वैखानसांचा अभिप्राय कसा आहे? व पां
रात्रिक काय ह्मणतात? वगैरे पुनः पुनः केलेल्या प्रश्नांनीं केवळ वैष्ण
धर्माचेंच ज्ञान करून घ्यावयाची इच्छा करणाऱ्या धर्मास शिवाची आ
धना समान विकल्पभावानें करावी, असें कृष्णानें दाखविलें आहे. तें अ
कीं, (१४४) मनुष्य हा शुद्ध होऊन माझ्या मूर्तीनें आत्मस्वरूप माझी स्था
पना करितो, किंवा दक्षिणामूर्तीनें रुद्राची स्थापना करून विशेषकरू
त्याची पूजा अर्चा वगैरे करतो. (१४५) सिद्ध, महर्षि, देव, गंधर्व, भू
वगैरे त्याची पूजा करतात, व त्याची स्तुति गायन वगैरे करतात. (१४६
पूजा करणारा तो भक्त माझ्याठिकाणीं किंवा शंकराच्या स्वरूपांत लीन
होतो. हे राजा, त्याला पुनः जन्म येत नाहीं, यांत विचार करावयाला नको
आहे. (१४७) पर्वकालीं मला किंवा शंकराला जो अभिषेक घालतो, व
शास्त्राला अनुसरून पूजा करतो, त्याच्या पुण्याचें फल सांगतों ऐक.
(१४८) त्या पुरुषाचें दहा जन्मांत सांचलेलें पातक तात्काळ नष्ट होतें,

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

॥१४८॥ विमानं दिव्यमारूढः कामरूपी यथासुखम् ॥ दिव्य-
णाणां कोटिमेकां प्रमोदते ॥१४९॥ ततश्चापि च्युतः काला·
ोके द्विजोत्तमः ॥ चतुर्णामपि वेदानां पारगो ब्रह्मविद्भवेत्
॥ चंद्रसूर्यग्रहे धाम्नि मम वा शंकरस्य वा॥ गायित्रीं मामिकां
जपैद्यः शंकरस्य वा ॥१५१॥ शंखतूर्यनिनादैश्च कांस्यघंटा
पि ॥ कारयेत्तु ध्वनिं भक्त्या तस्य पुण्यफलं शृणु ॥१५२॥
ेद्दक्षिणामूर्तिं मां वा नात्र विचारणा ॥१५३॥ इति ॥ एवं
युधिष्ठिरं प्रति स्वभजनशिवभजनयोः साम्यमुक्त्वापि व-
नुरुध्य शिवभजनस्याधिक्यं सूचितम् ॥ तत्र हि विशेषतीर्थं
शक्तानामनुग्रहात् ॥ भक्तानां तारणार्थं वै वक्तुमर्हसि धर्मतः
॥ इति भगवत्सेवां कर्तुमशक्तानां भक्तानां तदनुकल्पतया
र्थं तीर्थं किमिति प्रश्ने तस्य प्रतिवचने ॥ सत्यस्य वचनं ती-

दहा अश्वमेध केल्याचें फल मिळतें. (१४९) नंतर तो प्राणी
विमानांत बसून देवमानानें कोटिहजारवर्षेपर्यंत यथेच्छ सुख भोगतो.
) तेथून भ्रष्ट होऊन कालानुसार या लोकांत ब्राह्मणाच्या जन्माला
व चार वेदांमध्यें विद्वान् होऊन ब्रह्मवेत्ता या नांवानें प्रख्यात होतो.
) चद्रसूर्याच्या ग्रहणाच्यावेळीं माझ्या किंवा शिवाच्या मंदिरांत बसून
मंत्राचा किंवा माझ्या मंत्राचा जो जप करतो, (१५२) व शंख,
दंग वगैरे वाद्यें जो वाजवितो व जो काशाची घंटा वाजवितो,
पुण्याचें फल सांगतों ऐक. (१५३) तो प्राणी दक्षिणामूर्तीकडे
किंवा माझ्याकडे येतो. याप्रमाणें स्वकीय भक्त धर्माला स्वभजन
नाचें साम्य सांगून, यांतला वास्तविक प्रकार काढून शिवभजनाला
दिलें आहे. त्यांतही असें ह्मटलें आहे कीं, (१५४) धर्म कृष्णास
रतो. कृष्णा, अशक्त अशा सर्व लोकांना विशेष तीर्थ कोणतें आहे?
च्या तारणाकरितां अनुग्रह करून सांग. भगवंताची सेवा करावयास
असलेल्या भक्तांना सुलभ पडेल असें तीर्थ कोणतें? असा प्रश्न
र त्याला कृष्ण उत्तर देतो कीं, (१५५) हे राजा, सत्यवचन हें
असून अहिंसा हें एक तीर्थ आहे. तप एक तीर्थ असून दया

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

र्थमहिंसा तीर्थमुच्यते ॥ तपस्तीर्थं दयातीर्थं शीलं तीर्थं युधि
॥१५५॥ मद्भक्तः सततं तीर्थं शंकरस्य विशेषतः ॥१५६॥ इति
भक्तापेक्षयापि शिवभक्तस्य विष्णुभक्तान् प्रत्यधिकतीर्थत्वमुक्तं
आरण्यपर्वणि च तीर्थयात्राविधौ केषु चिच्छिवक्षेत्रेषु शिवार्चन
गाणपत्यमवाप्नुयादिति महाभ्युदयहेतुत्वमुक्तम् ॥ केषु चित्त
नस्य परमां गतिमाप्नुयादिति निःश्रेयसहेतुत्वमुक्तं एवंविध
वचनानुग्रहात् ब्रह्माणं नीलकंठं चेति वचनस्याप्युक्तएवाभिप्राय
न्वेष्टव्यः तस्य नारायणातिरिक्तदेवताभजनं परिमितफला
ज्ञातारस्तान्न सेवंत इत्यर्थकत्वेऽपि नारायणसेवाप्ररोचनार्थं त
नेतव्यम् ॥ भूयो वचनानुरोधमनादृत्य यथाश्रुतार्थग्रहणे च ॥
प्रतारं ततो गछेत्सरय्वास्तीर्थमुत्तमम् ॥ यत्र रामो गतः स्वर्गं

एक तीर्थ आहे. तसेंच शील एक तीर्थ आहे. (१५६) माझा भक्त
तीर्थ असून विशेषेंकरून शंकराचा भक्त एक तीर्थ आहे. याप्रमाणें
पल्या भक्तापेक्षां शिवभक्ताच्या ठिकाणीं " विशेष तीर्थ " या उक्तीनें
धिक्य ठेविलें. तसेंच आरण्यपर्वांत तीर्थयात्रा समयास ह्मटलें आहे कीं,
शिवक्षेत्रांमध्यें शिवार्चना केली तर एका गणाचें आधिपत्य मिळतें. य
चनावरून महाभ्युदयहेतुत्व (मोठ्या उदयाचें कारणत्व) सांगितल्याप्र
झालें. व कांहीं ठिकाणीं शिवाची अर्चा केली तर उत्तम गति मिळते.
सांगितलें आहे. या वचनावरून निःश्रेयसहेतुत्व (कल्याणाचें कारण
सांगितल्याप्रमाणें झालें. या तऱ्हेच्या पुष्कळ वचनांनीं "ब्रह्माणं नील
या वचनाला मागें सांगितल्याप्रमाणें सार्थकता येते. " नारायणाव
इतर देवांची पूजा करूं नये, बुद्धिमान् इतर देवांची पूजा करीत ना
कारण इतर देव थोडें फल देतात. " अशा अर्थाचें वचन नारायण
आवडण्याकरितां घातलें आहे, असें समजावें. पुष्कळ वचनांला बाध
णणाऱ्या वचनांचा अनादर करून, वास्तविक अर्थ सांगणाऱ्या वचन
स्वीकार केला पाहिजे. (१५७) तेथून सरयूमध्यें असलेल्या गोप्रतार
वाच्या उत्तम तीर्थाला जावें. त्या गोप्रतारतीर्थामध्यें स्नान करून आप

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

लवाहनः ॥१५७॥ देहं त्यक्त्वा दिवं यातः स्थास्यतींद्रस्य वै-
दिति ॥१५८॥ गोप्रतारतीर्थमहिम्ना श्रीरामचंद्रस्य स्वर्गप्राप्ति-
नात् ॥ सभापर्वणि यमसभावर्णने तस्यां राजर्षयः पुण्यास्तथा
यो ऽमराः ॥ यमं वैवस्वतं तात प्रहृष्टाः पर्युपासते ॥१५९॥ य-
तिर्नहुषः पूरुर्मांधाता सोमको नृगः ॥१६०॥ इत्यारभ्य स्वर्ग-
त्यनंतरं यमसभायामवस्थाय तमुपासीनानां राजर्षीणां परिग-
ये ॥ रामो दाशरथिश्चैव लक्ष्मणश्च प्रतर्दन इति परिगणनेन च
यर्थपि कर्माधीनलोकप्राप्तिको जीवविशेषः स्यात् ॥ ततः शार्ङ्गं धनु-
र्ं कराग्रात्प्रापतन्मम ॥ मोहोत्पन्नस्तु कौंतेय रथोपस्थ उपाविशम्
॥१६१॥ इत्यारण्यपर्वणि साल्वयुद्धे श्रीकृष्णस्य मोहाज्ञानवचने-
पि जीवविशेषः स्यात् तस्मात्कृत्स्नमपि भारतं गीतानुगीतामो-

...ारासह, सैन्यासह, वाहनांसह श्रीराम स्वर्गाला गेला. (१५८) व या
...ांत देहत्याग करून स्वर्गाला जाऊन तेथें इंद्राच्या बरोबरीचें ऐश्वर्य
...ीत स्वस्थ राहिला आहे. याप्रमाणें गोप्रतारतीर्थाच्या महिमेनें श्रीराम-
...ला स्वर्गाचा लाभ झाला, असें सांगितलें, व सभापर्वांत यमसभावर्ण-
...्या वेळेस सांगितलें कीं, (१५९) त्या यमाच्या सभेंत पुण्यकर राजर्षि,
...र्षि, देव हे आनंदानें वैवस्वत यमाची उपासना करतात. (१६०) य-
...े, नहुष, पूरु, मांधाता, सोमक, नृग वगैरे राजर्षि यमाची उपासना
...ात. असा आरंभ करून स्वर्गप्राप्तीनंतर यमसभेमध्यें बसून उपासना
...ाऱ्या राजर्षींच्या गणनेमध्यें " रामो दाशरथिश्चैव लक्ष्मणश्च प्रतर्दनः "
...माणें रामाचीही गणना केली आहे. असें ह्मटल्यावरून इतर जीवां-
...णें हा रामही कर्माधीन अशा लोकाला गेला, अर्थात् हाही एक जीव
...षच आहे, असें सिद्ध झालें. तसेंच, कृष्णानें ह्मटलें कीं, (१६१)
...या, माझ्या हातांतून शार्ङ्ग नांवाचें धनुष्य जमिनीवर गळून पडलें, व
... मोह उत्पन्न होऊन मी रथावर स्वस्थ बसलों. असें अरण्यपर्वांत साल्व
...च्यावेळीं श्रीकृष्णाचें मोहानें युक्त व अज्ञानानें युक्त असें वाक्य आहे.
...रून हाही एक जीव विशेषच आहे, असें सिद्ध झालें. अर्थात् सर्व भा-
...गीता, अनुगीता, मोक्षधर्म, वैष्णवधर्म यां सर्वांसहित विशष श्लेषार्थानें

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

क्षधर्मवैष्णवधर्मशास्त्रसहितं विशेषध्वनिवृत्त्या शिवपारम्यविश्रांतं त- त्प्रधानमेव भगवता श्रीवेदव्यासेन कृतमित्येतत्सुप्रतिष्ठितमिति सर्वं समंजसम् ॥ अथ कृतस्य स्तोत्रस्य प्रचयगमनार्थं मंगळादीनीत्या- प्तवाक्यप्रामाण्यात् स्तोत्रसमाप्तौ शिवपारम्योपदेष्टृगुरुनमस्काररूपं मंगळमाचरति ॥ इत्थं चक्रे भारतं यः प्रबंधं व्यक्त्या व्यासः शा- भवोत्कर्षवर्षी॥ ध्वन्यध्वन्यध्वन्यमूर्धन्यधन्यस्तं शौरिं तत्साक्षिणंच नतोऽस्मि ॥१६२॥

इति श्रीभारद्वाजकुलजलधिकौस्तुभश्रीमदद्वैतविद्याचार्यश्रीविश्व- जिद्याजिश्रीरंगराजाध्वरिवरसूनोरप्पयदीक्षितस्य कृतिः भारतसार- संग्रहस्तोत्रविवरणं समाप्तम् ॥

शिवपरतत्वाच्या ठिकाणीं विश्रांत झालें आहे, ह्मणूनच श्रीभगवान् वेदव्या- सानें हा भारतग्रंथ शिवपरच केला आहे. तो ग्रंथ चिरकाल जगांत राहिला आहे, असें ह्मटलें असतां सर्वही बरोबर झाल्याप्रमाणें झालें. असो. आ- केलेल्या या स्तोत्राची प्रचीति होण्याकरितां मंगळ वगैरे करावें, असें आ- प्तांचें वाक्य असल्यामुळें, स्तोत्रसमाप्तीच्या वेळेस शिवसर्वोत्कृष्टत्वाचा उप- देश देणाऱ्या गुरूला कवि नमस्काररूप मंगलाचरण करतो. (१६२) शिवाच्या आधिक्याचें प्रतिपादन करून भारत नांवाचा प्रबंध ज्या व्यासानें रचिला, तो व्यास श्लेषार्थ प्रतिपादन करणाऱ्या सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ अ- अशा त्या व्यासाला व त्याच्या कर्माला साक्षीभूत असणाऱ्या कृष्णाला नमस्कार करतों.

याप्रमाणें भारद्वाजकुलरूपी समुद्रांत कौस्तुभमण्याप्रमाणें चकाकणारा, श्रीम- दद्वैतविद्येचा आचार्य, श्रीविश्वजिद्याजी, अशा श्रीरंगराजाध्वरीचा मुलगा अप्प- य दीक्षित यानें केलेला हा "भारतसारसंग्रहस्तोत्रविवरण" नांवाचा ग्रंथ संपूर्ण



CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

विक्रीस तयार.

१. **वीरशैवसदाचारसंग्रहः**–(मराठी अर्थासह) किंमत ८१२.

२. **सिद्धांतशिखामणिः**–(मराठी अर्थासह) भाग १ ला किंमत १८८.

३. **सिद्धांतशिखामणिः**--(मराठी अर्थासह) भाग २ रा किंमत १॥ रुपया.

४. **बसवेश्वरपुराण व्यासोक्तः**–(मराठी अर्थासह) किंमत १८८.

५. **वीरशैवाचारप्रदीपिकाः**–(मराठी अर्थासह) किंमत २ रुपये.

६. **हरिहरतारतम्यः**–(मराठी अर्थासह) किंमत ८४.

७. **पादोदकविचारः**–किंमत ८३.

८. **रामायणसारसंग्रह** :–(अप्पयदीक्षितकृत) ह्यांत शिवाचा महिमा सर्वां-ां अधिक असल्याचें वर्णन आहे. किंमत ८६.

९. **उपयुक्त वेंचे**:–ह्यांत शैवधर्मास अनुकूल असे इतर पुराणांतील अर्थासह होरे दिले आहेत. किंमत ८७.

१०. **विरक्तोत्पत्तिक्रियालक्षणः**–किंमत ८४.

११. **पारमेश्वरागमः**–भाग १ ला मराठी अर्थासह किंमत १ रुपया.

१२. **पारमेश्वरागमः**–भाग २ रा मराठी अर्थासह किंमत १ रुपया.

१३. **प्रभुलिंगलीलाः**–भाग १ ला (भविष्यत्पुराणांतर्गत) यांत अल्लमप्रभूची लीला फारच चटकदार रीतीनें वर्णिलेली आहे. किंमत १८८.

१४. **प्रभुलिंगलीलाः**–भाग २ रा (भविष्यत्पुराणांतर्गत) ह्यांत प्रमथगणांचे अवतार, त्यांचीं चरित्रें व महादेवींअक्कास कृतार्थ केल्याचें वर्णन आहे. किंमत १८४.

१५. **प्रभुलिंगलीलाः**–भाग ३ रा (भविष्यत्पुराणांतर्गत) ह्यांत अल्लम प्रभूनें बसवेश्वरास व इतर भक्तांस तत्वोपदेश केल्याचें वर्णन आहे. किंमत १ रुपया.

१६. **पंचाचार्यपंचमोत्पत्तिप्रकरणम्**:–(सुप्रबोधागमांतर्गत) यांत पंचाचार्य व पंचम यांची उत्पत्ति कशी झाली याबद्दल माहिती आहे. किंमत ८६.

१७. **वीरमाहेश्वरप्रकरणम्**:–(स्कन्दपुराण शंकरसंहितामध्यपठित) यांत वीरशैवांची विशेष प्रशंसा आहे. किंमत ८८.

१८. **दीक्षादिकथनम्**:–(श्रीव्यासकृत लिंगपुराण उत्तरभागांतील) यांत विष्णु, ब्रह्मदेव वगैरे देवांनीं लिंगधारण केलें याबद्दल माहिती आहे. किंमत ८२.

१९ **सूक्ष्मागमः**–किंमत ८१०, याचें स्वरूप व महत्त्व समजावें म्हणून

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

याचें पटल पांचवें किंमत ॰१, सहावें किंमत ॰१, सातवें ॰१। नववें किंमत ॰॰९ हीं निराळीं छापविलीं आहेत.

२०. संक्षिप्त लिंगपूजाविधिः—कित्येकांना रोज समग्र लिंगपूजा करतां येत नाहीं, सबब थोड्या वेळांत (१५–२० निमिटांत) लिंगपूजा करतां यावी म्हणून हा लहानसा ग्रन्थ तयार केला आहे. किंमत ॰॰९.

२१. वीरशैवलिंगिब्राह्मण वंशावलिपटः—किंमत ॰१.

२२. व्यापारसाम्राज्य पूर्वार्धः किंमत १ रुपया.

२३. शिवपरअभंगः—किंमत ७ आणे.

२४. शिवोत्कर्षकीर्तनतरंगिणीः—भाग १ ला. किंमत ५ आणे.

२५. शिवोत्कर्षकीर्तनतरंगिणीः— भाग २ रा. किंमत ५ आणे.

२६. शिवोत्कर्षकीर्तनतरंगिणीः—भाग ३ रा. किंमत ४ आणे.

२७. मराठी सिद्धरामेश्वर चरित्रः—किंमत ७ आणे.

२८. वीरशैवदीक्षाविधि वीरमाहेश्वरदीक्षाविधिः—वीरशैव सदाचार संग्रहांतील प्रकरण ११ वें. किंमत १ आणा.

२९. शिष्यवर्गसंप्रदायनिरूपणः—(शिष्य कोणाला करावा याचा विचार वीरशैवसदाचारसंग्रहांतील प्रकरण १४ वें. किंमत १ आणा.

३०. शिवपुराण वायवीयसंहिता पूर्वभागः—मराठी अर्थासह किं. २ रु

३१. शिवपुराण वायवीयसंहिता उत्तरभागः—मराठी अर्थासह किंमत २ रुपये.

यांपैकीं कोणत्याही ग्रंथाच्या एकदम दहा प्रती घेणारास एक प्रत बक्षिस मिळेल

छापत असलेले ग्रंथ.

१. बसवेश्वरपुराणः—(व्यासकृत भाग २ रा). **२. संक्षिप्तविवाहविधि**

३. अनादिवीरशैवसारसंग्रहः—भाग २ रा. **४. दशकर्मपद्धति.**

वरील ग्रंथ मराठी अर्थासह लौकरच तयार होतील.

ग्रंथ मिळण्याचीं ठिकाणें.

सोलापूर येथें रावसाहेब मल्लप्पा वसप्पा वारद यांचे दुकानीं व याशिवाय मुंबई विजापूर व कलबुर्गा येथें रावसाहेब वारद यांचे दुकानीं विकत मिळतील.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY.
Jangamwadi Math, VARANASI,
Acc. No. 3480

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitized by eGangotri and Sarayu Trust. Funding by of-IKS

CC-0. Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi